। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

रायगड रविवार । दि. २७ सप्टेंबर २०२६ । अंक १११ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

(छायाचित्र : समीर मालोदे)




| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

■ दहा दिवसांच्या बाप्पाला साश्रूनयनांनी निरोप

■ रायगडात १३,५९७ गणेशमूर्तींचे विसर्जन

"गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या..." अशी आर्त विनवणी करीत दहा दिवसांच्या गणरायाला साश्रूनयनांनी निरोप देण्यात आला. दहा दिवसांचा पाहुणचार घेऊन बाप्पा आपल्या गावाला परतले. अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने रायगड जिल्ह्यात घरगुती तसेच सार्वजनिक १३,५९७ गणेशमूर्तींचे वाजत गाजत विसर्जन करण्यात आले. ढोल-ताशांचा गजर, भजन, आरती आणि गणरायाच्या जयघोषाने संपूर्ण जिल्हा दुमदुमून गेला.

दहा दिवस गणरायाची मनोभावे सेवा करण्यात आली. जिल्ह्यातील गणेशोत्सव मंडळांच्या वतीने बाल्या नृत्यासह सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. आरोग्य शिबिरेदेखील घेण्यात आली. अलिबागमधील पान २ वर

# 75 टक्के महाराष्ट्र दुष्काळात

## ३५८ पैकी २६५ तालुके दुष्काळग्रस्त

| मुंबई | प्रतिनिधी |

आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या बळीराजाच्या पदरी यंदाही निराशाच आली. पावसाने पाठ फिरवल्याने शेतातील उभी पिके अक्षरशः करपून गेली, जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला. दुष्काळाची परिस्थिती स्पष्ट असतानाही सरकारने दुष्काळ जाहीर करण्यास उशीर केल्याने आधीच आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी अधिकच हवालदिल झाला आहे. अखेर राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आले असून, रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्याचाही दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समावेश करण्यात आल्याची घोषणा राज्य सरकारने शनिवार, दि. २६ सप्टेंबर रोजी केली. मात्र, केवळ दुष्काळ जाहीर करून भागणार नाही; तर कागदावरील मदत प्रत्यक्ष प्रत्येक शेतकऱ्याच्या हातात पोहोचवून त्याला भक्कम आर्थिक आधार देण्याची गरज आहे. राज्यातील जवळपास ७५ टक्के तालुके दुष्काळाच्या पान २ वर



"राज्य सरकारने दुष्काळी तालुके जाहीर केले आहेत. मात्र, त्यात कोणत्या सवलती देण्यात येणार आहेत, याची माहिती घेण्यात येईल. दुष्काळ जाहीर केल्यानंतर त्याचा परिणाम केवळ एका वर्षापुरता मर्यादित राहात नाही, तर पुढील दोन-तीन वर्षे शेतीवर त्याचा परिणाम होत असतो. त्यामुळे शासनाचे धोरण काय राहणार आहे, हे अगोदर स्पष्ट होणे गरजेचे आहे. दोन दिवसांत सविस्तर माहिती आल्यानंतरच याची खरी स्पष्टता होईल. आज केवळ घोषणा झाली आहे; मात्र त्यात कोणत्या अटी-शर्ती घातल्या जातील, हेच महत्त्वाचे आहे."

– **जयंत पाटील**, सरचिटणीस, शेतकरी कामगार पक्ष

### रायगडातील श्रीवर्धन तालुका 'दुष्काळग्रस्त'

**श्रीवर्धन :** सततचा अनियमित पाऊस आणि भूगर्भातील खालावलेली पाण्याची पातळी यांमुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीतून दिलासा देण्यासाठी प्रशासनाने अखेर श्रीवर्धन तालुका 'दुष्काळग्रस्त' म्हणून घोषित केला आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील शेतकरी, व्यावसायिक आणि सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मागील काही महिन्यांत तालुक्यात अपेक्षित पावसाचे प्रमाण लक्षणीयरित्या घटले आहे. विहिरी, बोअरवेल आणि स्थानिक पाझर तलावांनी तळ गाठल्यामुळे ग्रामीण भागासह शहरी पान २ वर

## सखोल चौकशीसाठी भस्मेच्या कोठडीत वाढ

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

दीड लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी जिल्हा परिषद अध्यक्षांचे स्वीय सचिव योगेश भस्मे याच्याविरोधात दाखल गुन्ह्याचा तपास सखोल करण्यासाठी न्यायालयाने त्याच्या पोलीस कोठडीत वाढ केली आहे. शनिवारी (दि. २६) पुन्हा न्यायालयात हजर केले असता, २८ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.



मिळालेल्यामाहितीनुसार, सुधागडतालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत बदली करून देण्यासाठी साहेबांना सांगून काम करून देतो, असे सांगत अध्यक्ष जि.प. मंगेश वाकडीकर यांचे स्वीय सचिव योगेश भस्मे याने दीड लाख रुपयांची लाच मागितली होती. रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी सायंकाळी अलिबागमधील समाधान हॉटेलमध्ये सापळा रचून लाच स्वीकारताना भस्मेला रंगेहाथ पकडले. त्याला ताब्यात घेऊन अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या उपअधीक्षक सरिता भोसले यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, तक्रारदार यांच्या शिक्षक पत्नीची तळा तालुक्यातील वाशी हवेली येथील जिल्हा परिषद शाळेऐवजी सुधागड तालुक्यातील पाली येथील जिल्हा परिषद शाळेत पान २ वर

## ऐन पावसाळ्यात ४० गावांचा घसा कोरडा

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |




■ फणसापूरमध्ये उमटे धरणाची जलवाहिनी फुटून पाणी वाया

■ २२ वाड्यांसह ६० हजारांहून अधिक नागरिकांची पाण्यासाठी वणवण

धरणात मुबलक पाणी, मात्र पाईपलाईन फुटल्याने हजारो नागरिकांच्या नळाला पाणीच नाही, अशी अवस्था ऐन पावसाळ्यात झाली आहे. अलिबाग तालुक्यातील फणसापूर येथे उमटे धरणाची पाईपलाईन फुटल्याने ४० गावे आणि २२ वाड्यांचा पाणीपुरवठा ठप्प झाला आहे. शुक्रवारी दुपारपासून नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असून, ऐन गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर विशेषतः महिलांचे मोठे हाल झाले. तब्बल ६० हजारांहून अधिक नागरिकांवर पाणीटंचाईचे संकट ओढवले आहे.

अलिबाग तालुक्यातील बोरघर ग्रामपंचायत हद्दीत सुमारे ४७ वर्षांपूर्वी उमटे धरण उभारण्यात आले. या धरणातून सुडकोली, रामराज, बोरघर, चिंचोटी, बेलोशी, आक्षी, नागाव, वरंडे, चौल, रेवदंडा आदी ग्रामपंचायतींच्या हद्दीतील ४० गावे आणि २२ वाड्यांना पाणीपुरवठा केला जातो. या पाण्यावर ६० हजारांहून अधिक नागरिक अवलंबून पान २ वर

"फणसापूर येथे पाईपलाईन ब्रेक झाली आहे. ती दुरुस्त करण्यासाठी पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. शनिवारी सायंकाळपर्यंत दुरुस्तीचे काम झाल्यास रविवारी सकाळपासून पाणीपुरवठा पूर्ववत सुरू केला जाईल. नागरिकांनी सहकार्य करावे. – निहाल चवरकर, अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, अलिबाग"

## वाघाच्या हल्ल्यात बैलाचा मृत्यू?

| रायगड| जिल्हा प्रतिनिधी |

■ महाजने येथील दिवीवाडीत चर्चा; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

अलिबाग तालुक्यातील महाजने येथील दिवीवाडीमधील एका शेतकऱ्याच्या बैलावर वाघाने हल्ला केल्याची चर्चा जोरात आहे. मात्र, याच वाडीपासून काही अंतरावर असलेल्या गेल कंपनीच्या बाजूकडील जंगलभागात एका सुरक्षा रक्षकाला काही दिवसांपूर्वी वाघ दिसल्याचा फोटो व्हायरल झाला आहे. या घटनांमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन वनपाल नाझरकर यांनी केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिवीवाडी येथील एका शेतकऱ्याचा बैल घरापासून काही अंतरावर गोठ्यामध्ये बांधला होता. मात्र, सकाळी गोठ्यात गेल्यावर बैल मृतावस्थेत आढळून आला. या बैलावर वाघाने हल्ला केल्याची चर्चा जोर धरत आहे. मागील आठ दिवसांपूर्वी उसर येथील गेल कंपनीच्या बाजूला असलेल्या जंगल भागात एका सुरक्षा रक्षकाला रात्रीच्या वेळी एक वाघ दिसून आला. याबाबत अलिबागचे वन परिक्षेत्र अधिकारी मिलिंद राऊत यांच्याशी संपर्क साधला, मात्र होऊ शकला नाही. परंतु, वनपाल नाझरकर यांच्याशी साधल्यावर सुरक्षा रक्षकाला ज्या ठिकाणी वाघ दिसला, तो जंगल भाग येतो. पट्टेरी वाघ या भागात नाही. बिबट्याचा वावर असल्याचा पान २ वर

## चाफेवाडीत वाघाचा हल्ला; गोठ्यातील वासरू ठार

| म्हसळा | प्रतिनिधी |

म्हसळा तालुक्यातील चाफेवाडी येथे पहाटे वाघाने गोठ्यात शिरून एका वासरावर हल्ला करून त्याला ठार केल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चाफेवाडी येथील एका शेतकऱ्याच्या गोठ्यात पाच वासरे होती. पहाटे वाघाने गोठ्यात शिरून एका वासराला उचलून नेले. सकाळी शोध घेतला असता गावाजवळच वासराचा मृतदेह आढळून आला. वाघाने गळ्याला चावा घेत तसेच पोट फाडून वासराला ठार केल्याचे दिसून आले. घनदाट जंगलालगत हा परिसर असल्याने वन्यप्राण्यांचा वावर असतो. मात्र भरवस्तीजवळ वाघाने जनावरावर हल्ला केल्याने ग्रामस्थांमध्ये दहशत पसरली आहे.

## सोमवारपासून बँक कर्मचारी संपावर

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |




पाच दिवसांचा आठवडा करण्याबरोबरच इतर प्रलंबित मागण्यांसाठी सरकारी बँक कर्मचारी संपाच्या पावित्र्यात आहेत. सोमवार, दि. ८ ते बुधवार, दि.३० या तीन दिवसांच्या कालावधीत बँक कर्मचारी संपावर जाणार आहेत. रायगड जिल्ह्यातील तीन हजारांहून अधिक कर्मचारी या संपात सामील होणार आहेत. त्यामुळे ग्राहकांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता वर्तविण्यात आली पान २ वर

### आवश्यक बँकिंग व्यवहार पूर्ण करण्याचे आवाहन

युनाटेड फोरम ऑफ बँक युनियन्स यांनी पुकारलेल्या देशव्यापी संपामुळे तीन तीन दिवस बँकेच्या सेवेवर परिणाम होणार आहे. इंटरनेट बँकिंगसह इतर सुविधांचा अभाव झाल्यास ग्राहकांना त्याचा फटका बसणार आहे. कोणतीही गैरसोय टाळण्यासाठी ग्राहकांनी आपल्या व्यवहाराचे आधीच नियोजन करावे. बँकेच्या पर्यायी सेवा माध्यमांचा वापर करावा. आवश्यक बँकिंग कामे रविवार (दि.२७) पर्यंत पूर्ण करावी, असे आवाहन युनियन बँकेकडून करण्यात आले असून, २४ तास डिजिटल सेवा-इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, एटीएम, बँक मित्र पॉईंट, इतर डिजिटल सेवा उपलब्ध राहणार आहेत. सांगण्यात आले आहे.

शेकापकडून ३ ऑक्टोबरला अलिबागमध्ये जिल्हास्तरीय खुली वक्तृत्व स्पर्धा | ५० स्पर्धकांना मिळणार संधी

## स्व. मीनाक्षीताईंच्या स्मृतीतून नव्या पिढीला व्यासपीठ

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अभ्यासपूर्ण भाषण, प्रभावी मांडणी आणि शेतकरी-कामगारांच्या प्रश्नांवरील आक्रमक भूमिका ही माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांची ओळख होती. त्यांच्या याच वक्तृत्वाची आणि विचारांची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने अलिबागमध्ये जिल्हास्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी विद्यार्थी संघटना, पुरोगामी युवक संघटना आणि सांस्कृतिक आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा शनिवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता शेतकरी भवन, अलिबाग येथे होणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचन, अभ्यास, विचार मांडण्याची क्षमता आणि प्रभावी वक्तृत्व विकसित व्हावे, हा स्पर्धेचा उद्देश आहे.



स्व. मीनाक्षी पाटील यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत शेतकरी, कामगार, प्रकल्पग्रस्त तसेच ग्रामीण भागातील विविध प्रश्न सातत्याने मांडले. विधिमंडळातील अभ्यासपूर्ण भाषणे आणि आक्रमक भूमिका ही त्यांची विशेष ओळख होती. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासोबतच विद्यार्थ्यांना सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि समकालीन विषयांवर विचार मांडण्याची संधी या स्पर्धेतून मिळणार आहे.

स्पर्धेसाठी ५० स्पर्धकांना संधी असून आतापर्यंत ४६ स्पर्धकांनी नोंदणी केली आहे. 'आजचा विद्यार्थी आणि उद्याचा भारत', 'रायगडचा विकास आणि जनतेची अपेक्षा', 'सत्तेच्या सिंहासनावर नव्हे, जनतेच्या हृदयात घर करणारी ताई मीनाक्षीताई', 'कलम जब जागती है तब सत्ता कांपती है', 'मजबुती का नाम महात्मा गांधी', 'जखमी लोकशाहीच्या कपाळावर आशेचे कुंकू लावतीय मी' आदी विषयांचा समावेश आहे.

प्रथम क्रमांकासाठी १५ हजार १ रुपये व चषक, द्वितीय क्रमांकासाठी ११ हजार १ रुपये व चषक, तृतीय क्रमांकासाठी ७ हजार १ रुपये व चषक, चतुर्थ क्रमांकासाठी ५ हजार १ रुपये व चषक, तर पाचव्या क्रमांकासाठी ३ हजार रुपये व चषक देण्यात येणार आहे. तसेच पाच उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी २ हजार १ रुपये व चषक देऊन प्रदान केली जाणार आहेत.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले असून, अधिक माहितीसाठी वेदांत कंटक आणि हर्ष ढवळे यांच्याशी संपर्क साधावा, असे सांगण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची शेती मिळकत ही १) श्री. जयेंद्र नागु म्हात्रे, २) सौ. कविता गणेश ठाकूर, ३) श्रीमती संगीता नागू म्हात्रे, ४) श्रीमती मोनाली मोहन घरत, ५) श्रीमती अश्विनी अविनाश माळी, ६) श्री. नारायण सिताराम कडवे ७) श्री. दत्तात्रेय सिताराम कडवे. ८) श्री. जयेंद्र सिताराम कडवे. ९) श्रीमती अनुसया धर्मनाथ म्हात्रे १०) श्रीमती विमल गोपीनाथ कडवे ११) श्री. शाम गोपीनाथ कडवे १२) श्रीमती वैशाली पांडूरंग मोकल १३) श्रीमती लिला गुरुनाथ कडवे. १४) श्री. सुकेश गुरुनाथ कडवे १५) श्री. प्रितेश गुरुनाथ कडवे १६) श्रीमती वत्सला दत्तात्रेय पाटील १७) श्रीमती तारामती हरिश्चंद्र कडवे १८) श्री. मधुकर हरिश्चंद्र कडवे १९) श्री. रोहिदास हरिश्चंद्र कडवे २०) श्रीमती संगिता बाळाराम कडवे २१) श्री. आकाश बाळाराम कडवे २२) श्रीमती पुनम प्रणीत कडवे २३) श्रीमती अर्चना अरविंद पाटील २४) श्रीमती राजश्री सुधीर पाटील २५) श्रीमती निर्मला रामचंद्र कडवे २६) श्री. संदेश रामचंद्र कडवे. २७) श्री. योगेश रामचंद्र कडवे २८) श्रीमती भारती हरिश्चंद्र पाटील २९) श्रीमती सुचिता संजय म्हात्रे ३०) श्रीमती संगिता दिलीप भगत ३१) श्रीमती सुप्रिया संजय म्हात्रे ३२) श्रीमती राधाबाई बाळकृष्ण कडवे ३३) श्री. रुपेश बाळकृष्ण कडवे ३४) श्री. शैलेश बाळकृष्ण कडवे ३५) श्रीमती मीना दिलीप भगत ३६) श्रीमती विद्या सुरेश वाकडे ३७) श्रीमती मंदा लक्ष्मण कडवे ३८) श्री. अमर लक्ष्मण कडवे ३९) श्री. प्रविण लक्ष्मण कडवे ४०) श्रीमती कांचन विकास कडवे ४१) श्रीमती शुभांगी प्रमोद गावंड ४२) श्रीमती बबीबाई अनंत पाटील. (यापुढे या नोटीसमधे **सामाईक जमीन मालक** असे संबोधण्यात आले आहे) यांचे सामाईक मालकीची वडीलोपार्जित वारसाहक्काने आलेली व खुद्द ताबे कब्जा वहीवाटीची अशी आहे. या मिळकतीमधील सदर व्यक्तींच्या अविभक्त हिश्याची खरेदी करण्याबाबत माझे अशील श्री. मकरंद सुरेश नार्वेकर रा. कुलाबा, मुंबई यांनी दिनांक १८ डिसेंबर २०२३ रोजी कायदेशीर साठेकरार केलेला आहे. तसेच या सामाईक जमीन मालकांनी माझे अशिलांना अखत्यारपत्र देखील लिहुन दिलेले आहे. या मिळकतीबाबत माझे अशिलांनी सदर सामाईक जमीन मालकांचे मालकीहक्क निर्वेध करून घेण्याची जबाबदारी घेतली असुन त्यानंतर सदर मिळकतीबाबत आजवर झालेले व सध्या सुरू असलेले अपिले, रिव्हीजन वगैरे कामात माझे अशिल हेच प्रत्यक्ष सहभाग घेऊन स्वखर्चाने कोर्ट कामकाज चालवित आले आहेत. माझे अशिलांसोबत सामाईक जमीन मालकांनी केलेला साठेकरार व अखत्यारपत्र अद्याप अस्तित्वात असुन ते दस्त कोणत्याही सक्षम न्यायालयाने रद्द ठरविलेले नाहीत. माझे अशिलांकडुन सदर जमीन मालकांनी मोठी रक्कम बयाणापोटी स्विकालेली असुन माझे अशिल हे सदर दिनांक १८ डिसेंबर २०२३ रोजीचे कायदेशीर साठेकरारानुसार वागणुक आजवर करत आलेले असुन यापुढेही सदर साठेकरारानुसार वागण्यास तयार आहेत. या साठेकरारानुसार आता या मिळकतीबाबत सुरू असलेले मुंबई येथील मा. कोकण कमीशनर यांचे कोर्टातील रिव्हीजन संपुष्टात आले नंतर या मिळकतीचे खरेदीखत सदर जमीन मालकांनी माझे अशिलांचे लाभात नोंदणीकृत करून देणे कायद्याने आवश्यक आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे धोकवडे ता. अलिबाग, जि. रायगड.**

| अ.क्र. | गावाचे नांव | गट नंबर | जुना सर्व्हे नंबर. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | धोकवडे | ५२३/१ | ७२/१७क/१ | 0-२५-७0 | 0.४५ |
| २. | धोकवडे | ५२३/२ | ७२/१७अ/१<br>७२/१७क/२ | 0-६४-00 | १.१२ |
| ३. | धोकवडे | ५२६/0 | ७९/४ | 0-२५-३0 | ५.६९ |
| ४. | धोकवडे | ५४४/0 | ७९/५<br>८0/५अ | १-१८-५0 | ११.७८ |

आता आपली नावे मिळकतीचे ७/१२ सदरी दाखल झाली आहेत या गोष्टीचा गैरफायदा घेत वर नमुद श्री. जयेंद्र नागु म्हात्रे, वगैरे जमीन मालक हे माझे अशिलांची फसवणुक करण्याचे उद्देशाने व माझे अशिलांकडुन स्विकारलेली बयाणा रक्कम गिळंकृत करण्याचे उद्देशाने सदर मिळकतीची परस्पर विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे असे माझे अशिलांना खात्रीलायकरीत्या समजले आहे. याबाबत माझे अशिलांनी सदर जमीन मालक यांना विचारणा केली असता ते आता उडवाउडवीची उत्तरे देत आहेत व सदर दिनांक १८ डिसेंबर २०२३ रोजी कायदेशीर साठेकरारानुसार वागणुक करणार नसल्याचे सांगत आहेत. यामुळे नाईलाजास्तव माझे अशिलांना अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरीष्ट स्तर यांचे कोर्टात सदर जमीन मालकांविरुद्ध दिनांक १८ डिसेंबर २०२३ रोजी कायदेशीर साठेकराराची विशेष पुर्तता करून मिळण्याकरीता दिवाणी दावा देणे भाग पडत आहे. या बाबत तमाम लोकांना अवगत करण्याकरीता ही जाहीर नोटीस माझे अशिलांमार्फत प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सबब सर्व लोकांस याद्वारे कळविण्यात येते की, या मिळकतीबाबत श्री.जयेंद्र नागु म्हात्रे, वगैरे यांचे सोबत कोणीही कसलाही साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही व्यवहार करू नये अथवा मिळकतीमधे कोणताही हक्क, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, असा हितसंबध निर्माण करू नये, या उपरही कोणी असा काही व्यवहार करार मदार या बाबत कोर्टात वाद प्रलंबित असल्याची माहिती असुनही केल्यास सदर व्यवहार हा माझे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही, तसेच या प्रकारे व्यवहार करणारी व्यक्ती ही कोर्टात बोनाफाईड पर्चेसर फॉर व्हॅल्यु विदाउट नोटीस असा बचाव देखील घेऊ शकणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

हे सर्वांस कळविले.

अलिबाग

दिनांक : २७/0९/२0२६

**ॲड. सविता शंकर पिंगळे,**
**रा.रेवदंडा, ता.अलिबाग, जि. रायगड.**

तुमच्या सीएनजी रिफिलसाठी आवश्यक आहे
वैध मेटल प्लेट
महानगर गॅस




फक्त वैध मेटल कॉम्प्लायन्स प्लेट सह हायड्रोटेस्ट केलेल्या सिलेंडर्सचे सीएनजी रिफिलिंग करण्याची परवानगी आहे.

दर 3 वर्षांनी पीईएसओ-मान्यताप्राप्त एजन्सीमध्ये तुमच्या सीएनजी सिलेंडरची हायड्रोटेस्ट करा.

तुमची सुरक्षा हेच आमचे प्राधान्य

*पीईएसओ: पेट्रोलियम ॲण्ड एक्सप्लोझिव सेफ्टी ऑर्गनायझेशन
(पीईएसओ यांच्या वेबसाईटवर www.peso.gov.in येथे मान्यताप्राप्त एजन्सीजची यादी उपलब्ध आहे).

महानगर गॅस लिमिटेड | www.mahanagargas.com | ग्राहक सेवा: 022 6867 4500 / 6156 4500

# धरण परिसरातील शेतकरी आक्रमक



। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवर बांधण्यात येत असलेले कोंढाणे धरण शासनाने सिडकोला विकले आहे. शासनाने २०११ मध्ये कोंढाणे धरणाचे काम सुरू केले आणि त्यानंतर सिंचन घोटाळ्यात ही धरण अडकले होते, तेव्हापासून या धरणात जमिनी आणि घरेदारे जात असलेल्या शेतकरी आणि ग्रामस्थांनी प्रांत अधिकारी कार्यालयात जाऊन प्रशासनाला जाब विचारला. आठ दिवसांत प्रकल्पग्रस्त दाखले, रोजगाराबद्दल निर्णय याबाबत लेखी आश्वासन शासनाने दिले नाही तर कोंढाणे धरणग्रस्त आंदोलन करणार आहेत.

उल्हास नदीवर बांधण्यात येत असलेल्या कोंढाणे धरणाचे काम शासनाने २०१० मध्ये मंजूर केले. त्यावेळी लघुपाटबंधारे प्रकल्प असल्याने तत्कालीन आमदार सुरेश लाड यांनी हा प्रकल्प मध्यम प्रकल्प व्हावा, अशी मागणी तत्कालीन जलसंपदामंत्री सुनील तटकरे यांच्याकडे केली. शासनाने त्यावर जलदगतीने निर्णय घेताना कोंढाणे धरण मध्यम प्रकल्प म्हणून जाहीर केले. २०११ मध्ये धरणाचे काम वेगाने सुरू झाले आणि या भागातील मुंढेवाडी, चोची, उंबरवाडी आणि कोंढाणे येथील जमिनीतून दररोज हजारो ब्रास माती काढून धरणाच्या बांधासाठी टाकण्यात येऊ लागली. एफए या नामांकित कंपनीला या

### ■ सोयी सुविधा कधी मिळणार?

कामाचा ठेका मिळाला होता आणि त्यांनी वेगाने कामाला सुरुवातदेखील केली. परंतु अवघ्या काही दिवसात लघुपाटबंधारे प्रकल्प मध्यम प्रकल्प कसा झाला आणि ५६ कोटींचे अंदाजपत्रक ३६० कोटींवर कसे गेले, असा प्रश्न करीत सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आवाज उठवला. त्यावेळी धरणाची किंमत अचानक वाढल्याने दमानिया यांनी सिंचन घोटाळा बाहेर काढला आणि तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सिंचन घोटाळ्याची चौकशी होईपर्यंत धरणाच्या काम बंद करण्याचे आदेश दिले. त्यावेळी तब्बल १०० कोटींचे काम एफए कन्स्ट्रक्शन कंपनीकडून झाले होते. तर प्रामुख्याने चोची आणि मुंढेवाडी या गावाच्या आजूबाजूला मातीचे डोंगर गायब झाल्याने अनेक ठिकाणी खोलगट भाग निर्माण झाले. त्यावेळी धरणाच्या जलाशयात जाणाऱ्या मुंढेवाडी गावाचे विस्थापन प्रक्रिया सुरू झाली; परंतु सिंचन घोटाळ्याने धरणाची ही मुख्य प्रक्रिया बंद पडली. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या जमिनीत शेती करता येणे बंद झाले, मोडकळीस आलेली घरे दुरुस्त करता येत नाही आणि पुनर्वसनदेखील नाही, अशा स्थितीत कोंढाणे धरणात घरे असलेल्या मुंढेवाडी ग्रामस्थांची अवस्था झाली.

# आंबेवाडी आदिवासीवाडीतून विवाहिता बेपत्ता

**कोलाड :** रोहा तालुक्यातील आंबेवाडी आदिवासीवाडी येथून एक महिला अचानक बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सासरच्या घरातून कोणालाही काही एक न सांगता निघून गेलेल्या या महिलेचा सर्वत्र शोध घेऊनही ती मिळून न आल्याने, अखेर अज्ञात इसमाने तिला फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, माणगाव तालुक्यातीलइंदापूरजवळीलरातवडआदिवासीवाडी येथील फिर्यादी यांच्या बहिणीचे लग्न आंबेवाडी आदिवासीवाडी, तालुका रोहा येथे झाले असून, ती आपल्या सासरी पती व सासरच्या लोकांसोबत राहात होती. दरम्यान, संबंधित महिला आपल्या राहत्या घरातून कोणासही कोणतीही पूर्वकल्पना न देता अचानक निघून गेली. बरीच वाट पाहूनही ती परत न आल्याने तिच्या सासरच्या तसेच माहेरच्या मंडळींनी आसपासच्या संपूर्ण परिसरात, ओळखीच्या लोकांकडे, नातेवाईक आणि मित्रपरिवारात तिचा कसून शोध घेतला. मात्र, सर्व ठिकाणी शोध घेऊनही तिचा कुठेही थांगपत्ता लागू शकला नाही. अखेर कोणीतरी अज्ञात इसमाने तिला तिच्या पतीच्या कायदेशीर रखवालीतून कसलेतरी आमिष दाखवून अथवा फूस लावून पळवून नेल्याची तक्रार दाखल केली.

पान १ वरुन

## पुढच्या वर्षी लवकर या...!

घरत आळी येथील गणेशोत्सव मंडळाच्या वतीने समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला. संत तुकाराम महाराज यांनी केलेले समाजप्रबोधन तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी भेसळयुक्त खाद्यपदार्थाविरोधात उचललेली मोहीम याची माहिती चलचित्राद्वारे देऊन जनजागृती करण्यात आली. ग्रामीण भागामध्ये भजन, कीर्तनांसह वेगवेगळे कार्यक्रम घेऊन आनंदोत्सव साजरा करण्यात आला. दहा दिवसांच्या सेवेनंतर अनंत चतुर्दशीच्या दिवशी बाप्पाला जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला.

सायंकाळी पाचनंतर विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. काही ठिकाणी लेझीम, भजन, तर काही ठिकाणी ढोल-ताशांच्या गजरात बाप्पाची मिरवणूक काढण्यात आली. काही ठिकाणी गणेशमूर्ती डोक्यावर घेऊन, तर काही ठिकाणी मूर्ती टेम्पो व गाडीतून विसर्जनस्थळी नेण्यात आली. विसर्जन घाटावर भाविकांनी अलोट गर्दी केली. आरती, पूजन झाल्यानंतर गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. जिल्ह्यातील १३ हजार ५९७ गणेशमूर्तींचे समुद्र, खाडी, तलाव व नदीमध्ये विसर्जन करण्यात आले. बाप्पाला निरोप देताना भाविकांच्या डोळ्यांत अश्रू होते आणि ओठांवर एकच आर्त साकडे होते; ते म्हणजे, ''बाप्पा, पुढच्या वर्षी लवकर या...''

मिरवणुकीचा सोहळा आनंदात साजरा व्हावा, यासाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली होती. जिल्ह्यातील दोन हजारांहून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा बंदोबस्त तैनात होता. यामध्ये होमगार्ड जवानांचाही सहभाग होता. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रायगड पोलिसांनी योग्य नियोजन केले. दरम्यान, डीजेच्या जोरदार आवाजावरही नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला.

## ७५ टक्के महाराष्ट्रात दुष्काळ

छायेत आल्याने ग्रामीण महाराष्ट्रासमोरील संकटाची तीव्रता स्पष्ट झाली आहे.महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजी यासंदर्भात शासन निर्णय जारी केला. दुष्काळ संहितेतील 'ट्रिगर-१' लागू झालेल्या २६५ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समावेश करण्यात आला आहे.

**मराठवाड्यात सर्वाधिक ७४ तालुके**

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील एकूण ७४ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर ९, जालना ८, बीड ११, लातूर १०, धाराशिव ८, नांदेड १४, परभणी ९ आणि हिंगोली ५ तालुक्यांचा त्यात समावेश आहे. उत्तर महाराष्ट्रातील ४९ तालुक्यांवर दुष्काळाची छाया आहे. जळगावमधील १५, अहिल्यानगर १४, नाशिक १०, नंदुरबार ६ आणि धुळे जिल्ह्यातील ४ तालुक्यांचा यामध्ये समावेश आहे.

**दुष्काळग्रस्तांना काय मिळणार?**

जमीन महसुलात सूट
पीक कर्जाचे पुनर्गठन
शेतीशी संबंधित कर्जवसुलीस स्थगिती
कृषीपंपांच्या वीजबिलात सवलत
शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी
रोजगार हमीची कामे वाढविण्यासाठी निकष शिथिल
गरजेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा
शेतकऱ्यांच्या कृषीपंपांची वीजजोडणी खंडित न करण्याचे निर्देश
जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था
अन्नधान्याचा पुरवठा आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य

**मोठ्या कृषीपंपांनाही वीजबिलात सवलत**

७.५ हॉर्सपॉवरपर्यंतच्या कृषीपंपांचे वीजबिल यापूर्वीच माफ करण्यात आले आहे. आता त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या कृषीपंपांनाही चालू वीजबिलात सवलत देण्यात येणार आहे. टंचाई जाहीर झालेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या कृषीपंपांची वीजजोडणी खंडित न करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

**पिकांच्या नुकसानीची मदत स्वतंत्र निर्णयाने**

दुष्काळ जाहीर झाला असला तरी पिकांच्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना मिळणारी आर्थिक मदत स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर केली जाणार आहे. त्यामुळे दुष्काळाची घोषणा झाल्यानंतर आता प्रत्यक्ष नुकसानभरपाई कधी आणि किती मिळणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**दुष्काळाचे चित्र**

२६५ दुष्काळग्रस्त तालुके
३५८ राज्यातील एकूण तालुके
७५ टक्के दुष्काळाच्या छायेत आलेले तालुके
७४ मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त तालुके
४९ उत्तर महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त तालुके

**ट्रिगर-१ म्हणजे काय?**

ट्रिगर-१ हा दुष्काळाची परिस्थिती ओळखून तातडीच्या दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना सुरू करण्यासाठीचा महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना विविध सवलती आणि सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा होतो. मात्र, पीक पूर्णपणे किंवा मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यास त्यासाठी स्वतंत्र पंचनामा आणि शासनाच्या मदतीचे निकष पूर्ण करावे लागतात.

**जिल्हाधिकाऱ्यांना आदेश काय?**

दरम्यान, येत्या ५ ऑक्टोबरपासून पंचनामे करण्यात येणार आहेत. या पंचनाम्याची कार्यवाही तत्काळ पूर्ण करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. पिकांची स्थिती दाखवणारे छायाचित्र, जीपीएस संकलित करण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले आहेत.

## रायगडातील श्रीवर्धन तालुका 'दुष्काळग्रस्त'

भागातही पिण्याच्या पाण्याचे तीव्र संकट निर्माण झाले आहे. वाढत्या उष्णतेमुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, पशुधनासाठी चारा आणि पाण्याचा प्रश्न अत्यंत बिकट बनला आहे. दुष्काळसदृश्य परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर महसूल आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने हा अधिकृत आदेश जारी केला आहे. तालुका दुष्काळग्रस्त घोषित झाल्यामुळे आता शासकीय पातळीवर तातडीने मदतकार्य राबवले जाणार आहे.

यामध्ये प्रामुख्याने पाणीटंचाई असलेल्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, शेतकरी कर्जाचे पुनर्गठन आणि वसुलीस स्थगिती देणे, जमीन महसुलात सूट देणे, विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात सवलत देणे, रोहयो अंतर्गत नवीन रोजगार कामे सुरू करणे यांसारख्या उपाययोजना तात्काळ प्रभावाने लागू केल्या जातील. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी प्रशासनाकडे लवकरात लवकर प्रत्यक्ष टँकर आणि चारा छावण्या सुरू करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवून असून टंचाई निवारणासाठी तातडीने पावले उचलली जातील, असे आश्वासन दिले आहे.

## सखोल चौकशीसाठी भस्मेच्या कोठडीत वाढ

बदली करण्याचे आश्वासन भस्मेने दिले होते. ओळखीने साहेबांना सांगून बदली करून देण्यासाठी त्याने दीड लाख रुपयांची लाच स्वीकारली होती.

शुक्रवारी त्याला न्यायालयात हजर केले होते. तीन दिवसांच्या पोलीस कोठडीनंतर शनिवारी पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी सरकारी वकील ॲड. संतोष पवार यांनी युक्तिवाद करून सखोल चौकशीसाठी कोठडीत वाढ करण्याची मागणी केली. न्यायालयाने घटनेचे गांभीर्य ओळखून भस्मेच्या कोठडीत तीन दिवसांची वाढ केली असून, सोमवारी (दि. २८) पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.दरम्यान, या दोन दिवसांच्या कालावधीत भस्मेची घरझडतीही घेण्यात आली आहे. मात्र, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून याबाबतची माहिती अद्याप देण्यात आलेली नाही.

## ऐन पावसाळ्यात ४० गावांचा घसा कोरडा

आहेत. शुक्रवारी सकाळपासूनच गणेश विसर्जनासाठी जाण्यापूर्वी घरात पाणी भरून ठेवण्याची लगबग सुरू होती. मात्र, दुपारी बारानंतर अचानक नळाला पाणी येणे बंद झाले. सायंकाळपर्यंत पाणी येईल, या आशेने नागरिक वाट पाहात राहिले. अखेर फणसापूर येथे उमटे धरणाची मुख्य पाईपलाईन फ ुटल्याची माहिती सोशल मीडियावरून समोर आली. पाईपलाईन फुटल्याने हजारो लीटर पाणी वाया गेले असून, दुरुस्तीचे काम सुरू करण्यासाठी संपूर्ण पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे.

शुक्रवारपासून पाणीपुरवठा ठप्प झाल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. विशेषतः महिलावर्गाचे मोठे हाल होत आहेत. उमटे धरणात मुबलक पाणीसाठा असतानाही केवळ पाईपलाईन फुटल्याने ४० गावे आणि २२ वाड्यांमध्ये पाण्याचा दुष्काळ निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. या प्रकाराची स्थानिक प्रशासनाला वेळेत माहिती नसल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या कारभाराबाबतही नाराजी व्यक्त केली.

## वाघाच्या हल्ल्यात बैलाचा मृत्यू?

अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे. याबाबत त्यांनी परिसरातील स्थानिकांसह पोलीस पाटील यांच्याशीदेखील संपर्क साधून नागरिकांना जंगल भागात न जाण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, दिवीवाडी हा भाग त्यांच्या हद्दीत येत नसल्याचे त्यांनी सांगितले. वनपाल भोईर यांच्याशी संपर्क साधल्यावर त्यांनी सांगितले, दिवीवाडीमधील एका व्यक्तीच्या बैलावर वाघाने हल्ला केल्याची माहिती मिळाली आहे. घटनास्थळी जाऊन पाहणी करून पुढील कार्यवाही केली जाईल, असे त्यांनी आश्वासन दिले. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, जंगल भागातून जाताना काळजी घ्यावी, असे आवाहन वन विभागाकडून करण्यात आले आहे.

## सोमवारपासून बँक कर्मचारी संपावर

आहे. या तीन दिवसांच्या आंदोलनानंतर मागण्यांची दखल घेतली नाही, तर २६ ऑक्टोबरला बेमुदत संपाचा इशारा या कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

बँक युनियन्सची संयुक्त कृती समितीच्या वतीने हे आंदोलन करण्यात येणार आहे. पाच दिवसांचा आठवडा करण्या यावा, सरकारची एकतर्फी आणि भेदभावपूर्ण पीएलआय योजना मागे घेण्यात यावी. तसेच या योजनेची अंम लबजावणी स्थगित ठेवण्यात यावी, कामगार संघटनांशी द्विपक्षीय चर्चा करून योजनेत सुधारणा करण्यात यावी, अशा अनेक मागण्यांसाठी बँक अधिकारी व कर्मचारी संप करणार आहेत. रायगड जिल्ह्यातील तीन हजारांहून अधिक कर्मचारी या संपात सहभागी होणार आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये १२ सरकारी बँका असून, त्याअंतर्गत ३२२ शाखा येतात. त्यामध्ये १४६ ग्रामीण, ८९ निमशहरी आणि ८८ शहरी शाखांचा समावेश आहे. १२ बँकासह त्याअंतर्गत येणाऱ्या ३२२ शाखांचा कामकाज २८ ते ३० सप्टेंबर या कालावधीत बंद राहणार आहेत. त्याचा परिणाम जिल्ह्यातील लाखो ग्राहकांच्या सेवेवर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. जिल्ह्यात सरकारी बँकांचे एटीएम व पैसे भरणा केंद्र असले तरी यावर मोठा भार पडणार आहे. त्यामुळे बँकेतील कामकाज ठप्प होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. तीन दिवस होणाऱ्या संपाची दखल सरकारने घेतली नाही, तर २६ ऑक्टोबरला बेमुदत संपावर जाणार, असा इशारा बँक युनियन्सची संयुक्त कृती समितीच्या वतीने देण्यात आला आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री.सिद्धेश पंढरीनाथ पाटील रा. हनुमार मंदीराजवळ, पाटणी, इरवाडी, पोस्ट-तरणखोप, पेण रायगड यानी खालील वर्णनाची जमिन मिळकत सदर जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रविकुमार निलकंठ वाडेकर रा. निळकंठ फार्म, खानाव गाव, पनवेल, जिल्हा-रायगड यांचेकडून रजिस्टर्ड साठेकरार/अखत्यारपत्रानं विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन** जिल्हा रायगड, पोट तुकडी पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण यांचे कार्य क्षेत्रातील तलाठी सजा आंबेघर, मौजे धावटे येथील जमिन मिळकतीचे वर्णन ७/१२ वरुन खालील प्रमाणे -

| मौजे | सर्व्हे/ गट क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| धावटे | १४/१/ब/२/अ | ०--२०-३० | ४--४३ |

पैकी ०-०५-१५ हे.आर.चौ.मी.त्यासी आकार रु. ०-५४ पैसे ही जमिन विकत घेत आहेत. सदरची जमिन ही या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही विद्यमान जमिन मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर सदर जाहीर नोटीसीस वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरची जमिन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन सदर जमिनीवरील हक्क जाणीवपूर्वक माझे अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे असे समजून माझे अशिल विद्यमान मालकांबरोबर सदर जमिनीचा साठेकरार/अखत्यारपत्राचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण- रायगड.
दि. २७/०९/२०२६

सही /-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६,
तळ मजला, शिवाजी पथ पेण,
पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या मौजे चिंचोटी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | स. नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| चिंचोटी | १०४/२/अ | ०-२९-०० पो.ख.०-०५-१० ०-३४-१० | ७.३७ | १)श्री.नरेश दामोदर पाटील, २) सौ.राखी रमेश लोगडे. ३)सौ.श्रावणी संतोष पाटील, ४)सौ.स्मिता किरण ठाकुर. |
| चिंचोटी | १०४/२/ब | ०-२४-६० पो.ख. ०-०२-५० ०-२७-१० | ०५.४४ | १)श्रीम.मनिषा मधुकर पाटील २) श्री.नितेश मधुकर पाटील. ३)सौ.नंदीनी सुनिल कासकर |

सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेच्या त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरच्या मिळकती खरेदी करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २७/०९/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल श्री बाबु ठाकुर रा नेरुळ नवी मुंबई हे खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री नथुराम गोपाळ हरपुडे रा. कर्जत यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**बिनशेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे मुद्रे खुर्द, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील बिनशेतजमीन मिळकत सर्व्हे नं २२/१/अ/३ एकुण ०.०९.३३ गुंठे आर चौ.मी जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनांक : २७/०९/२०२३

ॲड देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

दि. २६/०९/२०२६

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी होवून विद्यमान मालक बाळू महादू बोडखे व संदिप बाळू बोडखे यांनी सदर मिळकतीचे विक्रीबाबत आमचे अशिलांस अखत्यारपत्र दिले आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर जमिन मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| वाघोलीवाडी ता.अलिबाग | १ | ०-७४-४० पो.ख. ०-०५-७० एकुण ०-८०-१० | १७.६९ |

वर वर्णन केलेली बाळू महादू बोडखे व संदिप बाळू बोडखे खाते नं.४२५ व ४३० यांचे सामाईक मालकीचे क्षेत्र या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. विकास हरिश्चंद्र पाटील**
युगंधर, शॉप नं.६, ब्राम्हण आळी,
युनियन बँकेजवळ, अलिबाग, जि.रायगड.
मोबा. नं. ७७९८८४४४३३

### जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक अनंत कृष्णा माने, वगैरे यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. असे असूनदेखील संदर्भित जमीन मिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने /व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ५०५ | ०-३६-०० | ०.६४ |

अलिबाग,
दिनांक : २७/०९/२०२६.

**शुभम वि. पाटील,**
ॲडव्होकेट.
वरसोली, नाईक आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ८६९८१३६३२६.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे नेवाळी ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकांचे नांव | स.नं./हि.नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| अनंता दगडू भागित | ४०/१०/अ ११ | १-०७ पैकी ४० गुंठे | ०-७५ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (दिवस) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हकरत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

**ॲड.अशोक पालू डुकरे**
रा.प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं.१०१
ममदापुर रोड, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

दिनांक : २७/०९/२०२६

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) शैलजा निळकंठ रावते, २) दिपक निळकंठ रावते, ३) दिलीप निळकंठ रावते, ४) हर्षदा हेमंत कोतवाल यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | १२६७/२ | ०-०५-१० पो.ख. ०-००-०० एकूण ०-०५-१० | २.८९ |

वर नमुद बागायत जमिन मिळकत व त्या मिळकतीमधील ग्रुप ग्रामपंचायत चौल हद्दीतील घर मालमत्ता क्र.२२९८ या मिळकतींचे

दिनांक: २७/०९/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

**K.T.S.P.M's**
**Law College, Khopoli**
(Approved by BCI, Govt.of Maharashtra & Affiliated to University of Mumbai)
Address: Near old Mumbai Pune Highway, Khopoli, Tal- Khalapur, DIst-Raigad-410 203
* Phone No-9850357228/8149171352
* Email ID:- ktspmlawcollege2024@gmail.com
ADMISSION NOTICE FOR ACADEMIC YEAR 2025-26
FOR FIRST YEAR LL.B (3 Years) COURSE AGAINST CAP VACANCYROUND (As Per CET Cell Rules) & MANAGEMENT ROUND

COLLEEG CODE-24079

| Sr. No | Choice Code | CourseName | Duration | Sanctioned Intake | Institutional Level Vacant Seats |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2407910812 | LL.B (3Years) | 3 Years | 60 | 9 |

Admission will be on the basis of inter-se merit of candidates who have applied to the Institute in the prescribed from within the due date and on the basis of rules published in the information Brochure by the Govt. of Maharashtra, State common Entrance Test Cell, for admission for A. Y. 2025-26

Admission Schedule: Sale & Acceptance of Application form From 27/09/2026 To 01/10/2026 between 10.00am to 5.00 p.m.

Eligibility Criteria-Please refer information brochure of Govt. of Maharashtra, State Common Entrance Test Cell,(MS) for Admission to full time Professional degree course i.e. LL.B (3 Years) for A. Y. 2026-27.

(Santosh G. Jangam)
Chairman, KTSP
MandalKhopoli

**(Mr. Narendra C. Shah)**
Chairman, KTSPM's Law College Khopoli

# बारा दिवसांची सेवा अन् भावपूर्ण निरोप

रायगड जिल्ह्यात बाप्पाची १२ दिवस सेवा केल्यानंतर अनंत चतुर्दशी निमित्ताने शुक्रवारी (दि.२५) बाप्पाला वाजत-गाजत भावपूर्ण निरोप देण्यात आला. यादरम्यान, घरगुतीसह सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची विसर्जन मिरवणूक उत्साहात पडली. तसेच, पारंपारिक ढोल ताशांसह भजन, आरतीने संपुर्ण जिल्हा दुमदूमून गेला होता. यावेळी जिल्ह्यातील समुद्र, तलाव, नदी व कृत्रीम तलावांमध्ये बाप्पाच्या मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. सायंकाळी ४.०० वाजल्यापासून विसर्जन मिरवणूकीला सुरुवात करण्यात आली. काही ठिकाणी लेझीम, भजन, तर काही ठिकाणी ढोल ताशांच्या गजरात बाप्पाची मिरवणूक काढण्यात आली. तर, काही ठिकाणी गणेशमुर्ती डोक्यावर घेऊन तर काही ठिकाणी मुर्ती टेम्पो व गाडीतून विसर्जन स्थळी नेण्यात आली. यादरम्यान, विसर्जन घाटावर भाविकांनी अलोट गर्दी झाली होती. आरती, पुजन झाल्यानंतर गणेशमुर्तीचे विसर्जन करण्यात आले. रात्री उशीरापर्यंत चालू असलेला विसर्जन मिरवणुकीचा सोहळा आनंदात साजरा व्हावा, यासाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली होती. दरम्यान, डिजेच्या जोरदार आवाजावरही नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला.





(छायाचित्र : समीर मालोदे)



## ‘पोलादपूरचा राजा’चे विसर्जन

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

अनंत चतुर्दशी मुहूर्तावर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पोलादपूरचा राजाला भक्तीमय वातावरणात निरोप देण्यात आला. उत्तर वाहिनी सावित्री नदीच्या पात्रात दरवर्षी प्रमाणे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या गणपतीचे विसर्जन करण्यात आले. विविध उपक्रमांद्वारे साजरा झालेला पोलादपूर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या ‘पोलादपूरचा राजा’ चे अनंत चतुर्दशीला सकाळी आरती व उत्तरपूजा झाल्यानंतर नागरिकांच्या सहभागातून १०१ ताटांचा महानैवेद्य स्विकारून विसर्जन मिरवणूकीने नगर प्रदक्षिणा घालण्यासाठी निघाला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष अमर नगरकर, कार्याध्यक्ष प्रतिक सुर्वे, आजी-माजी पदाधिकारी स्वप्नील भुवड, दर्पण दरेकर, आदेश गायकवाड, ज्येष्ठ मार्गदर्शक प्रसन्ना पालांडे, नगरपंचायत विरोधी पक्ष नेते दिलीप भागवत आदींसह गणेशभक्त सहभागी झाले होते. दरम्यान, मिरवणुकीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच वाहतूक व्यवस्था राखण्यासाठी पोलादपूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे, उपनिरीक्षक सतीश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्यातील सर्व पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.



(छायाचित्र : शैलेश पालकर)



## आतषबाजी करीत विसर्जन मिरवणूक

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगावसह तालुक्यातील १३ सार्वजनिक व ७४१ घरगुती गणपतींना शुक्रवारी भावपूर्ण निरोप देत उत्साहात विसर्जन करण्यात आले. यावेळी तालुक्यात ग्रामीण भागातील श्री गणेश मित्रमंडळ पवारवाडी-सुर्ले यांचा गणेशोत्सव विशेष आकर्षण ठरला. त्याचबरोबर माणगाव नगरीतील साईनगरचा राजा, जय हनुमान मित्रमंडळ उतेखोलवाडी, एकलव्य मित्रमंडळ नाणोरे आदिवासीवाडी, ढालघरचा राजा यांच्या भव्य मिरवणुकांनी गणेश भक्तांचे लक्ष वेधले होते. या मंडळांनी शुक्रवारी सायंकाळी ४.०० वाजल्यापासून वाजत-गाजत, नाचत, फटाक्यांची जोरदार आतषबाजी करीत विसर्जन मिरवणूक काढली होती. त्यानंतर रात्री ९.०० वाजता मोर्बा येथील काळनदीत उत्साहात विसर्जन करण्यात आले.

## पेणमध्ये दुमदुमला बाप्पाचा जयघोष

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेणमध्ये शुक्रवारी अनंत चतुर्दशीच्या दिवशी लाडक्या गणरायाला भक्तीमय वातावरणात निरोप देण्यात आला. यावेळी ‘‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’’च्या जयघोषात शहरासह ग्रामीण भागातील गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यादरम्यान, पेण शहरातील भोगावती नदी विसर्जन घाटावर गणेशभक्तांची मोठी गर्दी झालेली पाहायला मिळाली.



शुक्रवारी पेण तालुक्यातील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसह घरगुती गणपतींच्या सवाद्य मिरवणुका शहरातून मार्गक्रमण करत होत्या. यावेळी ढोल-ताशांच्या गजराने आणि गणरायाच्या जयघोषाने शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते. यादरम्यान, पेण तालुक्यातील वीज कर्मचारी मंडळ, रिक्षा चालक-मालक संघटना, न्यू स्टार मित्र मंडळ तरेआळी, ईगल ग्रुप मित्र मंडळ नंदीमाळ नाका, आंबेगाव आणि शेणे येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसह एकूण ६ सार्वजनिक गणपतींचे सवाद्य मिरवणुकीने विसर्जन करण्यात आले. तसेच, ग्रामीण भागातील गणपतींचे संबंधित गावांतील नदीपात्र आणि तलावांमध्ये विसर्जन करण्यात आले. दरम्यान, पेणमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक, नंदीमाळ नाका आणि विसर्जन घाटावर शांतता समिती, पोलीस प्रशासन आणि नगरपरिषदेच्यावतीने गणेशभक्तांचे स्वागत करण्यात आले. तसेच, नदीपात्रात नागरिकांनी उतरू नये आणि विसर्जनावेळी सुरक्षेची काळजी घ्यावी, असे आवाहन देखील प्रशासनाकडून करण्यात आले.



अलिबाग तालुक्यातील महाजने येथे गणेशमुर्ती डोक्यावर घेऊन जाताना गणेश भक्त

## मुरूडमध्ये १,९०० मूर्तींचे विसर्जन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

गेल्या ११ दिवसांपासून सुरू असलेल्या गणेशोत्सवाची सांगता भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाली. यावेळी बाप्पाच्या जयघोषात मुरुड शहरासह परिसरातील तब्बल १ हजार ९०० गणपती मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. शुक्रवारी गणरायाला निरोप देण्यासाठी सकाळपासूनच गणेशभक्तांची लगबग सुरू होती. विसर्जन मिरवणुकांमध्ये फटाक्यांची आतिषबाजी, ढोल-ताशांचा गजर, टाळ-मृदंगाचा ठेका आणि गणपती बाप्पाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. तसेच, विसर्जन मिरवणुका शांततेत व सुरळीत पार पडाव्यात यासाठी मुरूड पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस मकरंद पाटील यांच्याकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)






● श्री. सुमित सुरेश जगदाळे, मु. किहीम, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना किहीम सरपंच प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड



● मुरुड लक्ष्मीखार येथील कल्पेश माळी यांच्या घरच्या कागदापासून तयार केली १० फूट श्री गणेश मूर्ती (छायाचित्र : सौरभ नाझरे)



● मुरूड मधील श्री डॉ. मयूर राज कल्याणी यांच्या घरची सुबक श्री गणेश मूर्ती. मूर्तीकार भाऊ भगत (छायाचित्र : सौरभ नाझरे)






● मु. मुनवली, ता. अलिबाग येथील घाडी बंधू यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची सुबक मूर्ती व आकर्षक देखावा. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● मु. मुनवली, ता. अलिबाग येथील घाडी बंधू यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीची सुबक मूर्ती व आकर्षक देखावा. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● मुरूड एकदरा येथील पंढरीनाथ कमलाकर वाघरे यांच्या घरची श्री गणेश मूर्ती (छायाचित्र : सौरभ नाझरे)

# म्हसळा तालुक्यातील शेतीक्षेत्र ओस

## • नाचणी, वरी, तिळाची शेतीचा लोप

। म्हसळा । प्रतिनिधी ।

एकेकाळी म्हसळा तालुक्यात नाचणी, वरी आणि तिळाची शेती मोठ्या प्रमाणात केली जात होती. या पारंपरिक पिकांमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना उत्पन्नाबरोबरच स्थानिक पातळीवर अन्नधान्याची उपलब्धताही मोठ्या प्रमाणात होत होती. विशेषतः तिळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जात असल्याने पूर्वी गावोगावी तेल काढण्यासाठी घाणी चालत असत. मात्र, गेल्या काही वर्षांत जंगली प्राण्यांचा वाढता उपद्रव आणि रोजगाराच्या शोधात वाढते स्थलांतर शेतीसाठी मोठी समस्या ठरत आहे. त्यामुळे तालुक्यातील बहुतांश शेती ओस पडू लागल्या आहेत.



एकेकाळी म्हसळा तालुक्यातील सांगवड, ठाकरोली, कोकबल, घूम, कोळे, तळवडे, पानवे, केलटे, नेवरूळ, जांभूळ इत्यादी परिसरात नाचणी, वरी आणि तिळाची शेती मोठ्या प्रमाणात केली जात होती. तालुक्यातील अनेक शेतकरी प्रत्येक पिकाचे दहा-पंधरा मणांपर्यंत उत्पादन घेत असत. नाचणी, वरी आणि तिळासारखी पिके केवळ शेतीपुरती मर्यादित नव्हती, तर ती म्हसळ्याच्या ग्रामीण संस्कृती आणि पारंपरिक आहाराचा महत्त्वाचा भाग होती. तिळाच्या उत्पादनातून चालणाऱ्या घाणीपासून ते शेतकऱ्यांच्या घरातील धान्याच्या कोठारापर्यंत या पिकांचा ग्रामीण जीवनाशी जवळचा संबंध होता. या पारंपरिक पिकांमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना उत्पन्नाबरोबरच स्थानिक पातळीवर अन्नधान्याची उपलब्धताही मोठ्या प्रमाणात होत होती. विशेषतः तिळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जात असल्याने पूर्वी गावोगावी तेल काढण्यासाठी घाणी चालत असत. तिळापासून तेल काढण्याचा हा पारंपरिक व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक भाग होता. मात्र, आज तिळाचे पीकच मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने त्या जुन्या घाणीही जवळपास इतिहासजमा झाल्या असून, पूर्वीच्या ग्रामीण जीवनशैलीची आठवण करून देणारे हे चित्र आता क्वचितच पाहायला मिळते.

गेल्या काही वर्षांत जंगली प्राणी, माकडे तसेच इतर वन्यजीवांचा वाढता उपद्रव शेतीसाठी मोठी समस्या ठरत आहे. पिके तयार होत असतानाच वन्यप्राण्यांकडून मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्चही वसूल होत नाही. त्यामुळे नाचणी, वरी आणि तिळासारखी पारंपरिक पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल कमी होत गेला. त्यातच गावागावांत रोजगाराच्या मर्यादित संधी असल्याने तरुणांसह अनेक कुटुंबांनी रोजगारासाठी मुंबईसह अन्य शहरांकडे स्थलांतर केले. परिणामी शेतीकडे दुर्लक्ष वाढले आणि अनेक शेतजमिनी हळूहळू पडीत पडू लागल्या. कधीकाळी पावसाळ्यात हिरवीगार दिसणारी शेती आज अनेक ठिकाणी गवत आणि झाडाझुडपांनी व्यापलेली दिसत आहे.

पारंपरिक शेतीचे संवर्धन करण्यासाठी वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण, शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, सिंचन व शेतीसाठी आवश्यक सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि गावपातळीवर रोजगारनिर्मिती यावर भर देण्याची गरज आहे. अन्यथा नाचणी, वरी आणि तिळाच्या शेतांसोबतच गावोगावी दिसणाऱ्या पारंपरिक तेलघाण्यांची आठवणही पुढील पिढ्यांसाठी केवळ इतिहासातच उरेल, अशी भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# ‘वापरात नसलेली जमीन परत करा’

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पाली भूतिवली येथे लघुपाटबंधारे प्रकल्प बांधण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीं घेण्यात आल्या. मात्र, त्यापैकी अनेक जमिनी या ५० वर्षानंतर देखील वापराविना पडून आहेत. अशा सर्व वापरात नसलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्यात याव्यात, अशी मागणी केली आहे. ही मागणी पाली भूतिवली धरण प्रकल्पग्रस्त समितीच्यावतीने राज्याचे महसूल मंत्र्यांसह अनेकांकडे केली असून, आता प्रांत अधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे केली आहे.



पाली भुतिवली धरण प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या पुनर्वापराचावत जमीन मुळ मालकास परत मिळण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. धरण जाहीर झाल्यावर शेतकऱ्यांच्या जमिनी काही शे रुपयांच्या मोबदला देऊन शासनाने घेतल्या आहेत. त्यातील बहुतांश जमिनीवर कोणत्याही प्रकारचे काम झालेले नाही आणि त्या जमिनी अद्याप तशाच पडून आहेत. पाली भुतिवली धरण प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या काही जमिनी प्रकल्पाच्या प्रयोजनासाठी सध्या वापरात नसल्याने सदर जमिनीचा पुनर्वापर करून त्या मुळ जमीनधारकास परत मिळणेबाबत संबंधित जमीनधारक यांच्याकडून मागणी केली जात आहे. या प्रस्तावित जमिनीच्या अभिलेखावर लघु पाटबंधारे विभागाचे नाव आहेत. त्यामुळे या जमिनीबाबत प्रकल्पाच्या दृष्टीने सद्यस्थितीत कोणतीही आवश्यकता आहे अथवा कसे, तसेच ही जमीन प्रकल्पासाठी आवश्यक नसल्यास ती मुळ जमीनधारकास परत करण्याबाबत महसूल विभागाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

## महात्मा फुले गुणगौरव परीक्षेचे आयोजन

। खरोशी । प्रतिनिधी ।

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षण, समता, सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समानता, जातिभेद निर्मूलन आणि शोषित-वंचितांच्या हक्कांसाठी केलेले कार्य भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण पर्व आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा परिचय विद्यार्थ्यांपासून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत व्यापकपणे व्हावा, त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाचा अभ्यास व्हावा आणि त्यांच्या विचारांमधून समता, न्याय व बंधुतेची मूल्ये समाजजीवनात रुजावीत, या उद्देशाने राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघातर्फे महात्मा फुले द्विशताब्दी गुणगौरव परीक्षा आयोजित करण्यात येत असल्याची माहिती राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले व सरचिटणीस संतोष भोजणे यांनी सांगितले. ही परीक्षा केवळ प्रश्नांची उत्तरे देण्यापुरती मर्यादित नसून, महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा, विचारांचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या योगदानाचा अभ्यास करण्याची एक सुवर्ण संधी आहे.

# सिडकोच्या कामगारांना न्यायालयाचा दिलासा

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।


नवी मुंबई आणि पनवेल परिसरातील सिडकोच्या रेल्वे स्थानकांवर स्वच्छता आणि देखभालीचे काम करणाऱ्या २६७ कामगारांना औद्योगिक न्यायालयाने दिलासा दिला आहे. सिडकोच्या ताब्यातील रेल्वे स्थानकांचे मध्य रेल्वेकडे हस्तांतरण सुरू असताना या कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर आझाद कामगार संघटनेने न्यायालयात धाव घेतली होती.

ठाणे औद्योगिक न्यायालयाने दि.२१ सप्टेंबर रोजी अंतरिम आदेश देताना संबंधित कामगारांना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय सेवेतून कमी करू नये, तसेच त्यांच्या सध्याच्या रोजगाराची आणि वेतनाची स्थिती कायम ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. हा आदेश पुढील सुनावणीपर्यंत लागू राहणार आहे. सिडकोच्या ताब्यातील नवी मुंबईतील रेल्वे स्थानके टप्प्याटप्प्याने मध्य रेल्वेकडे हस्तांतरित करण्यात येत आहेत. त्यामध्ये खारघर, खांदेश्वर आणि मानसरोवर यांसारख्या पनवेल परिसराशी संबंधित स्थानकांचाही समावेश आहे. स्थानकांचे व्यवस्थापन बदलल्यानंतर तेथे स्वच्छता आणि देखभालीचे काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या रोजगाराचे काय होणार, असा प्रश्न उपस्थित झाला होता. आझाद कामगार संघटनेने कामगारांच्या रोजगाराचे संरक्षण करण्याची मागणी केली आहे. सिडकोच्यावतीने हे कामगार थेट सिडकोचे कर्मचारी नसून कंत्राटदारामार्फत काम करतात, अशी भूमिका न्यायालयात मांडण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या प्रकरणातील पुढील सुनावणी महत्त्वाची ठरणार आहे.

## सटू वाफिलकर यांचे निधन

। कोलाड । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील गोवे गावातील रहिवाशी सटू रामजी वाफिलकर यांचे सोमवारी (दि.२१) निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात त्यांची



पत्नी, सून, एक मुलगी, पुतणे, नातवंडे तसेच मोठ वाफिलकर परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी बुधवार दि.३० सप्टेंबर रोजी, तर उत्तर कार्य विधी शुक्रवार दि.२ ऑक्टोबर रोजी गोवे येथील त्यांच्या राहत्या निवास्थानी होणार आहेत, अशी माहिती वाफिलकर कुटुंबियांकडून देण्यात आली.

# प्रथमेश म्हात्रेची दुहेरी सुवर्ण कामगिरी

। चिरनेर । प्रतिनिधी ।

मुंबई विद्यापीठाच्यावतीने ५९व्या युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाच्या अंतिम फेरीत रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थी प्रथमेश म्हात्रे याने आपल्या कलागुणांची उल्लेखनीय छाप उमटवली आहे. त्याने क्ले मॉडेलिंग आणि पोस्टर मेकिंग या दोन्ही स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदकाचा मान मिळविला आहे. प्रथमेशच्या या दुहेरी सुवर्ण कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्याच्या यशाने महाविद्यालयाच्या कलाक्षेत्रातील लौकिकात आणखी भर पडली आहे.



प्रथमेशने आपल्या सर्जनशीलतेचा, कलात्मक कल्पनाशक्तीचा आणि कौशल्याचा प्रभावी आविष्कार सादर करत दोन्ही स्पर्धांमध्ये सुवर्णपदक प्राप्त केले. एकाच युवा महोत्सवाच्या अंतिम फेरीत दोन स्वतंत्र कला प्रकारांत सुवर्णपदक मिळविण्याची ही कामगिरी महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रथमेश म्हात्रे याचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष पी.जे. पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील, सुधीर घरत, भावना घाणेकर, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, उपप्राचार्य डॉ. संदीप घोडके तसेच सांस्कृतिक समितीच्या चेअरमन डॉ. सुजाता पाटील यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले.

# माथेरानकरांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

## चेंबर्स तुंबल्याने दुर्गंधीयुक्त सांडपाणी रस्त्यावर

। माथेरान । प्रतिनिधी ।

माथेरानमधील बहुतांश भागातील रेस्टॉरंट व हॉटेल्समधील सांडपाणी जवळच्या चेंबर्समधून जात असते. परंतु, कमी व्यासाच्या पाईपमुळे किचन मधील उष्टांन्न, खरकटे यांच्यासह वाटी चमचे त्यात अडकून चेंबर्स तुंबतात. त्यामुळे हे सांडपाणी थेट रस्त्यावरून वाहत असून, त्या त्या भागात दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.



(छायाचित्र : मुकुंद रांजाणे)

माथेरानमधील मेजवानी रेस्टॉरंट, मोरया रेस्टॉरंट आणि शेलार उपहारगृह या तीनही किचन मधील उष्टान्न, खरकटे पदार्थ एकाच ठिकाणी असणाऱ्या चेंबर्स मधुन जाते. परंतु, या उष्टान्न सोबतच वाट्या-चमचे सुद्धा जात असल्याने चेंबर्स पूर्णपणे चॉकप होते आणि हे सर्व सांडपाणी सुयोग रेस्टॉरंटच्या समोरून वाहते. त्यामुळे या भागातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून, दुर्गंधीमुळे सुयोग रेस्टॉरंट मध्ये पर्यटक येण्यास टाळाटाळ करत आहेत. त्याचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर झाला आहे. नगरपरिषद प्रशासन आणि संबंधित लोकप्रतिनिधी लाखो रुपये खर्च करून गटारे बांधण्याचा अट्टाहास करताना दिसतात. परंतु, नागरिकांना अपेक्षित असणाऱ्या मूलभूत सुविधा देण्यासाठी अकार्यक्षम दिसत आहेत. याकामी आरोग्य सभापतींनी ठोस पावले उचलून नागरिकांच्या आरोग्या बाबतीत उद्भवणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न करून आपल्या पदाला न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## कर्जतमध्ये लोक अदालतीचे आयोजन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत उपविभागीय अधिकारी कक्षेत असलेली महसूली प्रकरणे निकाली काढण्यासाठी दि.५ ऑक्टोबर आणि दि.१२ डिसेंबर अशा दोन दिवशी लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. जुन्या महसुली दावे आणि प्रकरणे यांचा निपटारा करण्यासाठी लोक अदालत भरवण्यात आली आहे.

महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि अपर जिल्हाधिकारी यांचेकडील अर्धन्यायिक कामकाजामध्ये महसूली दावे चालवले जातात. त्यात अनेक वेळा महसूली दावे दाखल झाल्यानंतर विविध कारणांमुळे प्रकरणे प्रलंबित राहतात. त्यात अनेकदा पक्षकारांना न्याय मिळवून घेण्यासाठी दिर्घकाळ प्रतिक्षा करावी लागते. त्यामुळे महसूल मंत्र्यांच्या निर्देशानुसार महसूल विभागातील अपील प्रकरणांचा जलद निपटारा होणेसाठी महसूल लोक अदालत घेण्यात येत आहे. ही लोक अदालत कर्जत येथील प्रशासकीय भवनातील उपविभागीय अधिकारी कार्यालयात होणार आहे. त्यामध्ये सुरु असलेल्या सर्व अपिलामधील पक्षकारांना तसेच प्रकरणातील सर्व विधीज्ञ यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्रांत अधिकारी प्रकाश संकपाल यांनी केले आहे.

व्यावसायिकांकडून कार्यालयांसाठी जागांचा शोध | कंपन्यांकडून उलवे-पुष्पकनगर परिसराला पसंती

# विमानतळ परिसरातील जागांना वाढती मागणी

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवासी सेवेसोबतच कार्गो वाहतुकीला देखील चांगला प्रतिसाद मिळत आहे. या पार्श्वभूमिवर विमानतळाशी संबंधित व्यवसायांची हालचालही वाढू लागली आहे. कार्गो हाताळणी, सीमाशुल्क प्रक्रिया, मालवाहतूक, निर्यात-आयात आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील काही कंपन्यांकडून विमानतळाच्या आसपास कार्यालयांसाठी जागांचा शोध घेतला जात असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे नवी मुंबई विमानतळालगतच्या उलवे,




पुष्पकनगर आणि द्रोणागिरी परिसरातील व्यावसायिक जागांना आगामी काळात मागणी वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

नवी मुंबई विमानतळावर आंतरराष्ट्रीय मालवाहतूक सुविधा विकसित करण्यात आल्या आहेत. औषधे, नाशवंत माल, शीतसाखळीतील माल, अवजड माल आणि अन्य प्रकारच्या मालाची हाताळणी करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे मालवाहतूक करणाऱ्या कंपन्यांना विमानतळाजवळ कार्यालय असणे अधिक सोयीचे ठरणार आहे. अलीकडेच कॅथे कार्गोने मुंबईतील आपली मालवाहू विमानसेवा नवी मुंबई विमानतळावर हलविली असून, दि.२१ सप्टेंबरपासून हाँगकाँगसाठी आठवड्यातून तीन मालवाहू उड्डाणे सुरू झाली आहेत. याशिवाय फेडएक्सकडून विमानतळावर सुमारे ३ लाख चौरस फुटांचे स्वयंचलित मालवाहतूक केंद्र उभारले जात आहे. या घडामोडींमुळे विमानतळाभोवती मालवाहतूक व्यवसायाचे जाळे विस्तारण्याची शक्यता वाढली आहे. तसेच विमानतळ, जेएनपीए, औद्योगिक क्षेत्र आणि महामार्गांची जवळीक लक्षात घेता या भागात कार्गो एजंट, सीमाशुल्क प्रतिनिधी, मालवाहतूकदार, गोदाम सेवा आणि निर्यात-आयात व्यवसायांना कार्यालयांची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे विमानतळ सुरू झाल्यानंतरच नव्हे, तर सेवा विस्ताराच्या आधीपासूनच या व्यावसायिक क्षेत्राची पायाभरणी होत असल्याचे चित्र आहे.

विमानतळाभोवती कार्यालयीन जागांची मागणी वाढल्यास त्याचा परिणाम व्यावसायिक इमारती, गोदामे, वाहतूक सेवा आणि अन्य पूरक व्यवसायांवरही होऊ शकतो. त्यामुळे विमानतळाच्या धावपट्टीबरोबरच परिसरातील व्यावसायिक हालचालींनाही वेग येण्याची चिन्हे दिसत आहेत.

# निवडक



## रोटरी क्लबतर्फे रक्तदान शिबीर

**रोहा :** रोटरी क्लब रोहा सेंट्रल आणि जय गणेश मित्र मंडळ भुवनेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने व जिल्हा रक्तसंक्रमण केंद्राच्या विशेष सहकार्यातून बुधवारी (दि.२३) रक्तदान शिबीर संपन्न झाले. यावेळी ५० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली. यावेळी रोटरी क्लब रोहा सेंट्रल अध्यक्ष लक्ष्मण मोरे, जय गणेश मित्र मंडळ अध्यक्ष नितीन माने, उपाध्यक्ष प्रवीण शिर्के, रोटरी क्लब रोहा सेंट्रलचे डायरेक्टर तसेच रोहा नगरपरिषद सभापती मयूर दिवेकर, प्रेसिडेंट ईलेक्ट राकेश कागडा, विजय दिवकर, निखिल दाते, रामा नाकती, रुपेश पाटील, दिलीप देशमुख, दिपक सिंग, खजिनदार रुपेश चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी जिल्हा रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. दिपक गोसावी व सर्व टीमने उत्तम सहकार्य केले.

## कोलाड-रोहा रस्ता अंधारात

**कोलाड :** कोलाड-रोहा मुख्य मार्गावरील पाले बुद्रुक स्टॉप ते स्मशानभूमीपर्यंतची रोडलाईट गेल्या तीन महिन्यांपासून बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे या मार्गावर रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले असून, नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. कोलाड-रोहा मार्गावर धाटाव येथे एम.आय,डी.सी कंपनी असल्यामुळे या मार्गावरून कामानिमित्त ये-जा करणारा कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात प्रवास करीत असतो. तसेच, हा रस्ता मुंबई-गोवा महामार्गाला जोडणारा महत्त्वाचा मार्ग असल्याने रोहा तसेच परिसरातून नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. तसेच, या मार्गांवरून कोलाड परिसरातील असंख्य नागरिक रोहा येथे पहाटेच्या सुमारास रेल्वे प्रवासासाठी जात असतात. विशेष म्हणजे पाले बुद्रुक येथील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ताही याच मार्गावरून जात असल्याने या मार्गावर असणाऱ्या झाडा झुडपांमुळे रात्रीच्या वेळी नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे.



## आसुडगाव येथील महिला बेपत्ता

**पनवेल :** आसुडगाव येथील शिवसाई अपार्टमेंटमधून अजिता अतुल बोटे (२७) या महिला कोणाला काहीही न सांगता घरातून निघून गेल्या आहेत. त्यानंतर त्या घरी परतलेल्या नसून, खांदेश्वर पोलीस ठाण्यात हरविल्याची नोंद करण्यात आली आहे. या बेपत्ता महिलेची उंची सुमारे ५ फूट असून अंगाने सडपातळ, चेहरा उभट, नाक सरळ, डोळे काळे, लांब केस आहेत. तसेच, उजव्या हाताच्या मनगटावर ‘अतुल’ नावाचा टॅटू असून, अंगात काळ्या-पांढऱ्या रंगाचा पंजाबी ड्रेस, कानात पिवळ्या धातूच्या रिंगा आणि गळ्यात मंगळसूत्र घातले होते. या महिलेबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास खांदेश्वर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे पोलिसांनी आवाहन केले आहे.



## विजेत्या अर्जदारांना नोंदणीचे आवाहन

**नवी मुंबई :** सिडकोच्या ‘‘माझे पसंतीचे सिडकोचे घर’’ गृहनिर्माण योजनांतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्या विजेत्या अर्जदारांनी यापूर्वी प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत नोंदणी केलेली नसल्यास, त्यांनी तात्काळ नोंदणी करावी, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात येत आहे. २.५० लाख रुपयांच्या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी पात्र अर्जदारांनी अंतर्गत नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच, अनुदानाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता लवकरात लवकर करणे आवश्यक असल्याचे सिडकोने कळविले आहे. प्रवर्गातील गृहनिर्माण योजनांमध्ये तळोजा सेक्टर २८ व ३९, खारघर बस डेपो सेक्टर १४, खारकोपर प्लॉट क्र. २ए व २बी आणि सेक्टर १६ ए, कळंबोली बस डेपो सेक्टर १७, बामणडोंगरी व उलवे या ठिकाणांचा समावेश आहे. कागदपत्रे किंवा फी विहित मुदतीत सादर/भरली न केल्यास वाटप केलेली सदनिका रद्द होऊ शकते, असे देखील सिडकोच्या जनसंपर्क विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## किल्ले रायगडावर दुर्दैवी मृत्यू

**महाड :** किल्ले रायगडावर हजारो शिवभक्त व पर्यटक येत असतात. अशातच एक दुदैवी घटना घडली. सातारा जिल्ह्यातील शिवप्रेमी पर्यटक दिपक गोसावी (६३) हे किल्ले रायगडावर आले होते. ते किल्ल्याची पाहाणी करत असताना हत्ती तलाजवळ गेले. त्यावेळी त्यांचा अचानक तोल गेल्याने ते घसरून खाली पडले. त्यामुळे त्यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने ते बेशुद्ध पडले. तात्काळ त्यांना महाड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता उपचारादरम्यान दिपक गोसावी यांचा मृत्यू झाल्याचे येथील वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले.तसेच, मृतदेह शवविच्छेदन करून नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आल्याचे महाड पोलीस निरीक्षक अभिजित नेवासे यांनी सांगितले असून, पुढील तपास पोलीस ठाणे करीत आहेत.

## सायबर क्राईमवर मार्गदर्शनपर व्याख्यान

**महाड :** रोटरी क्लब महाडच्यावतीने सध्याच्या काळातील अत्यंत ज्वलंत आणि गंभीर विषय असलेल्या ‘सायबर क्राईम व सायबर सिक्युरिटी’ या विषयावर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवारी (दि.२७) सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेचार वाजता येथील श्री वीरेश्वर महाराज मंदिर सभागृहत होणार आहे. या कार्यक्रमासाठी महाड तालुक्याचे प्रदीप काळे, ॲड. रोशन पांढरे, लीगल एक्स्पर्ट व सायबर क्राईम कायदेतज्ज्ञ यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. सायबर फसवणूक, ऑनलाइन आर्थिक गुन्हे, सोशल मीडिया गैरवापर, डिजिटल सुरक्षितता तसेच सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे आणि कुटुंबाचे संरक्षण कसे करावे, याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच, उपस्थितांच्या प्रश्नांना तज्ज्ञांकडून उत्तरे देण्यात येणार आहेत.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**
२७ सप्टेंबर
१) श्री.भारतनंदन काशिनाथ राणे रेवस रोड, अलिबाग, २७-९-१९४६
२) श्री.मधुकर दत्तात्रेय देवळे मु.नागाव, अलिबाग, २७-९-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ अलिबाग**

**विश्वनाथ (विलास) निगळ्ये, ठाणे**



**कै. मधूकर काशीनाथ पुनतांबेकर, स्मरणार्थ अलिबाग**

**कै. दत्तात्रय कृष्णाजी पराडकर, स्मृतिदिन, अलिबाग**

**श्री. विजय लेले, वेश्वी, अलिबाग**

# महसूल मंडळ कार्यालय कोसळण्याच्या स्थितीत

- **अधिकारी-कर्मऱ्यांचा जीव धोक्यात**
- **दररोज शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने वर्दळ**



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत प्रशासकीय भवनाच्या बाजूला कर्जत महसूल मंडळ अधिकारी कार्यालय आहे. या जुन्या बैठया चाळीतील कार्यालयात मंडल अधिकारी आणि साह तलाठी यांची कार्यालये आहेत. त्या ठिकाणी सुट्टीचे दिवस वगळता दररोज शेतकऱ्यांची वर्दळ असते. महसूल मंडळ अधिकारी आणि तलाठी तसेच कारकून असे अधिकारी कर्मचारी वर्गाची उठबस असलेल्या करजत महसूल मंडळ अधिकारी कार्यालयाचे छत कोसळण्याच्या स्थिती आले आहे. सुरक्षेचे दृष्टीने ते छत तात्काळ दुरुस्त करून घेण्यात यावे अशी मागणी शेतकरी आणि तालुक्यातील महसुली कामासाठी येणारे यांच्याकडून होत आहे.

कर्जत तालुक्यातील प्रशासकीय भवनासमोर असलेल्या चिंचवली, कर्जत, कशेळे मंडळ अधिकारी कार्यालयाची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याचे दिसून येत आहे. कार्यालयाच्या इमारतीच्या भिंती जीर्ण झाल्या असून छताचीही मोठ्या प्रमाणात झीज झालेली आहे. काही ठिकाणी छताचा भाग तुटलेला असून इमारतीमध्ये पावसाचे पाणी व ओलावा यामुळे परिस्थिती आणखी गंभीर झाल्याचे चित्र आहे.

या कार्यालयात नागरिकांची विविध शासकीय कामांसाठी ये-जा सुरू असते. तर महसूल मंडळ अधिकारी आणि तलाठी तसेच कर्मचाऱ्यांची कामकाजाचे हे ठिकाण आहे. या झालेल्या जीर्ण इमारतीमध्ये अधिकारी-कर्मचारी काम करत असताना अचानक छताचा किंवा भिंतीचा भाग कोसळल्यास मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचवेळी कार्यालयाच्या परिसरात अस्वच्छता, भिंतींवर शेवाळ तसेच इमारतीच्या छतावर गवत तसेच कार्यालयाच्या आजूबाजूला गवतच उगवलेले दिसत आहे.

त्यामुळे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने या इमारतीची तातडीने पाहणी करून धोकादायक भागाची दुरुस्ती करावी अथवा सुरक्षित पर्यायी कार्यालयाची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण होण्यापूर्वी प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

## श्रीकृष्ण जन्माष्टमीचे आयोजन

**नागोठणे :** आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) नागोठणे यांच्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमी आनंदोत्सव २०२६ कार्यक्रमाचे आयोजन रविवारी (दि. २७) सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे. नागोठणे येथे यंदा दुसऱ्या वर्षी या आनंदोत्सवाचे आयोजन करण्यात येत असून, परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रीकृष्ण जन्माष्टमीचा आनंदोत्सव साजरा करावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. हा कार्यक्रम आराधना भवन, नागोठणे येथे दुपारी ४ ते रात्री ९ वाजेपर्यंत होणार आहे. कार्यक्रमामध्ये नगर संकीर्तन, भक्तीगीते, नृत्य, श्रीकृष्ण कथा व आध्यात्मिक प्रवचन, ५६ भोग अर्पण तसेच महाआरती अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचा समावेश आहे. इस्कॉन नागोठणेचे प्रमुख निताई दास यांच्या वतीने नागोठणे व परिसरातील सर्व भाविकांनी या सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ पाणी



**खांदा कॉलनी :** पनवेलमध्ये सध्या अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ एका बाजूला मोठ्या प्रमाणावर पाणी साचत आहे. पनवेल परिसरात डेंग्यू आणि मलेरियाच्या रुग्णांची संख्या वाढत असल्याच्या पाशर्वभूमीवर रेल्वे स्थानक परिसरात साचलेल्या पाण्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. पाणी साचलेल्या ठिकाणी डासांची उत्पत्ती होण्याची शक्यता असल्याने प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

पनवेल रेल्वे स्थानकातून दररोज मोठ्या संख्येने प्रवासी ये-जा करतात. पावसामुळे स्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ निर्माण झालेली ही परिस्थिती कायम राहिल्यास प्रवाशांना गैरसोयीसोबतच डासांचा त्रासही सहन करावा लागू शकतो. रेल्वे प्रशासनाने तातडीने साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. तसेच स्थानक परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबवून डास प्रतिबंधक औषध फवारणी आणि आवश्यक ठिकाणी धूर फवारणी करण्याची गरज आहे. स्थानक परिसरातील नाले, गटारे आणि पाणी साचणारी ठिकाणे तपासून त्यांची नियमित स्वच्छता करण्याचीही आवश्यकता आहे. पावसाळ्यात पाणी साचू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# आदर्श शाळा नवघर येथे ‘सेवा संकल्प अभियान’



**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद यांच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविल्या जाणाऱ्या ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत आदर्श शाळा नवघर येथे शनिवार, दिनांक २६ सप्टेंबर २०२६ रोजी ‘आनंददायी शनिवार’निमित्त विविध स्पर्धांचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळाला. या उपक्रमांतर्गत इयत्ता ३ री ते ५ वी आणि इयत्ता ६ वी ते ८ वी या दोन गटांमध्ये विकसित भारत- २०४७ या विषयावर चित्रकला व वक्तृत्व स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांच्या माध्यमातून ‘मुलांच्या स्वप्नातील भारत’ आणि ‘विकसित भारत’ या संकल्पनांवर आकर्षक चित्रे रेखाटली. तसेच वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या स्पर्धांमधील विजेत्या प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना केंद्रस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरविण्यात आले असून त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे औचित्य राजेंद्र अंबिके यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतोच, शिवाय देशाच्या विकासात स्वतःचे योगदान देण्याची आणि विकसित भारत घडवण्याची प्रेरणा बालवयातच मिळते. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता बैकर, वृषाली गुरव, राजेंद्र अंबिके, अनुजा माने व रुपाली लेंडवे यांनी केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी, पालकांनी आणि ग्रामस्थांनी मनापासून अभिनंदन केले आहे.

# वेळेवर रेल्वे पकडण्यासाठी जीवघेणी धावपळ



**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

सकाळची वेळ... हातात डबा, खांद्यावर बॅग आणि डोळ्यांसमोर वेळेत रेल्वे पकडण्याची घाई. पनवेल रेल्वे स्थानकात चाकरमान्यांची दररोज अशीच धावपळ पाहायला मिळत आहे. मात्र, वेळ वाचवण्यासाठी दुसऱ्या फलाटावर जाण्याच्या प्रयत्नात प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत असून, काही ठिकाणी धोकादायक मार्गाचा अवलंब करण्याची वेळ येत आहे. स्थानकाच्या एका बाजूला पत्रे लावण्यात आल्याने एका फलाटावरून दुसऱ्या फलाटावर जाण्यासाठी प्रवाशांना उपलब्ध मार्गानेच वळसा घालावा लागतो.

सकाळच्या गर्दीच्या वेळी हा वळसा वाढल्याने रेल्वे पकडण्यासाठी प्रवाशांची अक्षरशः धावपळ उडते.

### ■ पनवेल स्थानकात प्रवाशांची कसरत

वेळेवर रेल्वे पकडायची आणि जागा मिळवायची या घाईत काही प्रवासी कमी अंतराचा मार्ग शोधताना जोखीम घेत असल्याचे चित्र दिसते.

विशेषतः रोज मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि उपनगरांकडे जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी काही मिनिटांचा विलंबही महत्त्वाचा ठरतो. फलाटावर रेल्वे येण्याची घोषणा होताच प्रवाशांची गर्दी एका दिशेने धावताना दिसते. त्यात महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांचीही मोठी गैरसोय होते. स्थानकातील बांधकाम किंवा पत्रे लावण्याची आवश्यकता असल्यास प्रवाशांसाठी सुरक्षित आणि सोयीचा पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. गर्दीच्या वेळेत प्रवाशांना अडथळा होणार नाही, याची रेल्वे प्रशासनाने काळजी घेणे आवश्यक आहे.

वेळ वाचवण्यासाठी प्रवाशांनी जीव धोक्यात घालण्याची वेळ येऊ नये, यासाठी पनवेल रेल्वे स्थानक प्रशासनाने तातडीने सुरक्षित मार्गाची व्यवस्था करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि.२७ सप्टेंबर ते ०३ ऑक्टोबर २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ–अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## परिस्थितीचा आढावा घ्या

**मेष :** राशीधारकांनी या सप्ताहात ग्रहमान पाहता शांत राहून परिस्थितीचा आढावा घ्यावा. आप्तेष्टांशी संपर्कात राहा व कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. कुटुंबातील ताळमेळ एकमेकांच्या मदतीने पुढे जाईल जर तुम्हाला कुटुंब जोडून ठेवायचे असेल तर, तुम्हाला काही ठिकाणी समझोता करावा लागेल. तुमचे आर्थिक जीवन बदलण्याची शक्यता असेल, विद्यार्थ्यांसाठी आता अनुकूल दिवसांची सुरवात झाली आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या गुणांची प्राप्ती होईल. अभ्यासात त्यांचे लक्ष लागून अभ्यास चांगला होऊ शकेल, राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. करिअरच्या दृष्टिकोनातून तुम्हाला पद प्राप्ती होऊ शकते. आपल्या मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील यश मिळेल, उत्तरार्धात सार्वजनिक जीवनात आपली सक्रियता वाढेल. **महिलांना :** मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. तुमच्या परिवाराला सामाजिक रूपात सन्मान आणि संपन्नता प्राप्त होईल. **शुभ दिनांक :** २७,२९.

## मतप्रदर्शन करण्याचे टाळा

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता तुम्ही वाहन खरेदी करू शकाल. दुसरीकडे आठवड्याची सुरुवात काहीशी चांगली राहील आणि लग्न झालेल्या कुटुंबात नवीन सदस्याचे आगमन होऊ शकते. शिक्षणात तसेच काही क्रिएटिव्ह क्षेत्रात आपल वर्चस्व निर्माण होईल. कौटुंबिक जीवनात नजर टाकली असता कुटुंबातील लोक अध्यात्मिक गोष्टीत अधिक लक्ष देतील. तथापि इतर काही लोकांसोबत विरोधाभासाची स्थिती बनलेली राहील. धन संबंधित वाद कुटुंबातील शांती भंग करू शकतो. विद्यार्थ्यांसाठी नवीन वर्ष सामान्य राहील प्रोफेशनल कोर्सची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मात्र, उत्तम यश मिळेल. ते उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बरेच चांगले प्रदर्शन करण्यात यशस्वी राहतील. वित्तीय निर्णय घेण्याआधी बरेच विचार करावे लागतील. वर्षाची सुरुवात करिअरसाठी काहीशी आव्हानात्मक राहू शकते. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. **महिलांना :** महिलांना घरबसल्या धनलाभ देणारा कालावधी आहे, हा काळ उत्तम असून कोणत्याही क्षेत्रात यश मिळेल. मोसमी आजारांपासून सावध राहा. **शुभ दिनांक :** २९,३०.

## कामाची सुरुवात काळजीपूर्वक करा

**मिथुन :** राशीसाठी हा आठवडा करिअरसाठी सामान्य रूपात शुभ राहील. तुम्ही कुठल्या मोठ्या व्यावसायिका सोबत राहून काम ही करू शकाल. या राशीतील विद्यार्थ्यांना या वर्षी काही मोठी संधी प्राप्त होऊ शकते. तुमच्यासाठी हे वर्ष बरेच उत्तम सिद्ध होईल कारण तुमचे अधिक प्रयत्न यश अर्जित करतील. आर्थिक दृष्टिकोनातून ही वर्ष बरेच अनुकूल आहे. या आठवड्यात आयात – निर्यातीशी संबंधित व्यापाऱ्यांना लाभ व यश प्राप्ती होईल. नवीन कामाची सुरुवात काळजीपूर्वक करावी. अधीरता व आक्रमकवृत्ती किंवा अंधानुकरण आपल्या मनास सतत नकारात्मकतेकडे खेचून घेईल. मनसिकस्थिती अस्थिर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रार्थना आपल्याला साथ देऊ शकेल. विचारपूर्वक केलेली कृती फायदा देणारी असेल. कामानिमित्त प्रवास योग संभवतात. कोणालाही राग येणार नाही अशा दृष्टीने वागणे हितकारक राहील. **महिलांना :** उपवास करताना फळ आहार घेणे आपल्याला फायद्याचे आहे. किमती वस्तूची खरेदी करू शकाल घरात महत्वाची वस्तु येईल. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. **शुभ दिनांक :** १,२.

## बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता धन आवक सातत्याने वाढत राहील ज्यामुळे तुम्ही बरेच प्रसन्न राहाल. प्रकृतीची काळजी घ्या. आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य होईल. आपल्या बोलण्याने इतरांचा ‘इगो’ दुखावणार नाही याची दक्षता घ्या. भविष्याचा विचार न करता वर्तमानकाळाचा आनंद घेऊन सुखी–समाधानी राहण्याचा प्रयत्न करा. जागरण टाळा सरकारी नियम व कायद्याचे पालन कटाक्षाने पाळा. चुकीच्या पैशाचा मोह करू नका. सरकारी देणी त्वरित भरा. भक्तीमार्गाचा अवलंब केल्यास आनंद मिळू शकेल. आपण सामंजस ठेवल्यास ही वेळ आपल्यासाठी संधी देणारी असेल, आपल्या ओळखीचा फायदा कसा करायचा हे ठरवा बाकी सर्व सोप होईल. **महिलांना :** आपण मेहनतीच्या पर्वातून प्रवास करीत आहात हे विसरू नका. प्रत्येक बाबतीत सावधानता बाळगल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. जेणेकरून आपल्याबद्दल गैरसमज व नाराजी होणार नाही. आपली कुवत पाहूनच जबाबदारी स्वीकारा. **शुभ दिनांक :** ०२,०३.

## ज्येष्ठांचा आदर राखा

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता सर्वांशी प्रेमाने वागल्यास आपल्याला मदतीचा हात येऊ शकेल. सरकारी नियम व कायदा यांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्या. आपल्या मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील यश मिळेल, उत्तरार्धात सार्वजनिक जीवनात आपली सक्रियता वाढेल. या व्यतिरिक्त प्रणयी जीवनाचा नवीन अध्याय सुरु करू शकाल. नियमित व्यायाम व योगाचा अवलंब करावा. दम लागेपर्यंत काम करू नका. ज्येष्ठांचा आदर राखा. नको त्या प्रलोभनांना भुलू नका. सरळ मार्ग अवलंबा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. धार्मिक गोष्टींना प्राधान्य द्या. मिळणारे समाधान हीच खऱ्या आनंदाची खूण आहे. याबाबतीतला विचार करून वागण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा खऱ्या अर्थाने उत्तम घालवू शकाल. **महिलांना :** कौटुंबिक व कार्यालयीन कामे चातुर्याने पुरी करण्याचा प्रयत्न करा. कामाचा उत्साह वाढेल मात्र, कटू बोलण्याचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभ दिनांक :** २८,०१.

## खर्चाचे प्रमाण वाढणार

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्या संततीला प्रथित यश मिळेल. विद्यार्थ्यांसाठी हा आठवडा बरेच यश देणारे असेल आणि स्पर्धा परीक्षेत ही यश मिळाल्याने तुमचे मनोबल वाढलेले असेल. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. तेव्हा प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळण्याचा प्रयत्न करा. काही समस्या आल्यास आपल्या बुद्धिचातुर्याचा उपयोग करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. हितशत्रूंचा ससेमिरा जाणवणार नाही. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. व्यवहारात सावधानता बाळगा. लांबचे प्रवास टाळा. आपण सर्वांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. जवळच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. या सप्ताहात आपणास कलाक्षेत्राच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळू शकेल. **महिलांना :** अनावश्यक गोष्टींची चर्चा करण्यापेक्षा स्वतःच्या कामात अधिक लक्ष दिल्यास ते हितकारक ठरू शकेल. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. बोलण्यावर नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. आपण आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. **शुभदिनांक :** २७,२९.

## वैचारिक मतभेद होण्याची शक्यता

**तुळ :** राशीसाठी आपल्यासाठी हा आठवडा उत्साह घेऊन आला आहे. मागील काही दिवसांपासून आपसात संबंधातील नीरसता व अनिश्चिततेचा सामना आपण करत असलात तर आता काळजी करणे सोडा. आपल्या कामातून आपण बऱ्याच नवीन गोष्टी शिकू शकाल. कामानिमित्त प्रवास योग संभवतात. जीवनशैली उंचावण्यासाठी सुद्धा खर्च होण्याची शक्यता आहे. व्यावहारिक संबंधातील अनिश्चिततेमुळे वर्तमान संबंध तोडून नवे संबंध जोडण्यावर आपण अधिक भर द्याल. मात्र, या बाबतीत निर्णय घेताना व्यावहारिक दृष्टिकोन ठेवावा अन्यथा आपल्यावर पश्चाताप करण्याची पाळी येईल. जोडीदाराची निवड करताना सुद्धा घाई करू नये, अन्यथा वैचारिक मतभेदामुळे संबंधात कटुता निर्माण होण्याची शक्यता आहे. विवाहा विषयी कोणताही निर्णय घेण्यास नंतरच अनुकूलता लाभेल. **महिलांना :** अखेरच्या तीन दिवसांत कौटुंबिक संबंधात काळजी घ्यावी लागेल. व्यावसायिक कारणांसाठी मालमत्ता खरेदी करू शकाल. जर आपण व्यवसाय वृद्धीसाठी मालमत्ता, मशिनरी आदी खरेदी करण्याचा विचार करत असाल. **शुभ दिनांक :** ३०, ०२.

## कामाच्या ताण घेऊ नका

**वृश्चिक :** राशीसाठी हा सप्ताहात पाहता आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. त्यासाठी हा आठवड्यांचा पूर्वार्ध अनुकूल आहे. या व्यतिरिक्त संपूर्ण आठवड्याचे दिवस सुद्धा अनुकूल आहेत. तरीही वागणुकीच्या बाबतीत शक्यतो आपली प्रतिष्ठा मलीन होणार नाही अशी वागणूक ठेवा. एखाद्या कायदेशीर कार्यवाहीस आपणास सामोरे जावे लागणार नाही याची काळजी घ्यावी. नवीन विचारसरणीने आपण कामात मार्गक्रमण कराल. सुरुवातीस विद्यार्थ्यांना अधिक मेहनतीसाठी तयार राहावे लागेल. मागील काही दिवसांपासून आपला अभ्यास संथ गतीने होत असेल जो नंतरपासून योग्य गती साधू शकाल, असे असले तरी आपला मार्ग सोपा नसेल. मेहनत हवी त्यात कमी पडू नका. नंतर आपल्या स्थितीत सुधारणा होऊ लागेल. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. अखेरीस आरोग्य विषयक काही त्रास होण्याची शक्यता आहे, जुने विकार बळावण्याची शक्यता अधिक आहे. कामाच्या ताणामुळे अनेकदा आपणास थकवा येऊ शकतो. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **शुभ दिनांक :** ०१,०३.

## कौटुंबिक संबंधांची काळजी घ्या

**धनु :** राशीसाठी या सप्ताहात पाहता आपल्यासाठी खूपच आशास्पद आहे. आर्थिक प्रगतीची शक्यता असली तरी कौटुंबिक संबंधांची काळजी घ्यावी लागेल. कोणत्याही बाबतीत कुटुंबियांशी चर्चा करताना आपल्या शब्दात स्पष्टता असण्याची गरज आहे. या व्यतिरिक्त प्रत्येकवेळी आपलेच म्हणणे खरे असल्याचा हट्ट धरू नये. मागील काही दिवसांपासून कौटुंबिक कार्यात विलंब होत असल्यास नंतर त्यास गती प्राप्त होईल. या दरम्यान प्रेम संबंध टिकविण्यासाठी सुद्धा आपणास अधिक प्रयत्न करावे लागतील. विशेषतः या सप्ताहात मध्यापासून संबंध संथ गतीने वाटचाल करत असल्याचे आपणास जाणवेल. विवाहितांना मात्र, काहीसे बरे वाटेल. ज्यांना नवीन प्रेम संबंधांची सुरुवात करावयाची आहे त्यांना प्रेमाचा प्रस्ताव मांडण्यात काही अडचणी येऊ शकतात. कार्यस्थळी स्पर्धेस सामोरे जाण्याची तयारी ठेवावी लागेल. **महिलांना :** कुटुंबियांशी चर्चेतून किंवा वागणुकीतून गैरसमज उदभवणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल. आर्थिक आघाडीवर विशेष त्रास होणार नसला तरी वर्षभर कुटुंबियांसाठी केलेल्या खर्चात आपणास फायदा मिळण्याची आशा आपण बाळगू नये. **शुभ दिनांक :** २७, २९.

## स्वतःची नवीन ओळख बनवा

**मकर :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता आपले कष्ट बहरून येतील. कारकीर्द, अभ्यास, आर्थिक उन्नती, संबंध, सामाजिक अशा कोणत्याही क्षेत्रात आजवर प्रगती साधण्यासाठी किंवा स्वतःची नवीन ओळख बनविण्यासाठी जे काही प्रयत्न आपण केले असतील त्याचे फळ आता मिळू शकेल. सुरुवातीच्या दिवसात प्रवासात त्रास होण्याची शक्यता असल्याने शक्यतो तो टाळण्याचा प्रयत्न करावा. मध्यानंतर स्थितीत सुधारणा होऊ लागेल. संपूर्ण वर्षभरात प्रवासाच्या आयोजनात शेवटच्या क्षणापर्यंत अनिश्चितता राहण्याची शक्यता अधिक आहे. सप्ताहाच्या सुरुवातीस पैतृक संपत्ती संबंधित कामात यशस्वी होऊ शकाल. या व्यतिरिक्त वडीलांकडून काही लाभ होण्याची अपेक्षा बाळगू शकाल. आर्थिक आघाडीवर काळजी करण्यासारखे काही नाही. बहुदा प्राप्तीत वाढ होण्यासाठी आपण योग्य नियोजन करून भरघोस फायदा मिळवू शकाल. **महिलांना :** पुढील कालावधीत आपल्या प्राप्तीतील अनिश्चितता वाढेल. अखेरीस पैश्यांच्या अभावी आपला खोळंबा होऊ नये म्हणून आगाऊ नियोजन करणे गरजेचे ठरेल. **शुभ दिनांक :** २९,०२.

## मित्रांचा सहवास घडण्याची शक्यता

**कुंभ :** राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता होणारे काही खर्च वगळल्यास बहुतांश वेळी पैसे शिल्लक पडू शकतील. वर्षाच्या सुरुवातीस प्राप्तीत वाढ होण्यासाठी केलेले प्रयत्न आता फलद्रुप होतील. घरगुती संबंधात गोडवा राहील. मात्र, जिवलग मित्रांचा सहवास घडण्याची शक्यता धूसरच राहील. कदाचित मित्रांचे सहकार्य न लाभल्याने त्यांच्याप्रती आपल्या मनात नाराजीचे सूर उमटतील. मात्र, तसे करण्यात त्यांचा काही दोष नसून परिस्थितीच तशी असेल हे ध्यानात ठेवावे. नंतर या स्थितीत सुधारणा होण्याची शक्यता आहे. साप्ताहाच्या अखेर पर्यंत प्रियव्यक्ती संबंधित काही चिंता निर्माण झाली तरी उर्वरित काळ अनुकूल असल्याने प्रियव्यक्ती किंवा वैवाहिक जोडीदाराशी आपण जवळीक साधू शकाल. विद्यार्थी उत्तम प्रगती करू शकणार असले तरी त्याना वाईट संगत सोडण्याचा सल्ला देण्यात येत आहे. **महिलांना :** प्रणयी जीवनात व दांपत्य जीवनात चांगल्या सानिध्याची जाणीव होईल. एकंदरीत ह्या वर्षी आपले आरोग्य चांगले राहिले तरी प्रवासात, साहस करण्या योग्य स्थळी प्रवास करताना दुखापत होण्याची शक्यता असल्याने काळजी घ्यावी लागेल. **शुभ दिनांक :** २९,०२.

## नको त्या विचारात अडकू नका

**मीन :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता दूरवर किंवा परदेशात जाऊन शिक्षण घेण्याची आपली इच्छा फलद्रुप होऊ शकेल. नंतर आपणास गूढ विषयांची गोडी लागेल. आपल्या माणसाकडून होणाऱ्या प्राप्तीत सप्ताहाच्यामध्यापासून कपात होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यास चांगला होईल. आपणास अभ्यासाची गोडी कमी असून सुद्धा किंवा काही अनिश्चितता आली तरी आपण प्रगती साधू शकाल. असे असले तरी पुढील आठवड्यापासून ते अखेर पर्यंत अधिक परिश्रम करावे लागतील. मित्र वर्तुळात अधिक वेळ वाया दवडू नये अन्यथा त्यांच्यामुळे आपल्या अभ्यासावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. उच्च शिक्षणासाठी परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना शेवटच्या दिवसांत यशप्राप्ती होईल. परदेशी जाण्यात काही अडचणी येत असल्यास त्या दूर होतील. आध्यात्मिक साधना व व्यायामातील नियमितता आपल्यासाठी योग्य ठरेल. **महिलांना :** आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका. नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा. **शुभ दिनांक :** ३०,०२.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक व वर्णन केलेली जमिन खालील प्रमाणे

**१). रेणुका चिंतामण जाधव यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.**
**मिळकतीचे वर्णन मौजे. अंजप, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्वे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ९३ | ५३ | ३१२-०० | ३१-२० |

**२). निला चिंतामण जाधव यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.**
**मिळकतीचे वर्णन मौजे. अंजप, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ. मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ९३ | ४६ | ३०६-०० | ३०-६० |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसीद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.
दि. २५/०९/२०२६.

**ॲड. सुमित दत्तात्रेय कराळे.**
पत्ता - ममदापुर नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९१६८९७८४३८.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे म्हात्रोळी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.आशिष अंकुश वार्डे रा.सारळ, ता.अलिबाग जि.रायगड यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी | २३५/६/३ | ०-०३-८०<br>०-३१-१०<br>०-३४-९०<br>पो.ख.०-०६-१०<br>०-४१-०० | १.२९ |

सदरची मिळकत ही त्यांनी ता.३१/८/२०२६ रोजी दस्त क्र.अलब-७०३१/२०२६ कडील खरेदीखताद्वारे पुर्वगामी मालक ओमप्रकाश मंगिलाल पुरनमलका यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेतलेली असून व ती त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिला आहे.

मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकाची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २६/९/२०२६

सही/-
**ॲड.गणेश गोविंद पाटील**
अे १,२, तळमजला
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड ४०२ २०१

## जाहिर नोटीस

आरटीएस वि.मा.अर्ज क्र.१४३/२०२६

प्रति,
१. मनोहर दगडु दळवी, ... अपिलार्थी
रा. सावळे, ता.कर्जत, जि.रायगड

विरूद्ध

कै. प्रभाकर दगडु दळवी (मयत तर्फे वारस)
१. सतीश प्रभाकर दळवी उर्फ सतीश अविनाश केतकर,
२. चेतन प्रभाकर दळवी उर्फ चेतन अविनाश केतकर,
३. प्रमिला प्रभाकर दळवी उर्फ प्रमिला अविनाश केतकर, --सामनेवाला
सर्व रा.मोहनानंद नगर मांजर्ली रोड, लॅंड ब्रीज,
बि विंग, रुम नं.१५, बदलापुर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे
४. तहसिलदार कर्जत

वादी यांनी मौजे. पुलाचीवाडी (वंजारवाडी), ता. कर्जत, जि. रायगड येथील तहसिलदार कर्जत यांचेकडील आदेश क्र.हक्कनोंद/तक्रार नोंद/रजि.नं.५४/२०१७ मध्ये दि.०६/०९/२०२१ रोजीचा आदेश व फेरफार क्र.५८८ चे विरूध्द दि. २०/०७/२०२६ या कार्यालयात अपील दाखल केले आहे. प्रस्तुतचे अपील दाखल करणेस अर्जदार यांना विलंब झाला असल्याने अर्जदार यांनी विलंब माफीचा स्वतंत्र अर्ज सोबत दाखल केला आहे.

सदर विलंब माफीचे मुद्यावर दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडणेकामी प्रथम सुनावणी दि. २५/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपीलाची पुढील सुनावणी दिनांक १६/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, प्रशासकीय भवन, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

प्रस्तुत अर्जामधील सर्व सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे. | सर्व्हे नं/हिस्सा नं | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार |
|---|---|---|---|
| पुलाचीवाडी (वंजारवाडी) ता.कर्जत, ठिकाण: कर्जत जि. रायगड | १९/१ | २-११-८० पैकी १-२०-०० | ०.७८ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी, माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

दिनांक : १८/०९/२०२६

सही/-
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत करिता**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की,नर्मदा सोमकांत पाटील, जयश्री प्रल्हाद चोरघे, जयवंती योगेश मिटकर, याच्या वतीने सुजित प्रभाकर पाटील रा. प्लॉट नं. ६ नवीन कुकशेत गाव, सारसोळे डेपो जवळ, सेक्टर १४ नेरूळ, नवी मुंबई येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिनी कोपर, ता.पेण, जि.रायगड येथे असून मी स्वत: राकेश दामोदर नाईक विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| कोपर | नर्मदा सोमकांत पाटील<br>जयश्री प्रल्हाद चोरघे<br>जयवंती योगेश मिटकर | ७१/१/ब/२ | ०.०८.१० | १.२५ |
| | | ७७/६ | ०.३६.४० या पैकी ०.११.५० | ५.३७ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मीस्वता: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०८(आठ) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक २७/०९/२०२६

**राकेश दामोदर नाईक**
घर नं. ७८, बोनकोडे कोळीवाडा,
विठ्ठल मंदिर जवळ, सेक्टर १२ बी,
नवी मुंबई, कोपर खेरणे स.ओ.ठाणे,
महाराष्ट्र ४००७०९
फोन नंबर: ९९८७५७७०३८

## जाहीर नोटीस

माझे आशिल न्युजेन बिल्डर्स तर्फे भागिदार, मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

**मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेती मिळकत.**

| मौजे | भुमापन क्र./ उपविभाग | क्षेत्र एकक हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| चेंढरे | ३०/१ | ०.४१.०० | १४.४२ |

| मौजे | भुमापन क्र./ उपविभाग | क्षेत्र एकक हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| चेंढरे | ३०/२ | २२.९०.०० | २२९.०० |
| चेंढरे | २४/१/ब/३ | ८.१६.०० | १६.३२ |
| चेंढरे | २४/१/ब/१ | ४.८४.०० | ४८.४० |

येणेप्रमाणे वर्णनाची बिनशेती मिळकत, त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, वगैरेसह या मिळकती बाबत मिळकतीचे विद्यमान मालक न्युजेन बिल्डर्स तर्फ भागिदार यांनी सदरहू मिळकती वरील मालकी हक्काची तपासणी करणेच्या सुचना दिल्या आहेत. सबब, सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, कुळवहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख २६.०९.२०२६

**(ॲड.एस.वाय.बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की,सुजित प्रभाकर पाटील रा. कुकशेत गाव, सारसोळे डेपो जवळ, सेक्टर १४ नेरूळ वेस्ट येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिनी कुरनाड, ता.पेण, जि.रायगड येथे असून मी स्वत: संतोष शरद पुरव घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| कुरनाड | सुजित प्रभाकर पाटील | ६०/२/१ | ०.६०.०० पैकी २२ गुंठे | ०.८९ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वता: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १५(पंधरा) दिवसाच्या आतमाझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक २७/०९/२०२६

**संतोष शरद पुरव**
रूम नं. २१२, शॉप नंबर ३,
सुंदर हॉटेल जवळ, प्रतीक्षा नगर
सायन कोळीवाडा, सायन मुंबई
महाराष्ट्र ४०००२२
फोन नंबर : ९७०२२२०३३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती तिचे विद्यमान मालक १) रोमिक रमेश पटेल, २)सागर रमेश पटेल यांजकडून कायमच्या खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमूद मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-दहिगाव तालुका-कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकती**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ३५ | ४ | ०.४७.५० | ५.१० |
| ३६ | २ | ०.३६.९० | १.०५ |
| ३७ | १ | ०.४३.०० | ३.६० |
| ३७ | २ | ०.११.४० | ०.१५ |
| ३७ | ३ | ०.४९.८० | ७.९० |
| ३८ | १ | ०.४७.५० | ६.१५ |
| ३८ | २ | ०.४१.०० | ५.३५ |
| ३९ | १/ड | ०.२०.०० | १.३२ |
| ३९ | २ | ०.१३.०० | २.२० |
| ३९ | ३ | ०.४२.०० | २.२० |
| ३९ | ४ | ०.३४.९० | ५.५५ |
| ४० | २ | ०.२३.८० | ०.३५ |

सदरच्या जमिन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि.२५/०९/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड.नवनाथ गणू ठोंबरे**
पत्ता.गजवक्र रेसीडेन्सी, पाचवा मजला
फ्लॅट नं.५०४, कचेरी रोड कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो.८००७३२७९७९/७७०९१६०५६७

**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड**

क्रमांक/आरटीएस/अपील क्र.३३/२०२६
दिनांक :-२३/०९/२०२६

शांताबाई कृष्णाजी सागवेकर मयत तर्फे वारस
श्री. राजेंद्र कृष्णाजी सागवेकर अपिलार्थी
मु. रुम नं.१, बी विंग, पुनम को.ऑप.हौ.सोसायटी,
चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड
मु. इंदापूर ता.माणगाव, जि.रायगड

विरुद्ध

१ शिवराम गणपत सुर्वे मयत तर्फे वारस
१/१ श्री.सखाराम शिवराम सुर्वे मयत तर्फे वारस
१/१/१ श्री.भुजराज सखाराम सुर्वे
१/१/२ श्रीम. माधुरी मंगेश राणे
१/१/३ श्रीम. संगिता विजय बाबरे
१/१/४ अनंत सखाराम सुर्वे मयत तर्फे वारस
१/१/४/१ श्रीम. अनिता अनंत सुर्वे
१/१/४/२ श्री. विनायक अनंत सुर्वे
१/१/४/३ श्रीम. रोहिणी अल्पेश म्हस्के
१/४/४/४ श्रीम. श्रावणी सचिन खनगटे
१/१/४/५ श्रीम. शुभदा सचिन शेपुंडे
१/१/५ श्री.सुरेश सखाराम सुर्वे मयत तर्फे वारस
१/१/५/१ श्रीम. रेश्मा सुरेश सूर्वे
१/१/५/२ श्री. शुभम सुरेश सुर्वे उत्तरार्थी
१/१/५/३ श्री. स्वयंम सुरेश सुर्वे
सर्व रा. इंदापूर, ता. माणगाव, जि. रायगड
१/२ श्रीम. यमुना लक्ष्मण मुरकर
१/३ श्रीम. सुनिता लक्ष्मण मुरकर
१/४ श्रीम. येणू लक्ष्मण मुरकर
अ.क्र. १/२ ते १/४ रा. वावेदिवाळी, ता.माणगाव, जि.रायगड
२ रामजी सोनू मोरे मयत तर्फे वारस
२/१ श्री. ठकसेन रामजी मोरे
२/२ श्री. बाबाजी रामजी मोरे
२/३ श्री. धोंडू रामजी मोरे
२/४ श्रीम. नंदा विजय मोरे
२/५ श्री.अजय विजय मोरे
२/६ श्री. संजय विजय मोरे
२/७ श्री.अक्षय विजय मोरे
२/८ श्रीम.अस्मिता विजय मोरे
अ.क्र. २/१ ते २/८ रा. माकटी, ता.माणगाव, जि.रायगड

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे माकटी, ता. माणगांव, जि. रायगड येथील स.नं./गट नं. १४६१. क्षेत्र ४.६५.४ हे. आर आकार २.५० रु. पैसे, या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि. १५/०१/२०२६ रोजी अपील दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि. ०६/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी उपविभागीय अधिकारी, माणगाव यांचे कार्यालय, माणगाव येथे निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहील्यास आपले गैररहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : माणगांव
दिनांक : २३/०९/२०२६

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग करीता**

## जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे मांडवणे, ता-कर्जत, जि - रायगड येथील बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे मालक श्रीमती. तारुलता भगवानदास गुगारीया व श्री. मयुर भगवानदास गुगारीया यांच्या कडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर बिनशेती मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे :

| सर्व्हे नं./गट. नं | हिस्सा.नं./प्लॉट नं | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १६३ | १७ | लिहून देणार यांच्या मालकिचे व ताबेकब्जा वहीवाटीचे खाते. नं.३०६ चे क्षेत्र २२०५ | २२०.५० |

सदर मिळकतीच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि: २७/०९/२०२६

वकील
**ॲड. सचिन संजय सुर्वे**
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे सालोख तर्फे वरेडी ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकांचे नांव | स.नं./हि.नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| अविनाश द्रीवेदी व १ | २७/८/ब | ०-६६-० पैकी २० गुंठे | ०-६७-० |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (दिवस) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हकरत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

**ॲड.अशोक पालू डुकरे**
रा.प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं.१०१
ममदापुर रोड, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बोरीस, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.बाळकृष्ण सावरमल शहा यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बोरीस | ५०/२/अ | ०-८२-५०<br>पो.ख.०-०३-६०<br>एकूण ०-८६-१०<br>पैकी ० हे.४३.०५ आर एवढे क्षेत्र | ५.३१ |

सदरच्या मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकाची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २६/९/२०२६

सही/-
**ॲड.गणेश गोविंद पाटील**
अे १,२, तळमजला
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड ४०२ २०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक (१) श्री.हर्ष दालमिया आणि (२) श्रीमती.पंखुरी दालमिया, दोघेही रा.एफ-२,कोरिंथिअन बिल्डिंग, ५ वा मजला, अपोलो बंडर, कुलाबा मुंबई-४०० ००५ यांच्याकडून सदरची मिळकत कायम स्वरूपात विकत घेण्याचे आमच्या अशिलांनी ठरविले आहे. तशी बोलणी आमच्या अशिलांची विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

आमच्या अशिलांना असे कळविण्यात आले आहे की, विद्यमान मालक हे मालमत्तेचे एकमेव आणि पूर्ण मालक आहेत आणि ही मालमत्ता सर्व प्रकारच्या बोर्जापासून/अडचणींपासून मुक्त आहे. विद्यमान मालकांनी पुढे असेही कळवले आहे की, त्यांनी या मालमत्तेच्या संदर्भात लिव्ह अँड लायसन्स (रहाण्याचा व वापरण्याचा) करार केला आहे.

या मालमत्तेवर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर किंवा विद्यमान मालकांविरूद्ध कोणत्याही प्रकारचा दावा, हकरत, अधिकार, हक्क, लाभ, हित, हिस्सा आणि/किंवा मागणी (मग ती विक्री, अदलाबदल, गहाण, प्रभार/चार्ज, बक्षीसपत्र/गिफ्ट, ट्रस्ट, वारसाहक्क, भाडेपट्टा, ताबा, लीज, सब-लीज, लिव्ह अँड लायसन्स (वरील उल्लेखाशिवाय),लीन, सुखाधिकार/ईझमेंट, अधिभोग अधिकार, भरपाई, देखभाल, हक्क सोडपत्र, मार्गाधिकार किंवा इतर कोणत्याही कराराद्वारे, दस्तावेजाद्वारे, पत्राद्वारे, दाव्याद्वारे, न्यायालयात चालू असलेल्या खटल्याद्वारे, आदेशाद्वारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने असो) असल्यास, अशा कोणत्याही व्यक्तीने ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १४(चौदा) दिवसांच्या आत सर्व संबंधित पुराव्यासह खालील दिलेल्या आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. तसे न केल्यास असा सर्व कोणताही दावा किंवा हित अस्तित्वात नाही आणि तो सोडून दिला (वेव्ह) गेला आहे, असे गृहीत धरले जाईल.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे मुनवली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र.उपविभाग क्र.७३/१/४ ची.क्षेत्रफळ ४८.६२.००(आर.चौ.मी) आकारणी रू.४८६.२० पैसे असणारी बिनशेती जमीन आणि त्यावर बांधण्यात आलेल्या ग्रामपंचायत मापगाव घर क्र.५८३/१ आणि ५८३/२ च्या इमारती/बांधकाम फ्लोअर प्लॅन मंजूर नकाशा आणि ''लेबर सेससाठी एकूण बांधकाम क्षेत्र विवरण'' तक्त्यानुसार, एकूण बांधकाम क्षेत्रफळ (BUA ) १,१८९.१७ चौ.मी. (अंदाजे १२,८०० चौ.फूट) आहे. इमारतीचे/मजल्यांचे विवरण खालीलप्रमाणे आहे;

- मुख्य घर - तळमजलाः बांधकाम क्षेत्र (जिना आणि लांबीसह)=७००.९२ चौ.मी., छज्जा=८.६५ चौ.मी., एकूण =७००.९२ चौ.मी
- मुख्य घर - पहिला मजलाः बांधकाम क्षेत्र (जिना आणि लांबीसह)=३०३.८३ चौ.मी., छज्जा=०.०० चौ.मी., एकूण =३०३.८३ चौ.मी
- बहुउद्देशीय खोली (Multipurpose Room) तळमजलाः बांधकाम क्षेत्र (जिना आणि लांबीसह)=१०५.८२ चौ.मी., छज्जा=०.०० चौ.मी., एकूण =१०५.८२ चौ.मी
- केअरटेकर खोली-तळमजलाः बांधकाम क्षेत्र (जिना आणि लांबीसह)=७८.६० चौ.मी., छज्जा=०.०० चौ.मी., एकूण =७८.६० चौ.मी

तसेच, मौजे मुनवली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र. व उपविभाग ७३/१(जुना गट क्र. ७/८/९/८२/८३/२/३) एकूण क्षेत्र ०६-१४-९८ हे.आर. यामधील ४,०२४ चौरस मीटरचा सामायीक (लेआउट) रस्ता वापरण्याचा अधिकारासह, ज्यामध्ये मालक १ यांचा ३०० चौरस मीटरचा अविभक्त आणि न दर्शवलेला हिस्सा/ हितसंबंध समाविष्ट आहे.

अलिबाग
तारीख : २५/०९/२०२६

सही/-
**ॲड.शैलेश प्रभाकर पाटील**
शॉप नं.४, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो.अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :- मौजे शिंगढोळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| | क्षेत्र | | | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| सर्व्हे नं / हिस्सा नं. | हे. | आर. | पॉ | रुपये | पैसे |
| २९/१/अ | ० | ०४ | ०० | ० | ०३ |
| ३२ | ० | ०२ | ५० | ० | १६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला,
गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक :- २७/०९/२०२६
मो. नं. ८४४६८६९६७१
ई मेल: nileshmundhe029@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे किहीम, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, त्या मिळकतीचे विद्यमान मालक बाळकृष्ण सावरमल शहा यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**परिशिष्ट**
**ता.अलिबाग जि.रायगड येथील**

| मौजे | गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| किहीम | २८८ | ०-२४-००<br>पो.ख.०-०६-५०<br>एकूण ००-३०-५० | ५-४४ |
| किहीम | २९० | ०-१७-३०<br>पो.ख.०-०४-७०<br>एकूण ०-२२-०० | ३-९१ |
| किहीम | २९७ | ०-३६-८०<br>पो.ख.०-०४-५०<br>एकूण ०-४१-३० | ३-०४ |
| किहीम | ३४४ | ०-२९-५० | ४-१९ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकाची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २६/९/२०२६

सही/-
**ॲड.गणेश गोविंद पाटील**
अे १,२, तळमजला
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड ४०२ २०१



**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- मुंबईतील नामांकित कंपनीच्या नागाव गेस्ट हाऊसमध्ये कर्मचारी हवेत. मॅनेजर केअरटेकर कूक माळी मदतनीस ड्रायव्हर गार्ड राहण्या-खाण्याची सोय माहितीसह संपर्क करा. व्हाट्सअप- ८१६९५८४०७२.
- Vacancy in furniture factory as a office boy/girl. Education- Graduation. Experience-3-4 years. Salary- 20,000 per month. Location- Bamansure, chondhi. Contact- 9823585321.
- Vacancy for store Manager in furniture store. Experience in sale- 5+years. Salary- 50,000 per month. Location-Zirad. Contact- 9823585321
- होम स्टे कामासाठी जोडपे पाहिजे आहे. ठिकाण : चोंढी मो.नं. ८७७९७७६७१४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाचे निर्णय विलंबानं होतील. नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. व्यवसायात अनुकूलता राहील.
- **वृषभ** : हातून धार्मिक कार्य घडेल. अपेक्षित भेटीतून समाधान मिळेल. अनावश्यक खर्च टाळायला हवा.
- **मिथुन** : प्रलंबित कामांना गती येईल. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. आर्थिक बाबतीत स्थैर्य लाभेल.
- **कर्क** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे होतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **सिंह** : जुनी येणी रखडतील. भागीदारी व्यवसायात मतभेद संभवतात. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **कन्या** : स्थावर प्रश्न तडजोडीनं सुटतील. अचानक अधिक खर्च करावा लागेल. प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **तूळ** : दूरच्या प्रवासाचे योग आहेत. अचानक धनलाभ संभवतो. कौटुंबिक अडचणींवर मात करता येईल.
- **वृश्चिक** : दिलासादायक घटना घडतील. व्यवसायात मनाजोगी उलाढाल होईल. कर्तव्यात कसूर करू नये.
- **धनु** : ताण-तणाव वाढेल. बेरोजगारांना मनाजोग्या संधी लाभतील. कार्यक्षमतेत उत्तम वाढ दिसून येईल.
- **मकर** : जमा-खर्चाचं गणित लक्षात घ्यावं. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. प्रवास त्रायदायक ठरू शकतो.
- **कुंभ** : खर्चाचं प्रमाण वाढतं राहील. व्यवसायात प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. विद्यार्थ्यांना यश मिळेल.
- **मीन** : कौटुंबिक प्रश्नांची चिंता राहील. स्थापत्य, अभियांत्रिकी क्षेत्रात संधी लाभतील. चिंता नसावी.

## २७ सप्टेंबर

दिन विशेष

**१९७२ :** प्रख्यात गणितज्ञ एस. आर. रंगनाथन यांचा मृत्यू.
**२००८ :** विख्यात भारतीय पार्श्वगायक महेंद्र कपूर यांचं निधन.
**२०१३ :** सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला निवडणुकीत 'नकारात्मक मतदान' करण्याची सोय करुन देण्याचा आदेश दिला.
**२०१७ :** कुख्यात गुंड इक्बालसह तिघांविरोधात सक्तवसुली संचालनालयाने आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी गुन्हा नोंदवला.

टेक ज्ञान

## गूगलचं रम्य जग

क्रेग सिल्व्हरस्टेन हा त्यावेळी स्टॅनफॉर्ड विद्यापीठात पीएचडीचं शिक्षण घेणारा विद्यार्थी गूगलचा पहिला कर्मचारी बनला. गूगलच्या मुख्यालयाबाहेर भलमोठं लॉन आहे. या लॉनमधलं गवत खाण्यासाठी खास बकऱ्या आणल्या जातात. एखाद्या उपकरणाने हे गवत कापण्यापेक्षा बकऱ्या चरताना बघणं अधिक आनंददायी असल्याचं गूगलच्या कर्मचाऱ्यांचं म्हणणं आहे. म्हणूनच चरण्यासाठी भाड्याने बकऱ्या आणल्या जातात. गूगलच्या कार्यालयात पाळीव प्राणी आणि त्यातही कुत्रे आणायला परवानगी आहे. कुत्र्यांमुळे ताण कमी होतो आणि कर्मचारी जास्त चांगलं काम करू शकतात, म्हणून इथे कुत्रे आणायला परवानगी देण्यात आली आहे. गूगलचं डुडल अनेकांना आकर्षित करतं. ३० ऑगस्ट १९९८ या दिवशी पहिलं डुडल सादर करण्यात आलं. यात बर्निंग मॅन साकारण्यात आला होता. गूगलच्या संस्थापकांनी अमेरिकेतल्या बर्निंग मॅन फेस्टिवलला भेट दिली होती. संस्थापक कार्यालयात नसल्याने तांत्रिक अडचणी दूर करता आल्या नाहीत, हे लोकांना कळण्यासाठी हे डुडल तयार करण्यात आलं होतं.

आरोग्यमंत्र

## वेटलॉससाठी बटाटा खा

आहारात बटाट्याचं प्रमाण अधिक असल्यास जाडी वाढते असा काही जणांचा समज असतो. कारण बटाट्याच्या सेवनाने वजन वाढतं हे आपण वर्षानुवर्षं ऐकत आहोत. त्यामुळेच वजन कमी करु इच्छिणारे आहारातून बटाटा हद्दपार करतात. मात्र बटाट्यामुळे वजन वाढतं हे सत्य नाही. योग्य प्रकारे सेवन केल्यास बटाट्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. बटाटा तळलेल्या स्वरुपात खाल्ल्यास तेलातील घटकांमुळे वजन वाढतं. बटाट्याबरोबर वजनवाढीस कारणीभूत ठरणारे अन्य जिन्नस वापरले गेल्यामुळे वजन वाढतं. मात्र उकडलेला बटाटा दह्यासवे खाल्ल्यास वजन कमी होण्यास मदत होते असं आहारतज्ज्ञांचं म्हणणं आहे. उकडलेल्या बटाट्यात दोन वाटी दही मिसळावं. चवीनुसार मीठ घालावं. रायत्यासारखा लागणारा हा पदार्थ नाश्त्यामध्ये घ्यावा. नियमितपणे हा उपाय केल्यास वजन कमी होण्यास मदत होते. बटाट्यामध्ये व्हिटॅमिन सी आणि पोटॅशियमची भरपूर मात्रा असते. या दोन्ही घटकांमुळे चयापचय क्रिया सुधारते. फॅट सेल्स वेगाने कमी होतात आणि वजन घटू लागतं. दह्यामध्ये प्रोटीन आणि कॅल्शियमची पर्याप्त मात्रा असते. प्रोटीन फॅट दूर करतं आणि पेशींमध्ये शक्ती उत्पन्न करतं. यामुळे बॉडी टोन होते. बटाटा आणि दह्यामध्ये कमी कॅलरीज असल्यामुळे वजनवाढीला अटकाव होतो. म्हणूनच उकडलेला बटाटा आणि दही हे मिश्रण सलग दोन महिने नाश्ता अथवा रात्रीच्या जेवणात घेतल्यास सकारात्मक परिणाम बघायला मिळतो.



ब्युटी टॉक

## असा करा मेक अप

* चेहऱ्यावर पिंपल्स झाले असतील तर ऑईल फ्री प्रायमर वापरा. यामुळे त्वचेतलं अतिरिक्त तेल शोषून घेतलं जाईल. तसंच त्वचा मुलायम आणि नितळ दिसेल. या प्रायमरमुळे स्कीन टोन बदलत नाही. तसंच डागही झाकले जातात. * बाजारात अनेक प्रकारची फाउंडेशन्स मिळतात. तुम्ही त्वचेच्या प्रकारानुसार फाउंडेशनची निवड करा. पिंपल्सचं प्रमाण कमी करणारी फाउंडेशन्सही उपलब्ध आहेत. यातल्या सॅलिसिलिक ॲसिडमुळे पिंपल्स झाकले जातात आणि कमीही होतात. * फाउंडेशनमुळे चेहऱ्यावरचे डाग झाकले जातातच असं नाही. अशा वेळी कंसीलर उपयोगी पडतं. चेहऱ्याच्या काही भागांवरचे डाग लपवण्यासाठी कंसीलर वापरा. क्रीमी कंसीलरमुळे डाग झाकोळले जातात. * सेटिंग पावडर म्हणजे कॉम्पॅक्टचा वापर करायला विसरू नका. यामुळे मेक अप चेहऱ्यावर व्यवस्थित बसतो आणि उठूनही दिसतो. * चेहऱ्यावर थोडे डाग असले तरी ब्लश टाळू नका. ब्लशमुळे मेक अप छान दिसतो. शक्यतो नैसर्गिक घटकांनी युक्त अशा ब्लशचा वापर करा.

पंचांग

**रविवार, २७ सप्टेंबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
भाद्रपद कृ. १, चंद्रराशी : मीन,
नक्षत्र : उ.भाद्रपदा, योग : वृद्धि,
सूर्योदय ६.३१, सूर्यास्त ६.२९

फॉरवर्ड्स

**तारीफ़ कियें बिना क़ोई ख़ुश नहीं होता...**

**औऱ झूठ बोलें बिना क़िसी क़ी तारीफ़ नहीं होतीं...!**

भटकंती

ट्रेकिंगची आवड असेल तर तुम्ही कक्काबेला जाऊ शकता. कक्काबे हे ठिकाण बंगळूरूपासून २७० किलोमीटर अंतरावर आहे. म्हैसूरपासून रेल्वेस्थानकावर उतरून कक्काबेला जाता येईल. म्हैसूर ते कक्काबेदरम्यान बस बऱ्याच बस धावतात. कक्काबे हे छोटंसं गाव आहे. पावसाळ्यात या गावाचं सौंदर्य खुललेलं असतं. नजर जाईल तिथे फक्त हिरवळ असते. इथल्या डोंगरांवरून कुर्ग तसंच आसपासच्या परिसराचं मनोहारी दृश्य दिसतं.

कर्नाटकमधलं थंड हवेचं ठिकाण असल्यामुळे कक्काबेमधलं वातावरण आल्हाददायक असतं. **(क्रमशः)**

करिअरवाटा

## पर्यावरण जपण्याचा अनोखा मार्ग

आपल्या देशामध्ये पर्यावरणाविषयीची जागृती वाढत आहे आणि काही उच्चविद्याविभूषित तरुण उत्तम पगाराच्या नोकऱ्या सोडून पर्यावरणाच्या रक्षणासाठी पर्यावरणप्रेमी व्यवसाय सुरू करत आहेत. पक्ष्यांसाठी मातीची घरटी तयार करणं हा असाच एक प्रयोग आहे. अलिकडच्या काळात चिमण्या नष्ट होत असल्याबद्दल चिंता व्यक्त होते. पण त्याचं कारण आपण सध्या ज्या प्रकारची घरे बांधत आहोत त्यात चिमण्यांना घरटी बांधण्यास योग्य जागा मिळत नाही हे आहे. त्यामुळेच चिमण्यांना घरटी उपलब्ध करून देणं किंवा वेगळ्या शब्दात सांगायचं झालं तर चिमण्यांना वेगळ्या घरात राहण्याची सवय करायला लावणं गरजेचं आहे. त्यासाठी मडकी तयार करण्याच्या चाकासारखे एक छोटं चाक तयार करून त्यावर विविध आकाराच्या पाखरांची घरटी तयार करता येतात. त्या घरट्यांचा रंग झाडांच्या सालीशी मिळता जुळता ठेवायचा असतो. ही घरटी विकून अर्थार्जन आणि पर्यावरण रक्षण ही दोन्ही उद्दिष्ट सफल होतात. घरटी झाडांना लटकवली की, पाखरं त्यात रहायला लागतात. ती मातीची असल्यामुळे थंड असतात. अशाप्रकारे या व्यवसायातून मिळणारं समाधान काही वेगळंच असतं. त्यामुळे अशा हटके मार्गांचाही विचार करायला हवा.



खेचाखेची

## फेसबुकवर बिहारी !

एका बिहारीच्या मित्राने त्याला फेसबुकबद्दल सांगितलं. बिहारीने पण फेसबुकवर अकाऊंट उघडलं. पण सर्व पाहुन तो फारच गोंधळला. त्याला काय करावं, तेच सुचेना. त्याने मित्राला काय करायचं ते विचारलं.
त्याच्या मित्राने त्याला सांगितलं, फेसबुकच्या वॉलवर आपल्याला वाटेल ते लिहायचं असतं.

बिहारीने फार विचार केला आणि लिहीलं, यहाँ पेशाब करना मना है।

वेगळं काही

मध्यंतरी एका हिऱ्याच्या आत दुसरा हिरा सापडला. असा हिरा पहिल्यांदाच सापडला आहे. हा हिरा ८० कोटी वर्षांपेक्षाही जुना असल्याचं बोललं जातं. यकुशियातल्या न्यूरबा खाणीत हा हिरा सापडला. हा ०.६२ कॅरेटचा हिरा असून त्याच्या पोटातल्या हिऱ्याचं वजन ०.०२ कॅरेट आहे. हा अनोखा हिरा प्रचंड महाग असून भारतीय चलनात त्याची किंमत ४२६ कोटी रुपये असल्याचं बोललं जात आहे. अलरोसा या खाण कंपनीने याबाबत माहिती दिली. अशा प्रकारचा हिरा पहिल्यांदाच सापडल्याचं त्यांचं म्हणणं आहे. एका हिऱ्याच्या पोटात दुसरा हिरा सापडणं हा निसर्गाचा एक चमत्कार असल्याचं त्यांचं म्हणणं आहे. असा हा महागडा हिरा सध्या चर्चेचा विषय ठरतो. आहे.

फॅशन पॅशन

## सणांसाठी सजताना...

येत्या फेस्टिव सीझनमध्ये हटके लूक कॅरी करायचा असेल तर इंडो-वेस्टर्न फ्युजन वेअर ट्रेंड फॉलो करण्याचा विचार करा. याविषयी...

* फ्रंट स्लीट कुर्ता आणि धोती किंवा ट्युलिप पँट कॅरी करणं हा उत्तम पर्याय आहे. भरपूर भरतकाम केलेले क्रॉप किंवा पेप्लम टॉपच्या कुटुंबातले भरजरी कुर्ते बोल्ड रंगाच्या सिल्क धोतीसोबत कॅरी करता येतील. हा लूक खुलवण्यासाठी ट्रेंडी झुमके घालता येतील. मॅटे लिपस्टिक आणि न्यूड मेक अप यामुळे तुम्ही छान दिसाल. * जंपसूट्सनाही तुम्ही एथनिक लूक देऊ शकता. असा लूक मिळवण्याचा सोपा मार्ग म्हणजे लेहरिया, कलमकारी, अजराकसारख्या पारंपरिक प्रिंट्सचे जंप सूट तयार करून घेणं किंवा जंप सूटवर भरजरी दुपट्टा, नक्षीकाम केलेले बेल्ट, जुती, स्टेटमेंट ज्वेलरी कॅरी करणं. * पारंपरिक लेहंग्यावर चोली घालण्याऐवजी साईट कट असलेला लाँग कुर्ता घाला. नक्षीकाम केलेला केपही चालू शकेल. यावेळी लेहंगा आणि कुर्त्याच्या रंगसंगतीकडे विशेष लक्ष द्या. यासोबत स्टेटमेंट नेकलेस कॅरी करा. पोटली बॅग किंवा क्लच घ्या. अशा प्रकारे तुम्ही एथनिक लूक मिळवू शकता.



## सुडोकू १५४ [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | | | ६ | २ | | | ९ | ३ |
| | ७ | | | ८ | | २ | | |
| | | २ | | ४ | ५ | | | |
| | २ | | | | | | | |
| ९ | ३ | ६ | | १ | | ८ | ४ | ७ |
| | | | | | | | ३ | |
| | | | ८ | ७ | | ५ | | |
| | | ७ | | ९ | | | १ | |
| २ | ८ | | | ५ | ४ | | | ६ |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १५३ चे उत्तर [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ३ | ९ | ७ | १ | ८ | ४ |
| ८ | ३ | १ | ६ | ४ | ५ | ७ | २ | ९ |
| ४ | ९ | ७ | २ | ८ | १ | ३ | ६ | ५ |
| ६ | १ | ९ | ५ | ७ | ३ | २ | ४ | ८ |
| ७ | ४ | २ | १ | ६ | ८ | ९ | ५ | ३ |
| ५ | ८ | ३ | ९ | २ | ४ | ६ | ७ | १ |
| ९ | ७ | ८ | ४ | ३ | २ | ५ | १ | ६ |
| ३ | २ | ५ | ८ | १ | ६ | ४ | ९ | ७ |
| १ | ६ | ४ | ७ | ५ | ९ | ८ | ३ | २ |

## शब्दकोडे क्रमांक १५४

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ■ | ४ | | ५ | ६ | | ७ | ■ | ८ | ९ |
| | ■ | १० | | ■ | ११ | | ■ | १२ | | ■ | १३ | | ■ | |
| १४ | १५ | | ■ | १६ | | | १७ | | ■ | १८ | | ■ | १९ | |
| २० | | ■ | २१ | | | ■ | | ■ | २२ | ■ | २३ | २४ | ■ | |
| ■ | २५ | | | ■ | २६ | | | २७ | ■ | २८ | ■ | २९ | ३० | |
| ३१ | | ■ | ३२ | ३३ | | ■ | ■ | ३४ | | | ३५ | | | ■ |
| ३६ | | ३७ | ■ | ३८ | | ३९ | ४० | | ■ | ४१ | | ■ | ४२ | ४३ |
| | ■ | ४४ | | | ■ | ४५ | | ■ | ४६ | ■ | ४७ | ४८ | ■ | |
| ४९ | ५० | | ■ | ५१ | ५२ | ■ | ५३ | ५४ | | ५५ | ■ | ५६ | ५७ | |
| ■ | | ■ | ५८ | ■ | ५९ | ६० | ■ | ६१ | | | ■ | ■ | ६२ | |
| ६३ | | ६४ | | ■ | ६५ | | ६६ | | | ■ | ६७ | | | ■ |
| | ■ | ६८ | | ६९ | ■ | ७० | | ■ | ७१ | | | ■ | ७२ | ७३ |
| ७४ | ७५ | | ■ | ७६ | ७७ | | ■ | ७८ | | ■ | ७९ | ८० | ■ | |
| ८१ | | ■ | ८२ | ■ | | ■ | ८३ | ■ | ८४ | ८५ | ■ | ८६ | | |
| ■ | | ■ | ८७ | | | | | | ■ | ८८ | | | ■ | |

**आडवे शब्द :-**
१) आग लावणारा पिशाच्चांचा राजा
४) प्रश्नोत्तरे
८) हस्त
१०) जरच्या मागोमाग येणारा करारातील शब्द
११) उत्सव
१२) पंख
१३) केस
१४) शुद्ध, पवित्र
१६) गोंधळ माजविणे, आरडाओरडा करणे
१८) भोळा
१९) सुवर्ण
२०) कापणे (इं.)
२१) नमस्कार
२२) गोमाता
२३) द्रवपदार्थ
२५) बोलून दाखविणे
२६) शाश्वत, चिरकाल
२९) लग्नानंतरची मिरवणूक
३१) पोपट
३२) दुप्पट (इं )
३४) कसेतरी, अनिच्छेने निर्जीवपणे
३६) ढगाळ वातावरण
३८) नम्रतेने वाकलेला
४१) जाडसर पीठ
४२) प्रहार
४४) गणती करणारा
४५) उत्तर दिशा, सवय, राबता
४७) बांगला देशाचे चलन
४९) युद्ध
५१) चेह-यावरील तेज, कांती
५३) नुकताच जन्माला आलेला
५६) क्षुल्लक, नीच, तेजोहीन
५९) अवस्था, स्थिती
६१) घेर, लोकांचा वेढा
६२) कागदी चलन
६३) माहितगार, जाणणारा
६५) जंगलातील वाट
६७) तर्क, ठोकताळा
६८) श्रीमंत
७०) गुंड, मोठा भाऊ
७१) फुलांचा राजा
७२) नवरदेव
७४) गर्दभ
७६) एक शेंगभाजी
७८) सैल
७९) द्रवपदार्थ
८१) अंगातील मस्ती
८४) संन्यासांचे निवासस्थान
८६) छोटी बैलगाडी
८७) घोडदळातील अधिकारी
८८) माल, वस्तू

**उभे शब्द :-**
१) आल्याची वडी
२) पगार
३) धातूचा धागा
४) हुक्की, लहर
५) दडून बसणे
६) सोन्याचा धागा
७) च्या सह
९) दागदागिने
११) चर्चा, विचारविनिमय
१५) एक उलटा पक्षी
१६) विद्या, चंद्राचा सोळावा भाग
१७) रौप्य
२१) पूर्ण उघडा दरवाजा
२४) फुरसत
२७) पाताळ
२८) तफावत
३०) रात्रीचा पाऊस
३१) मीठ
३३) माळी
३५) खांदा
३७) व-याचे तांदूळ
३९) चामखीळ
४०) स्तुती, स्तोत्र
४३) भात शिजताना होणारा आवाज
४६) खेळातल्य पत्त्यातील तीन माणसे
४८) फणसाचा एक प्रकार
५०) मृत्यू
५२) श्रीकृष्णाचे घराणे
५४) म्हैस, शिवाय
५६) भेग, चीर
५७) मनाच्या वेगाने जाणारा
५८) शिकार
६०) ऐटबाज, भपकेबाज
६३) हातचलाखी करणारा
६४) कच्छप, कूर्म
६६) नेहमी, सदोदित
६७) आकाश
६९) पर्वत
७३) रम्य
७५) सैलसर झालेले वस्त्र
७७) लाकूड छिलण्याचे हत्यार
८०) निवासस्थान
८२) चंद्र
८३) भीमाजवळचे शस्त्र
८५) शिक्का

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मि | रा | ज | दो | न | ह | जा | र | ■ | प | ■ | स | म | त | ल |
| ही | ■ | न्म | ■ | क्षा | र | ■ | टा | क | ण | खा | र | ■ | प | क्ष |
| र | म | जा | न | ■ | ण | ■ | ळ | ■ | जो | ■ | व | म | न | ■ |
| ■ | ग | त | ■ | वा | टो | ळा | ■ | ज | बा | ब | दा | र | ■ | सा |
| स | ■ | ■ | क | म | ळ | ■ | अ | स्त | ■ | स | ■ | ती | र | ■ |
| म | नो | का | म | ना | ■ | वा | द | ■ | धा | क | धू | क | ■ | जा |
| र | ■ | ■ | त | व | का | ■ | पा | रा | वा | र | ■ | ■ | क | व |
| स | ■ | स | र | ता | पा | ल | व | ■ | धा | ■ | मो | रा | व | ळा |
| ■ | अ | व | ता | र | ■ | ष्क | ■ | सा | व | का | र | ■ | डी | ■ |
| धा | ■ | ती | ■ | ■ | सा | र | वा | न | ■ | ज | ■ | स | मो | र |
| क | ल | म | क | सा | ई | ■ | म | ■ | आ | ळ | स | ■ | ल | व |
| ■ | व | त्स | ल | ■ | बा | व | न | क | स | ■ | खा | स | ■ | ळ |
| चा | क | र | ■ | आ | बा | ळ | ■ | फ | रा | टा | ■ | ल | ल | ना |
| प | र | ■ | आ | जा | ■ | व | स | न | ■ | प | र | वा | ■ | थ |
| ट | ■ | हे | वा | ■ | प | ळ | वा | ■ | आ | र | मा | र | ■ | ■ |

**येत्या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा फुगा फुटेल असे म्हटले जात असले तरी हे तंत्रज्ञान नष्ट होईल किंवा बंद पडेल असे मुळीच नाही. आपल्या क्षेत्राचे सखोल, पायाभूत ज्ञान असणारे, सतत नवीन गोष्टी शिकण्याची वृत्ती राखणारे, सकारात्मक दृष्टिकोन असणारे, व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करणारे स्पर्धेत नक्कीच टिकतील. त्यामुळे हा इशारा विद्यार्थीवर्गाला योग्य वेळी जागे करण्यासाठी आहे.**

# एआयचा फुगा की नव्या संधींचे दालन?



डॉ. दीपक शिकारपूर

काही वर्षांपूर्वी माहिती तंत्रज्ञान क्षेत्राकडे पाहताना 'कोडिंग शिका म्हणजे नोकरी पक्की' असा एक सोपा आणि एकसुरी मंत्र दिला जात होता. आज त्याची जागा एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) शिका म्हणजे भविष्य सुरक्षित'' या नवीन घोषणेने घेतली आहे. अनेक विद्यार्थी, पालक, शिक्षणतज्ज्ञ आणि व्यावसायिक प्रशिक्षण संस्था कृत्रिम बुद्धिमत्तेलाच यशाची अंतिम आणि जादूची किल्ली समजू लागल्या आहेत. पण तंत्रज्ञानाचा आणि मानवी इतिहासाचा अभ्यास केला तर एक गोष्ट स्पष्ट दिसते. कोणत्याही नव्या आणि क्रांतिकारक तंत्रज्ञानाच्या सुरुवातीला अपेक्षांचा एक प्रचंड फुगा तयार होतो. काही काळानंतर तो फुटतो आणि वास्तवाची खरी परीक्षा सुरू होते. भूतकाळात इंटरनेटचे आगमन, डॉटकॉम क्रांती, ब्लॉकचेन आणि अलीकडील मेटाव्हर्सबाबत नेमकी हीच प्रक्रिया घडली होती. सुरुवातीला या तंत्रज्ञानाबद्दल अफाट उत्सुकता आणि अवास्तव दावे केले गेले, नंतर बाजारपेठ स्थिर झाली आणि केवळ खरी मूल्ये निर्माण करणारी तंत्रज्ञानेच टिकून राहिली. कृत्रिम बुद्धिमत्तेबाबतही आज नेम की अशीच प्रक्रिया सुरू आहे. परंतु, याचा अर्थ असा मुळीच नाही की कृत्रिम बुद्धिमत्ता संपणार आहे किंवा तिचे अस्तित्व मिटणार आहे. उलट, एआय ही काळाची गरज बनून प्रत्येक उद्योगाचा, दैनंदिन कामकाजाचा आणि मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग होणार आहे. मात्र, बदलणार आहे ती नोकरी मिळवण्याची आणि टिकवण्याची धडपड. 'मला एआय वापरता येते' किंवा 'मी एआयचे टूल वापरू शकतो' एवढ्या प्राथमिक कौशल्यावर नोकरी मिळण्याचे दिवस लवकरच संपतील.

भविष्यकालीन उद्योगांना अशा व्यक्ती हव्या असतील ज्या क्लिष्ट समस्यांचे अचूक विश्लेषण करू शकतील, संकटसमयी योग्य आणि नैतिक निर्णय घेऊ शकतील, विविध क्षेत्रांमधील लोकांसोबत संघात काम करू शकतील आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ग्राहकांच्या व्यवसायाची खरी तांत्रिक आणि व्यावहारिक गरज समजू शकतील. एआय हा तंत्रज्ञानाच्या प्रवासात केवळ एक सक्षम सहाय्यक असेल; पण माणूसच अंतिम निर्णय घेणारा, निकालांची जबाबदारी स्वीकारणारा आणि व्यवसायात प्रत्यक्ष मूल्य निर्माण करणारा अधिकारी असणार आहे. आज आयटी आणि इतर उद्योगांमधील अनेक आघाडीच्या कंपन्या स्पष्टपणे सांगत आहेत की, त्यांना केवळ कागदी पदव्या, उच्च गुण किंवा महागडी प्रमाणपत्रे नकोत तर कामाच्या ठिकाणी येणाऱ्या प्रत्यक्ष समस्या सोडवण्याची क्षमता हवी आहे. एखाद्या ग्राहकाच्या व्यवसायातील नेमकी अडचण काय आहे हे समजून घेणे, त्यावर व्यावहारिक आणि तांत्रिक उपाय शोधणे, उत्पादनाचा खर्च कमी करणे, कामाची उत्पादकता वाढवणे आणि ग्राहकाला पूर्ण समाधान देणे हीच खरी आणि शाश्वत कौशल्ये आहेत. उद्योगात दीर्घकालीन यश मिळवण्यासाठी केवळ तांत्रिक कौशल्ये पुरेशी नसतात, तर योग्य दृष्टिकोन, त्यागाची वृत्ती आणि मदतीची भावना हे गुण अत्यंत निर्णायक ठरतात. आज उद्योगांना 'मी सर्व जाणतो' या अहंकारी वृत्तीपेक्षा शिकण्याची तयारी असणारी, चुका मान्य करणारी आणि सकारात्मक विचार करणारी माणसे हवी आहेत. अडचणीच्या वेळी तक्रार करण्याऐवजी उपायांवर लक्ष केंद्रित करणारा दृष्टिकोनच कर्मचाऱ्याला उंचावर नेतो.

यशाचा कोणताही सोपा मार्ग नसतो. करिअरच्या सुरुवातीच्या काळात किंवा मोठ्या प्रकल्पांच्या वेळी आपल्या सोयीचा, वेळेचा आणि कम्फर्ट झोनचा त्याग करून जास्तीत जास्त काम शिकणे आणि जबाबदारी घेणे आवश्यक असते. कठोर परिश्रम आणि समर्पणाची तयारीच भविष्यातील मोठ्या संधींची पायाभरणी करते. आजचे मोठे प्रकल्प सांघिक प्रयत्नांवर चालतात. सहकाऱ्यांना मदत करणे, आपले ज्ञान इतरांशी वाटून घेणे आणि टीममधील प्रत्येकाला सोबत घेऊन पुढे जाण्याची वृत्ती व्यक्तीला खऱ्या अर्थाने नेतृत्वगुण मिळवून देते. संकटात सापडलेल्या सहकाऱ्याला किंवा ग्राहकाला पुढे होऊन मदत करणारा कर्मचारी किंवा अधिकारीच संस्थेसाठी खरे भांडवल ठरतो. कृत्रिम बुद्धिमत्ता काही सेकंदांमध्ये हजारो ओळींचे कोडिंग लिहू शकते किंवा माहितीचे विश्लेषण करू शकते, पण ग्राहकाची वास्तविक मानसिक आणि व्यावसायिक समस्या काय आहे, हे समजून घेण्यासाठी मानवी विचारशक्ती, सहानुभूती आणि प्रत्यक्ष अनुभवच आवश्यक असतो. कृत्रिम बुद्धिमत्ता जितकी सक्षम आणि हुशार होत आहे, तितकेच तिचे दुष्परिणामही समोर येत आहेत. एआयच्या मदतीने केले जाणारे सायबर हल्ले अधिक बुद्धिमान, जटिल आणि घातक होत आहेत. पुढील काही दशकांमध्ये डेटा संरक्षण, डेटा गोपनीयता, डिजिटल विश्वास, वित्तीय सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी प्रशिक्षित सायबर सुरक्षा तज्ज्ञांची गरज प्रचंड वाढणार आहे. मग ते सॉफ्टवेअर असो, क्लाउड नेटवर्क असो की हार्डवेअर उपकरणे; त्यांना सुरक्षित ठेवणे हे मोठे आव्हान आहे. त्यामुळे आयटी आणि इंजिनिअरिंगच्या प्रत्येक विद्यार्थ्याने सायबर सुरक्षेचे मूलभूत ज्ञान आत्मसात करायला हवे.

आजच्या डिजिटल आणि एआयच्या युगात बहुतांश विद्यार्थ्यांचा कल सॉफ्टवेअर, डेटा सायन्स किंवा कोडिंगकडेच दिसून येतो. परंतु, एका अत्यंत महत्त्वाच्या आणि पायाभूत क्षेत्राकडे दुर्दैवाने दुर्लक्ष केले जाते, ते म्हणजे हार्डवेअर, नेटवर्किंग आणि डिव्हाईस मेंटेनन्स. एआय कितीही प्रगत झाले, सॉफ्टवेअर कितीही हुशार झाले, तरी ते चालवण्यासाठी भौतिक पायाभूत सुविधांची गरज असतेच. सर्व्हर, राऊटर्स, डेटा सेंटर्स, फायबर ऑप्टिक केबल्स, लॅपटॉप, संगणक, सेन्सर्स, आयओटी उपकरणे आणि उच्च क्षमतेच्या क्लाउड सिस्टीम्स या भौतिक उपकरणांशिवाय कोणतेही सॉफ्टवेअर किंवा एआय मॉडेल चालूच शकत नाही. हार्डवेअर आणि नेटवर्किंग तज्ज्ञांची गरज आज जगातील प्रत्येक क्षेत्रात आहे आणि ती कधीही संपणारी नाही. भारतात सध्या मोठ्या प्रमाणावर जागतिक क्षमता केंद्रे अर्थात ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स उभी रहात आहेत. बँकिंग, विमा, आरोग्यसेवा, वाहन उद्योग, औषधनिर्मिती, उत्पादन, किरकोळ व्यापार आणि ऊर्जा अशा विविध क्षेत्रांमधील जगभरातील अग्रगण्य कंपन्या भारतातून त्यांचे मुख्य संशोधन, अभियांत्रिकी, डेटा विश्लेषण, सायबर सुरक्षा आणि डिजिटल परिवर्तनाची कामे करत आहेत. याचाच अर्थ असा की, भविष्यात केवळ माहिती तंत्रज्ञानाचे ज्ञान पुरेसे राहणार नाही. ज्या तंत्रज्ञाला आयटीबरोबरच बँकिंग आणि वित्तीय सेवा, आरोग्यसेवा, उत्पादन अभियांत्रिकी, औषधनिर्मिती, पुरवठा साखळी यासारख्या प्रत्यक्ष उद्योगक्षेत्रांचे सखोल ज्ञान असेल, त्याला बाजारात प्रचंड मागणी असेल.

आज अनेक विद्यार्थी आणि तरुण 'प्रॉम्प्ट इंजिनिअरिंग' म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेला योग्य सूचना देऊन काम करून घेण्याचे कौशल्य हेच कालानुरुप अपेक्षित मुख्य भविष्य समजू लागले आहेत. नक्कीच, आजच्या घडीला हे एक उपयुक्त आणि नवीन कौशल्य आहे; परंतु ते स्वतंत्र करिअर म्हणून दीर्घकाळ टिकेलच असे नाही. पुढील काही वर्षांमध्ये एआय साधने इतकी प्रगत आणि सोपी होतील की, कोणताही सामान्य वापरकर्ता स्वतःच्या नैसर्गिक भाषेत हवे ते उत्कृष्ट निकाल मिळवू शकेल. त्यामुळे केवळ 'प्रॉम्प्ट लिहिणे' ही काही विशेष स्पर्धात्मक जमेची बाजू राहणार नाही. आज भारतीय तंत्रज्ञांसाठी आणि विशेषतः माहिती तंत्रज्ञान व इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी जपान ही एक अभूतपूर्व सुवर्णसंधी ठरत आहे. जपानमध्ये वेगाने वृद्ध होत चाललेली लोकसंख्या, तिथल्या उद्योगांमधील डिजिटल परिवर्तनाची प्रचंड गरज आणि कुशल मनुष्यबळाची तीव्र कमतरता यामुळे भारतीय अभियंते, आयटी व्यावसायिक, नेटवर्किंग आणि हार्डवेअर तज्ज्ञ आणि सायबर सुरक्षा तज्ज्ञांसाठी दारे खुली झाली आहेत. मात्र, या संधीचा फायदा घेण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान असून चालणार नाही. विद्यार्थ्यांना जपानी भाषा आत्मसात करावी लागेल तसेच तिथली अत्यंत शिस्तबद्ध कार्यसंस्कृती, वेळेचे काटेकोर पालन आणि गुणवत्तेबाबत तडजोड न करण्याची मानसिकता अंगीकारावी लागेल. जपानप्रमाणेच जर्मनी, दक्षिण कोरिया आणि युरोपमधील इतर देशांमध्येही तंत्रज्ञानाबरोबरच स्थानिक भाषेचे ज्ञान असलेल्या कुशल व्यावसायिकांना मोठे प्राधान्य दिले जात आहे.

भविष्यात परकीय भाषा ही केवळ अतिरिक्त पात्रता राहणार नाही, तर उच्च वेतनाच्या जागतिक करिअरचे मुख्य प्रवेशद्वार ठरेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा फुगा फुटेल म्हणजे हे तंत्रज्ञान नष्ट होईल किंवा बंद पडेल असे मुळीच नाही. फुटेल तो केवळ अवास्तव अपेक्षांचा आणि चुकीच्या समजांचा फुगा. आपल्या क्षेत्राचे सखोल आणि पायाभूत ज्ञान असेल, सतत नवीन गोष्टी शिकण्याची आणि बदलण्याची वृत्ती असेल, योग्य आणि सकारात्मक दृष्टिकोन असेल, उद्योगांना प्रत्यक्ष उपयोगी पडणारी व्यावहारिक कौशल्ये (सॉफ्टवेअर, हार्डवेअर, नेटवर्किंग, सायबर सुरक्षा) असतील ते स्पर्धेत टिकतील. त्यामुळे हा इशारा किंवा वास्तव विद्यार्थ्यांना घाबरवण्यासाठी किंवा भीती निर्माण करण्यासाठी नाही, तर योग्य वेळी जागे करण्यासाठी आहे.

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

**सध्याच्या परिस्थितीमध्ये पर्यटनाची व्याख्या बदलली आहे. लोकांना सिमेंटची जंगले आणि कृत्रिम रिसॉर्ट्स नको आहेत. त्यांना हेरीटेजसह शुद्ध हवा, संथ वाहणारी नदी आणि शांत समुद्रकिनारा हवा आहे. कोकणातील आंबा, काजू, कोकम, सुपारीच्या बागा ही पर्यटकांची आकर्षणे आहेत. 'होमस्टे'मुळे पर्यटकांना खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेता येत आहे. त्याचवेळी स्वच्छ आणि सुंदर म्हणून ओळख असलेले इथले किनारे आणि गावे कचऱ्याच्या विळख्यात अडकत आहेत. कोकणसाठी 'पर्यावरणपूरक विकास' स्वीकारताना 'जबाबदार पर्यटन' संकल्पना रुजवण्याची आवश्यकता आहे. निसर्गसंपदा, सुंदर समुद्रकिनारे आणि संवेदनक्षम जैवविविधता टिकवण्यासाठी हे पाऊल उचलणे आवश्यक आहे, असे मत 'जागतिक पर्यटन दिन' आणि 'जागतिक नदी दिन' पूर्वसंध्येला पर्यटन-पर्यावरण अभ्यासक-साहित्यिक धीरज वाटेकर यांनी व्यक्त केले आहे.**

# कोकणात 'जबाबदार पर्यटन' संकल्पना रुजवण्याची आवश्यकता

धीरज वाटेकर


अथांग समुद्रकिनारे, हिरवीगार वनराई, ऐतिहासिक किल्ले, आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा यांमुळे पर्यटकांची पावले कोकणाकडे वळत आहेत. कोकणची स्वतःची एक वेगळी जीवनशैली, दशावतार, जाखडी सारख्या लोककला आणि खाद्यसंस्कृती आहे. कोकणची जैवविविधता संवेदनशील आहे. समुद्रकिनाऱ्यांवर होणारी प्लास्टिकची गर्दी, कांदळवनांचे (मॅन्ग्रोव्हज) नुकसान, वाढते प्रदूषण यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. वाढत्या पर्यटनासोबत कोकणच्या मूळ सौंदर्याला, पर्यावरणाला तडे जाऊ लागलेत. आपण निसर्गाचा अतिवापर केला, तर भविष्यातील पिढ्यांसाठी काहीच उरणार नाही. त्यामुळे आपल्याला निसर्गपूरक पर्यटनाची प्रारूपे विकसित करावी लागणार आहेत. यासाठी कायद्यांच्या कठोर अंमलबजावणीसह हॉटेल व्यावसायिक, पर्यटक आणि स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वय निर्माण होण्याची आवश्यकता आहे. येणाऱ्या पर्यटकांना 'अतिथी देवो भव' म्हणताना कोकणच्या भूमीलाही 'पवित्र' मानून तसेच वावरण्याची जाणीव करून द्यावी लागणार आहे. कोकणात, पर्यटक आणि पर्यटन व्यावसायिक दोघेही निसर्ग, पर्यावरण आणि स्थानिक संस्कृतीला कोणतीही हानी न पोहोचवता पर्यटनाचा आनंद घेतील असे 'जबाबदार पर्यटन' रुजविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. आपल्याला पर्यटकांमध्ये कचरा व्यवस्थापन आणि निसर्गाचा आदर राखण्याची जाणीव निर्माण करावी लागणार आहे. समुद्रकिनाऱ्यावर कुठेही कचरा टाकणाऱ्यांवर मोठा आर्थिक दंड आकारण्याची आवश्यकता आहे. यासाठी समुद्रकिनाऱ्यांवर 'स्वच्छता व सुरक्षा रक्षक' नेमावे लागतील. कचऱ्याच्या उगमस्थानी असलेल्या हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि होमस्टे धारकांना ओला आणि सुका कचरा वेगळा करणे बंधनकारक करावे लागेल. ओल्या कचऱ्यापासून खत निर्मितीचे प्रकल्प राबवावे लागतील. कोकणात सर्वत्र दर्शनी भागात 'निसर्गाचा आदर करा', 'कचरा कुंडीचा वापर करा' अशा स्वरूपाचे फलक मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत लावण्याची गरज आहे. कोणत्याही पर्यटनस्थळाची कचरा पेलण्याची स्वतःची एक क्षमता असते. पर्यटनाचा आनंद घेताना निसर्गाची हानी होणार नाही, याची जबाबदारी घेण्याची पर्यटकांनी मानसिकता बनवण्याची आवश्यकता आहे. तशी वातावरण निर्मिती आपल्याला कोकणात करावी लागणार आहे. कोकणात प्रवेश करणाऱ्या प्रमुख घाटांवर किंवा टोल नाक्यांवर पर्यटकांच्या वाहनांची तपासणी करून कचरा योग्य त्या ठिकाणी संकलित करता येईल. समुद्रकिनाऱ्यावर, ऐतिहासिक किल्ल्यांवर आणि पर्यटन स्थळांवर क्यूआर कोड लावून पर्यटकांना परिसराचे महत्त्व आणि कचरा न करण्याचे आवाहन करणारा दृकश्राव्य संदेश देता येईल.

कोकणात अलिबाग, मुरुड, दिवेआगर, गुहागर, दापोली, गणपतीपुळे, आंबोली, मालवण, तारकर्ली, वेंगुर्ला यांसारख्या समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची वर्षभर गर्दी असते. स्कूबा डायव्हिंग, वॉटर स्पोर्ट्स आदी उपक्रमांमुळे पर्यटनाला व्यावसायिक स्वरूप आले आहे. 'होमस्टे'च्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे होत असलेले चौपदरीकरण आणि रेल्वे गाड्यांच्या संख्या विस्तारामुळे कोकणात पोहोचणे सोपे झाले आहे. यामुळे पर्यटन वाढण्यासोबत एकेकाळी स्वच्छ आणि सुंदर म्हणून ओळखले जाणारे कोकणातील किनारे आणि गावे हळूहळू कचऱ्याच्या विळख्यात अडकू लागली आहेत. पूर्वी कोकणात येणारा कचरा हा प्रामुख्याने जैविक किंवा विघटनशील स्वरूपाचा असायचा. परंतु, पर्यटनाच्या व्यापारीकरणामुळे कचऱ्याचे स्वरूप गुंतागुंतीचे आणि घातक झाले आहे. सध्या पर्यटनाच्या ठिकाणी सर्वाधिक आढळणारा कचरा म्हणजे प्लास्टिक आहे. पाण्याच्या बाटल्या, शीतपेयांचे कॅन, वेफर्सची पाकिटे, प्लास्टिकचे चमचे आणि पिशव्या कशाही फेकून दिल्या जातात. हे प्लास्टिक समुद्रकिनाऱ्यावर आणि समुद्रात जमा होत आहे. अनेक समुद्रकिनाऱ्यांवर रात्रीच्या वेळी मद्यपान करणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण वाढले आहे. काचेच्या बाटल्या तिथेच टाकल्या जातात किंवा फोडल्या जातात. इलेक्ट्रॉनिक कचरा, खराब झालेले साहित्य आणि सॅनिटरी वेस्ट यांचे प्रमाणही चिंताजनक रितीने वाढते आहे. याचा कोकणाच्या संवेदनशील परिसंस्थेवर घातक परिणाम होत आहे. खरंतर कोकणातील पर्यटनस्थळांना 'झिरो वेस्ट' झोनच्या दिशेने नेण्याची आवश्यकता आहे. पण सध्या प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, पॅकेज्ड फूड यांवर पूर्ण बंदी घातल्यास पर्यटकांची गैरसोय होऊ शकते. त्यासाठी कोकणात प्रथम सक्षम आणि पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध करावे लागतील. कोकणातील पांढरी वाळू आणि स्वच्छ पाण्यासाठी ओळखले जाणारे किनारे भविष्यात कचऱ्याचे आगार वाटण्याची चिन्हे असल्याचा धोका वाटेकर यांनी अधोरेखित केला आहे.




शनिवार-रविवार किंवा सुट्ट्यांच्या काळात कोकणात येणारे पर्यटक मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक कचरा किनाऱ्यावर, रस्त्याशेजारी किंवा जंगलात टाकून जातात. पर्यटकांमध्ये शिस्तीचा अभाव ही सर्वात मोठी अडचण आहे. कोकणातील पर्यटनस्थळे दूरस्थ विखुरलेली आहेत. तिथून गोळा केलेला कचरा रिसायकलिंग प्लांटपर्यंत वाहून नेणे डोंगराळ आणि अंतर्गत भागांमुळे खर्चिक व कठीण ठरते आहे. अनेक गावांमध्ये किंवा समुद्रकिनाऱ्यांवर कचरा गोळा करणे, त्याचे वर्गीकरण करणे आणि ओल्या कचऱ्यापासून खत बनवण्यासाठी आवश्यक असणारे आधुनिक प्रकल्प अद्याप उपलब्ध नाहीत. कोकणात अतिवृष्टी होते. मुसळधार पावसामुळे उघड्यावरील कचरा व्यवस्थापन कोलमडते आणि नद्यांमधून वाहून आलेला प्लॅस्टिक कचरा थेट समुद्रात व किनाऱ्यांवर साचतो. कधीकधी महापुराचे कारणही बनतो. कोकणातील ग्रामपंचायतींकडे मर्यादित निधी आणि मनुष्यबळ असते. अचानक वाढणाऱ्या पर्यटकांच्या संख्येनुसार कचऱ्याचे व्यवस्थापन करणे स्थानिक प्रशासनाला जमत नाही हे वास्तव आहे. आजही कोकणातील बहुतांश गावे आणि नगरपालिकांकडे कचरा गोळा करण्यासाठी, त्याचे वर्गीकरण करण्यासाठी आणि वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी पुरेशी यंत्रणा किंवा डंपिंग ग्राऊंड्स उपलब्ध नाही. अनेक पर्यटक निसर्गाचा आनंद घेण्यासाठी येतात, पण तिथली स्वच्छता राखण्याची जबाबदारी विसरतात. 'आपण पैसे दिले आहेत, तर कचरा कुठेही टाकण्याचा आपल्याला अधिकार आहे' अशी मानसिकता अनेकदा पाहायला मिळते. यामुळे कोकणात समुद्रकिनाऱ्यासह सर्वत्र कुठेही कचरा टाकणाऱ्यांवर मोठा आर्थिक दंड आकारताना 'जबाबदार पर्यटन' संकल्पना रुजवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे वाटेकर यांनी म्हटले आहे.

# शिक्षणाची अपेक्षित नवी दिशा



सुनील गवळी

भारताचे संविधान हे केवळ एका देशाच्या राज्यकारभाराचे नियम पुस्तक नाही; ते जगातील विविध लोकशाही व्यवस्थांचा सखोल अभ्यास, चिंतन आणि भारतीय परिस्थितीनुसार केलेल्या पुनर्रचनेचे एक अद्वितीय उदाहरण आहे. भारतीय संविधानाची निर्मिती करताना घटनाकारांनी जगातील विविध देशांच्या राज्यव्यवस्था, लोकशाहीची तत्त्वे, नागरिकांचे अधिकार, शासनपद्धती आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनांचा अभ्यास केला. ब्रिटनची संसदीय परंपरा, अमेरिकेतील मूलभूत अधिकारांची संकल्पना, आयर्लंडमधील मार्गदर्शक तत्त्वे आणि इतर देशांतील विविध घटनात्मक विचारांचा अभ्यास करून त्यातील उपयुक्त तत्त्वे भारतीय परिस्थितीशी सुसंगत पद्धतीने स्वीकारण्यात आली.

जगाकडून विचार घ्यायचे, पण त्यांची भारतीय परिस्थितीनुसार पुनर्रचना करायची की हीच आपल्या संविधाननिर्मितीची महत्त्वाची शिकवण आहे.

आज शिक्षणव्यवस्थेकडे पाहताना हाच दृष्टिकोन स्वीकारण्याची वेळ आली आहे. ज्या भारताने आपल्या लोकशाहीची रचना करताना जगातील विविध लोकशाही व्यवस्थांचा अभ्यास केला, त्याच भारताने आपल्या भावी पिढीची शिक्षणव्यवस्था घडवताना जगातील विविध प्रगत शिक्षणपद्धतींचा अभ्यास करून त्यातील उपयुक्त बाबी भारतीय गरजांनुसार स्वीकारणे आवश्यक आहे.

अमेरिकेच्या शिक्षणव्यवस्थेकडे पाहिले तर एक वेगळा दृष्टिकोन जाणवतो. तेथील -१२ शिक्षणरचनेत बालवाडीपासून बारावीपर्यंतच्या शिक्षणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच विविध कौशल्ये, निवड, अनुभव आणि पुढील जीवनासाठीची तयारी यांना महत्त्व दिले जाते. मात्र अमेरिकन पद्धतीचा अर्थ केवळ एक विशिष्ट अभ्यासक्रम किंवा शाळेची रचना एवढाच नाही. तिच्यामागे असलेली मूलभूत विचारसरणी अधिक महत्त्वाची आहे.विद्यार्थ्याला केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार करणे.

यातून भारतीय शिक्षणव्यवस्थेसमोर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो की आपल्या विद्यार्थ्यांना आपण किती माहिती देतो यापेक्षा, त्या माहितीचा उपयोग करून ते जीवनातील प्रश्न सोडवू शकतील का?

आपल्या शिक्षणव्यवस्थेत अनेक वर्षे पदवीला यशाचे प्रमुख मापदंड मानले गेले. चांगले गुण, चांगली पदवी आणि त्यानंतर चांगली नोकरी, असा एक सरळ मार्ग समाजाच्या मनात तयार झाला. परिणामी विद्यार्थ्यांच्या हातातील प्रत्यक्ष कौशल्य, त्याची सर्जनशीलता, प्रयोगशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि स्वतः काही निर्माण करण्याची वृत्ती या बाबी अनेकदा दुय्यम ठरल्या.

आज ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. पदवी महत्त्वाची आहे; पण पदवीपेक्षा क्षमता मोठी आहे. विद्यार्थ्याने काय पाठ केले यापेक्षा त्याला काय समजले, काय करता येते, नवीन परिस्थितीत तो काय शिकू शकतो आणि आपल्या ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात कसा उपयोग करू शकतो, याला अधिक महत्त्व मिळाले पाहिजे. शिक्षणाचा केंद्रबिंदू ''मला किती गुण मिळाले?'' यापासून ''मला काय करता येते?'' या प्रश्नाकडे सरकला पाहिजे.

याच संदर्भात कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व वाढते. इलेक्ट्रिशियन, प्लंबर, सुतार, मेकॅनिक, तंत्रज्ञ, संगणक तंत्रज्ञ, कृषितंत्रज्ञ, डिझायनर किंवा इतर व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करणाऱ्या व्यक्ती समाजाच्या विकासात तितक्याच महत्त्वाच्या असतात. कोणतेही प्रामाणिक काम लहान नाही, ही जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात शालेय जीवनापासून निर्माण झाली पाहिजे.

कामाची प्रतिष्ठा ही केवळ सामाजिक मूल्य नाही; ती आर्थिक विकासाचीही पायाभूत गरज आहे. विद्यार्थ्याने आपल्या हाताने काही निर्माण केले, एखादी वस्तू दुरुस्त केली, एखादी सेवा दिली, छोटा व्यवसाय उभा केला किंवा एखाद्या समस्येवर प्रत्यक्ष उपाय शोधला तर त्याकडे ''अभ्यासापासून दूर गेलेला विद्यार्थी'' म्हणून पाहण्याऐवजी ''कौशल्य विकसित करणारा विद्यार्थी'' म्हणून पाहण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे.

अमेरिकन शिक्षणव्यवस्थेतील क्रेडिट सिस्टीमचा विचार केला तर विषय निवडीतील लवचिकता हा आणखी एक महत्त्वाचा पैलू दिसतो. विद्यार्थ्याला त्याच्या आवडीनुसार विविध विषयांचा अभ्यास करण्याची संधी मिळते. विज्ञान शिकणाऱ्या विद्यार्थ्याला संगीत, कला, व्यवसाय किंवा इतर विषयांचा अनुभव घेता येतो. या मागची विचारसरणी अशी की, विद्यार्थी एका चौकटीत बसविण्यासाठी नसतो; शिक्षणाची चौकट विद्यार्थ्याच्या क्षमता आणि आवडींना विस्तार देण्यासाठी असते.

भारतातही राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने विषयांच्या कठोर भिंती कमी करून बहुविषयक आणि लवचिक शिक्षणाला दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. कला, विज्ञान, व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य यांच्यातील कृत्रिम अंतर कमी करणे ही या परिवर्तनातील महत्त्वाची बाब आहे.

याचबरोबर अमेरिकेतील सारख्या संकल्पनेतून आणखी एक महत्त्वाचा विचार समोर येतो की प्रत्येक विद्यार्थ्याने एकाच प्रकारचा चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम करणे आवश्यक नाही. काही विद्यार्थ्यांना अल्पकालीन तांत्रिक किंवा व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन लवकर रोजगाराच्या किंवा स्वयंरोजगाराच्या क्षेत्रात प्रवेश करायचा असतो. काहींना पुढे उच्च शिक्षण घ्यायचे असते. काहींना उद्योजकता करायची असते. शिक्षणव्यवस्थेने या विविध मार्गांना समान प्रतिष्ठा आणि योग्य संधी दिल्या पाहिजेत. भारतामध्ये , कौशल्य विकास केंद्रे, पॉलिटेक्निक, व्यावसायिक अभ्यासक्रम आणि नव्या स्वरूपातील कौशल्याधारित शिक्षण यांना अधिक प्रभावीपणे मुख्य शिक्षणप्रवाहाशी जोडण्याची गरज यामुळे अधोरेखित होते.

याचा अर्थ असा नाही की प्रत्येक विद्यार्थ्याने पदवी घेऊ नये. उलट, उच्च शिक्षण, संशोधन आणि ज्ञाननिर्मितीचे महत्त्व कायमच राहणार आहे. अमेरिकेच्या उदाहरणातूनही हे स्पष्ट होते की संशोधन, विद्यापीठे, विज्ञान, तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण विचार हे आर्थिक व सामाजिक विकासातील महत्त्वाचे घटक आहेत. म्हणून शिक्षणव्यवस्थेने दोन टोकांमध्ये संतुलन साधले पाहिजे.उच्च ज्ञान आणि प्रत्यक्ष कौशल्य. एकीकडे संशोधक, वैज्ञानिक, डॉक्टर, अभियंते, प्राध्यापक आणि तज्ज्ञ निर्माण झाले पाहिजेत; तर दुसरीकडे अत्यंत कुशल तंत्रज्ञ, कारागीर, उद्योजक आणि सेवा-व्यावसायिकही निर्माण झाले पाहिजेत. विकसित समाजाला दोन्ही प्रकारच्या मानवी क्षमतेची आवश्यकता असते. याच ठिकाणी शिक्षण आणि अर्थव्यवस्था यांचा संबंध स्पष्ट होतो. शिक्षणाने केवळ नोकरी शोधणारे तरुण तयार करायचे की समस्या ओळखून त्यातून नवीन संधी निर्माण करणारे तरुण तयार करायचे?

उद्योजकता म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने व्यवसाय करणे नव्हे. उद्योजकता म्हणजे प्रश्नांकडे संधी म्हणून पाहण्याची वृत्ती, जोखीम समजून घेण्याची क्षमता, नवीन कल्पना मांडण्याची हिंमत आणि त्या कल्पनेचे कृतीत रूपांतर करण्याची तयारी. ही मानसिकता शालेय स्तरावर विकसित होऊ शकते.

शाळेत छोटा प्रकल्प, स्थानिक समस्येचा अभ्यास, उत्पादननिर्मिती, आर्थिक व्यवहाराचे प्राथमिक ज्ञान, डिजिटल कौशल्य, बाजारपेठेची ओळख आणि टीमवर्क यांसारख्या अनुभवांमधून विद्यार्थी केवळ ''परीक्षार्थी'' न राहता ''निर्माता'' बनू शकतो.

याचबरोबर परीक्षा पद्धतीकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला पाहिजे. तीन तासांच्या प्रश्नपत्रिकेत विद्यार्थ्याची संपूर्ण क्षमता मोजता येत नाही. स्मरणशक्ती आवश्यक आहे; पण तिच्याबरोबर आकलन, विश्लेषण, सर्जनशीलता, संवाद, सहकार्य, समस्या सोडविणे आणि प्रत्यक्ष कृती यांचेही मूल्यमापन झाले पाहिजे. परीक्षा ही शिक्षणाचा शेवट नसून शिक्षण समजून घेण्याचे एक साधन असले पाहिजे. हीच बदलती विचारसरणी शिक्षकाच्या भूमिकेतही परिवर्तन घडवते.


पूर्वी शिक्षक हा ज्ञानाचा प्रमुख स्रोत होता. आजच्या डिजिटल युगात माहिती विद्यार्थ्याला अनेक माध्यमांतून उपलब्ध होते. त्यामुळे शिक्षकाची भूमिका कमी होत नाही; उलट ती अधिक महत्त्वाची होते. शिक्षकाने माहिती देणाऱ्यापेक्षा विचार करायला शिकवणारा, प्रश्न विचारायला प्रवृत्त करणारा, योग्य-अयोग्य माहितीची चिकित्सा करायला शिकवणारा आणि विद्यार्थ्यांच्या क्षमतेला दिशा देणारा मार्गदर्शक बनणे आवश्यक आहे.

याच बदलाची अपेक्षा पालकांकडूनही आहे. पालकांनी मुलाच्या गुणपत्रिकेकडे पाहणे आवश्यक आहे; पण त्यापेक्षा त्याच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहणे अधिक आवश्यक आहे. ''माझ्या मुलाला किती गुण मिळाले?'' या प्रश्नाबरोबर ''माझ्या मुलाला काय आवडते?'', ''त्याची क्षमता कोणत्या क्षेत्रात आहे?'', ''त्याला कोणते कौशल्य विकसित करता येईल?'', ''तो स्वतःच्या पायावर कसा उभा राहू शकतो?'' हे प्रश्नही विचारले गेले पाहिजेत.

मुलाला प्रत्येक वेळी इतरांशी तुलना करण्याऐवजी कालच्या स्वतःपेक्षा आज तो किती विकसित झाला आहे, हे पाहण्याची संस्कृती निर्माण झाली पाहिजे.

शेवटी शिक्षणाचा प्रश्न हा केवळ शाळेचा किंवा शिक्षण विभागाचा प्रश्न नाही. तो भारताच्या भविष्यातील नागरिकांचा प्रश्न आहे.

# सजावटीतून सार्वजनिक अवकाशाकडे पुनर्वापराची नवी वाट!




**प्रियांका सावंत**

गणपतीत बाहेर मुसळधार पाऊस कोसळत असतो. रस्त्यांवर साचलेले पाणी, कोपऱ्यावरचा कचरा, प्लास्टिकच्या बाटल्या आणि रोजचा नागरी गोंधळ. पण याच पावसाळी रस्त्याच्या एका आडोशाला मंडळांची लगबग सुरू होते. अंदाजपत्रक, बैठका, वर्गणी, देखाव्याचे रेखाटन आणि साहित्याची जमवाजमव. एकेकाळी आठवडाभर आधी होणारी ही पूर्वतयारी आता दोन महिने आधीच आकाराला येते. आणि मग बाप्पाचे आगमन होते. तोच परिचित, गजबजलेला रस्ता रातोरात पालटतो. आरतीचा नाद, घंटानाद, कापूर-धूपाचा दरवळ आणि ढोल-ताशांच्या तालावर दुमदुमणारा 'गणपती बाप्पा मोरया!'चा जयघोष. कालपर्यंत अस्ताव्यस्त वाटणारा रस्ता अचानक एका चैतन्यमय सामुदायिक अवकाशात रूपांतरित होतो. ही केवळ सजावट नसते; ती वस्तीच्या सामूहिक स्मृतीची, श्रद्धेची आणि कलात्मकतेची एकत्र वीण असते. पण दहा दिवसांचा उत्सव संपतो आणि त्यानंतरचे एक वेगळे दृश्य समोर येते.

रोषणाई उतरते, मंडप उखडले जातात आणि हजारो डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या देखाव्याचे तुकडे रस्त्यांच्या कडेला, गटारांत आणि पाणवठ्यांत दिसू लागतात. प्लास्टिक, थर्माकोल, सिंथेटिक कापड आणि संमिश्र साहित्याचा कचरा पुन्हा शहरावर पर्यावरणीय भार बनून कोसळतो. मग प्रश्न असा पडतो आपण उत्सव किंवा सजावट कमी करायची का? मुळीच नाही. हा आनंद, ही कला आणि ही परंपरा आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे. प्रश्न उत्सवाचा नाही; प्रश्न त्या उत्सवासाठी वापरलेल्या साहित्याच्या पुढच्या आयुष्याचा आहे. एक आर्किटेक्ट म्हणून मला या मंडपांकडे वेगळ्या नजरेने पाहावेसे वाटते. दहा दिवसांसाठी उभे राहणारे हे मंडप म्हणजे प्रत्यक्षात एक प्रकारची 'तात्पुरती वास्तुरचना' (Temporary Architecture) असतात. वास्तुरचनेत एक महत्त्वाचे तत्त्व आहे 'डिझाइन फॉर डिसअ‍ॅसेम्ब्ली' म्हणजे एखादी रचना उभी करतानाच ती नंतर सहजपणे कशी सुटेल आणि तिच्या प्रत्येक घटकाचा पुन्हा कसा वापर करता येईल, याचा विचार करणे.

तात्पुरते असणे म्हणजे फेकून देण्याजोगे असणे नव्हे. म्हणून मंडळांनी मंडपाच्या पहिल्या डिझाइनपासूनच त्याच्या पुढच्या वापराचा विचार करणे अत्यावश्यक आहे.

**मॉड्युलर जोडण्यांचा वापर :** साहित्य कायमचे फेव्हिकॉल किंवा खिळ्यांनी जोडण्याऐवजी नट-बोल्ट, क्लॅम्प्स किंवा स्क्रूने जोडावे. त्यामुळे विघटन करताना प्लायवूड, लाकूड आणि फ्रेम्स अखंड राहतील आणि पुढील वर्षी पुन्हा वापरता येतील.

**साहित्याचा मटेरियल पासपोर्ट :** मंडपात काय वापरले, किती वापरले, ते कसे वेगळे करायचे आणि पुढे कुठे उपयोगी पडेल, याची एक साधी नोंदवही ठेवावी. यामुळे पुढील वर्षी अनावश्यक साहित्य पुन्हा खरेदी करण्याचा खर्चही टाळता येईल.

**साहित्याचा स्थानिक पुनर्वापर :** देखाव्याचे मोठे पॅनेल्स, लाकडी फळ्या आणि पत्रे पुढील सणांसाठी जपता येतील. त्याहून पुढे जाऊन, त्याच परिसरातील सार्वजनिक वापरासाठी त्यांचे रूपांतर करता येईल. उदा. सूचना फलक, बसण्याची व्यवस्था किंवा सामुदायिक कार्यक्रमांसाठी आवश्यक रचना. गरजेनुसार हे साहित्य दुर्गम व आदिवासी भागातील शाळांना नोटीस बोर्ड, वर्गखोल्यांचे पार्टिशन किंवा बेंच म्हणूनही दान करता येईल.

**सेंद्रिय कचऱ्याचे नियोजन :** फुले, दुर्वा आणि पानांचे स्वतंत्र संकलन करून सोसायटी किंवा महापालिकेच्या मदतीने त्याचे खत, अगरबत्ती किंवा इतर उपयुक्त उत्पादनांमध्ये रूपांतर करता येईल.

अशा पद्धतीने मंडपाचा प्रवास 'उभारणी ते उत्सव, ते विघटन, ते पुनर्वापर' असा होऊ शकतो. म्हणजेच, दहा दिवसांचा उत्सव संपला तरी त्यासाठी वापरलेल्या साहित्याचे आयुष्य संपणार नाही.

पर्यावरणपूरक उत्सवासाठी केवळ प्रदूषण नियंत्रणाचे नियम किंवा शासकीय निर्बंध पुरेसे ठरणार नाहीत. हवामान बदलाचे चटके आपल्यालाच बसत असताना ही जाणीव आपल्या स्थानिक नियोजनाचा भाग झाली पाहिजे. पुढच्या पिढीला प्लास्टिक आणि गटारांच्या दुर्गंधीत नव्हे, तर खऱ्या निसर्गाच्या सान्निध्यात सण साजरा करता आला पाहिजे.

उत्सवाची खरी भव्यता केवळ त्या दहा दिवसांच्या झगमगाटात मोजली जाऊ नये; तर पडदा पडल्यानंतरही त्या साहित्याने समाज आणि शहराला काय परत दिले, यात मोजली जावी. सजावटीचे पर्यावरणीय भान उत्सव संपल्यावर नव्हे, तर सजावटीच्या पहिल्या डिझाइन स्केचपासूनच सुरू व्हायला हवे. ●


# 'जीवनयात्रा आनंदाची..

# तिमिरातुनी तेजाकडे

'तिमिरातुनी तेजाकडे' हे स्वाती कुलकर्णी यांचे पुस्तक संजय कुलकर्णी यांनी प्रकाशित केले आहे. 'मनोगत' मध्ये स्वाती यांनी आपल्या पहिल्या पुस्तकाची निर्मिती कशी झाली, हे सविस्तरपणे मांडले आहे. एप्रिल, २०२२ मध्ये त्यांच्या टॉन्सिल्सच्या कॅन्सरचे निदान झाले. कॅन्सरमधून बऱ्या होण्याच्या, या खडतर प्रवासाचा मागोवा पुस्तकात घेतला आहे. नांदेडचे सुप्रसिद्ध, डॉ. नंदू मुलमुले यांनी हे पुस्तक वाचून आपला समर्पक अभिप्राय दिला आहे. त्यानुसार, 'त्यांचा प्रांजळपणा, त्यांच्या स्वभावाला असलेली नर्मविनोदाची डूब, कॅन्सरच्या उपचारात त्यांच्या वाट्याला आलेले अनुभव आणि त्यावेळी जाणवलेली चिंता, भीती, काळजी, औदासिन्य त्यावर मनाने काढलेला मार्ग, सारे काही त्या प्रांजळपणे कथन करतात.'

जीवनाकडे नर्मविनोदी खेळकर वृत्तीने पाहण्याच्या त्यांच्या वृत्तीचे त्यांनी कौतुक केले आहे. बारा प्रकरणांतून पुस्तक वाचकांसमोर उलगडते. अद्वैत कुलकर्णी यांचे रंगीत मुखपृष्ठ समर्पक आहे. सलिल थिटे यांची पुस्तकातील समाविष्ट, रेखाचित्रे उत्तम झाली आहेत.

आज अचानक गाठ दिसे.. या पहिल्या प्रकरणात, कोर्टातील कामाचे टायपिंग करायला, ॲड. स्वाती गेल्या होत्या. त्यावेळी, २९ मार्च २०२२ रोजी त्यांना, गळ्याखाली घट्ट, गोलाकार, बोराएवढी गाठ असल्याचे जाणवले. न दुखणारी गाठ डॉक्टरना दाखवण्यास सुरुवात झाली. विविध तपासण्यानंतर गाठ काढली गेली. त्या गाठीची तपासणी केल्यानंतर विविध रिपोर्ट आले. अंतिम रिपोर्ट कॅन्सर नसल्याचा येईल, असे सर्वांना वाटत होते. परंतु जेव्हा त्याविषयी घरातील कोणी बोलत नव्हते, तेव्हा स्वाती यांना काळजी वाटू लागली. कॅन्सर झाल्याचे समजल्यानंतर, वयाच्या ५४ व्या वर्षी, मरण येईल की काय, असे वाटायला लागले. स्वाती यांच्या मनात विचारचक्र सुरू झाले. कॅन्सरचे ऑपरेशन मुंबईतील कुलाबा येथील एच.सी.जी.खुबचंदानी कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये करण्याचे, कुटूंबियांनी निश्चित केले. त्याप्रमाणे २३ मे रोजी हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतरचे विविध अनुभव स्वाती यांनी 'तुम आशा विश्वास हो हमारे...' या प्रकरणात सविस्तरपणे मांडले आहेत. आतापर्यंतच्या जीवनाविषयी वाटलेले समाधान त्यांनी नेमकेपणाने व्यक्त केले आहे. कॅन्सरवर मात केल्यानंतर, पुन्हा नव्याने जीवन सुरू होईल, अशी आशा त्यांना वाटत होती. 'हम होंगे कामयाब एक दिन...' या प्रकरणामध्ये रेडिएशन, केमोथेरपी घेताना आलेले, विविध अनुभव स्वाती यांनी सविस्तरपणे, समर्पक शब्दात मांडले आहेत. ते वाचताना आधुनिक




वैद्यकशास्त्राची प्रगती आणि आजारातून बरे होऊ पाहणाऱ्या रुग्णांना सहन करावे लागणारे कष्ट, वेदना हे जाणवते. ते वाचताना डोळे नकळत पाझरू लागतात.

मनका विश्वास कमजोर हो ना..., या प्रकरणात कॅन्सरविषयी स्वाती यांनी सविस्तरपणे लिहिले आहे. कॅन्सर म्हणजे मृत्यू, हे बहुतेकांच्या मनात पक्के असते. त्यामुळे रुग्णाबरोबरच नातेवाईक आणि मित्रपरिवार घाबरून जातो. परंतु अत्याधुनिक वैद्यकीय संशोधनातून केमोथेरपी, रेडिएशन यांचा प्रभावी उपाय असल्याने, कॅन्सर रुग्ण बरे होऊ

**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
**मो. ९२७३३४३१७७**

शकतात. मात्र ही सारी प्रक्रिया खर्चिक आणि रुग्णांप्रमाणेच त्यांच्या नातेवाईकांना थकवणारी असते. कॅन्सर हा आजार कोणालाही केव्हाही होऊ शकतो. पोषक आहाराचा अभाव, चुकीची आहारपद्धती, तंबाखू, गुटखा सेवन, धूम्रपान, मद्यपान, शारीरिक हालचालींचा अभाव, लठ्ठपणा, काही घातक रसायनांच्या संपर्कात राहणे अशा विविध कारणांमुळे कॅन्सरची शक्यता वाढते. कॅन्सर रुग्णांच्या बाबतीत वैद्यकीय उपचारांप्रमाणेच, मानसिक आरोग्य टिकविण्यासाठी काळजी घ्यावी लागते. कॅन्सरचे हॉस्पिटलमधील उपचार संपल्यानंतर, घरी आल्यावर पती, मुलगा आणि जवळचे नातेवाईक, मित्रपरिवार यांनी खाण्यापिण्याकडे, शारीरिक आणि मानसिक आरोग्याकडे कसे लक्ष पुरविले, ते सविस्तरपणे मांडले आहे. 'हार के बाद ही जीत है..' मध्ये, स्वाती यांनी, मे २०२३ नंतर, हळूहळू सर्व दैनंदिन व्यवहार, तब्येत सुधारल्यामुळे कसे करता येऊ लागले, ते स्पष्ट केले आहे. श्रावणात अलिबागच्या 'मनस्विनी' या स्त्रियांच्या गटातील मंगळागौरीच्या कार्यक्रमात त्यांनी भाग घेतला. कार्यक्रमाच्या निवेदनाबरोबरच त्यांचे गाणेही छान झाले. परिणामी राज्यव्यापी स्पर्धेमध्ये, मुंबईला त्यांच्या गटाला दुसरे पारितोषिक प्राप्त झाले. त्याआधी त्यांनी पंढरपूरच्या वारीमध्ये आपला सहभाग, अंशतः नोंदविला होता. नंतर गणपतीचा सण, त्यांच्या घरी सर्व नातेवाईकांसह साजरा झाला.

कॅन्सर म्हणजे जीवनमरणाची लढाई समजली जाते. त्यामुळे आधुनिक वैद्यकीय उपचारांप्रमाणेच, अन्य वैद्यकीय उपायही रुग्ण घेण्यास उद्युक्त होतो. स्वाती यांनी आयुर्वेदतज्ज्ञ यांनी सुचविलेली औषधे घेतली होती. रेकीचा आधारही घेतला होता. परिशिष्टामध्ये स्वाती यांनी "आधार रेखा प्रतिष्ठान" या सेवाभावी संस्थेची सविस्तर माहिती दिली आहे. भावी काळात या संस्थेला मदत करण्याचा त्यांनी संकल्प केला आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबाला कॅन्सरच्या आजाराचा मुकाबला करण्यासाठी लागणारा मोठा खर्च झेपणारा नसतो. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांसाठी, सरकार तसेच विविध समाजसेवी संस्था मदत करतात. अशा सेवाभावी संस्थांना आर्थिक आणि अन्य प्रकारची, यथाशक्य मदत करणे, हे सर्व सुजाण नागरिकांचे कर्तव्य आहे, याचीही जाणीव स्वाती यांनी करून दिली आहे.

स्वाती यांनी या पुस्तकाद्वारे कॅन्सरशी लढा देतानाचे सविस्तर अनुभव विलक्षण पद्धतीने, जीवनाविषयी खेळकर दृष्टिकोन ठेवून मांडल्यामुळे हे पुस्तक नितांत वाचनीय आणि संग्राह्य ठरते. साहित्य, संगीत आणि विनोदाच्या आधाराने रुग्णाचे मानसिक आरोग्य सुधारण्यास कशी मदत होते, हे या पुस्तकाद्वारे समजते. स्वाती यांनी कॅन्सरच्या ज्ञात इतिहासाचा, पुस्तकात उल्लेख करायला हवा होता. या पुस्तकाच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न, कॅन्सरसंबंधी विधायक कार्य करणाऱ्या "आधार रेखा प्रतिष्ठान, ठाणे" या सेवाभावी संस्थेला देण्याचा संकल्प त्यांच्या कुटूंबियांनी केला आहे, हे विशेष! ●

**पुस्तकाचे नाव : तिमिरातुनी तेजाकडे**
**लेखिका : ॲड. स्वाती कुलकर्णी**
**प्रथम आवृत्ती : २०२६**
**प्रकाशक : संजय कुलकर्णी, अलिबाग**
**९४२००५६६८८**
**पृष्ठे : १८७ , मूल्य रू. ३५०/-**

# भन्नाट प्रश्न, वैज्ञानिक उत्तरे

## सचिन आणि मनिषाच्या विज्ञानसफरी

विद्यालंकार घारपुरे
'रचना' चैतन्यनगर गल्ली क्र. ५,
महालक्ष्मी पथ,जालगाव,मु.पो.ता.दापोली
जि. रत्नागिरी, फोन क्र :९४२०८५०३६०
ईमेल: vidyalankargharpure@gmail.com
जन्म : २६/०९/१९६०
शिक्षण : बी.कॉम.सी.ए.आयआयबी
निवृत्त भारतिय स्टेट बँक अधिकारी
मुलांना वाचनाची गोडी लागावी म्हणून काही वर्षे सुट्टीत 'वाचू आनंदे' हा उपक्रम राबवला. शालेय विद्यार्थ्यांना नाममात्र फी घेऊन इंग्रजी शिकवतात. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजावा, विज्ञान विषयात रूची निर्माण व्हावी म्हणून शिबिरात मार्गदर्शन करतात. रिचर्ड डॉकिन्स यांच्या उत्क्रांतीशास्त्रावरील पाच व्हिडिओंचे मराठीत रुपांतर करून ते व्हिडिओ यु ट्यूबवर प्रसारित केले आहेत. विज्ञान विषयावर व्हिडिओ प्रसारित करतात. सजिवांची उत्क्रांती, खडक प्रदर्शन, मी मेणबत्ती बोलतेय हे उपक्रम मुलांसाठी राबवतो. विज्ञान शिबिर आयोजित करतो. अभय बंग व विवेक सावंत प्रणीत मुलांसाठी 'कुमार निर्माण' हा उपक्रम दोन वर्षे राबवला. 'श्रमिक एकजूट' या नांदेडहून प्रकाशित होणाऱ्या दैनिकात दर बुधवारी माझे 'विज्ञानाच्या झरोक्यातून' हे सदर २०२४ पासून नियमितपणे प्रसिद्ध होत आहे. 'बबडूच्या गोष्टी', 'बेटू आणि इतर कथा', 'अंगणवनातील कथा', हे बालकथासंग्रह प्रसिद्ध. 'छोटा डॉन', 'लिंबू टिंबू' हे बालकविता संग्रह प्रसिद्ध. शिवाय 'अखेर पर्यंत' हा कथा संग्रह ही प्रसिद्ध. 'बदल' या कुमार कादंबरीला आपटेवाचन मंदिर, इचलकरंजी यांचा २०१५ सालचा 'पार्वती शंकरराव तेलसिंगे' उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार प्राप्त.




**विद्यालंकार घारपूरे**

सचिन आणि मनिषा आठवीत शिकणारे शेजारी आणि मित्र. दोघांनाही विज्ञानाची आवड आणि त्याहून अधिक प्रश्न विचारण्याची सवय. एखादी गोष्ट ऐकली की सचिनच्या डोक्यात लगेच प्रश्न उभा राहतो, 'असं का?', 'असं झालं तर काय होईल?' मनिषा मात्र सहजासहजी कोणतीही गोष्ट खरी मानत नाही. तिचा प्रश्न असतो, 'पण हे खरं कशावरून?'

त्यांच्या घरापासून फार दूर नसलेल्या 'ज्ञानदीप' बंगल्यात समाधानकाका आणि उत्तराकाकी राहतात. दोघेही निवृत्त विज्ञानप्राध्यापक. समाधानकाका पदार्थविज्ञानाचे, तर उत्तराकाकी जीवशास्त्राच्या प्राध्यापिका होत्या. आपल्या विषयांबरोबरच विज्ञानाच्या इतर शाखांचेही त्यांचे वाचन आणि अध्ययन दांडगे आहे. निवृत्तीनंतर त्यांनी मुलांसाठी एक छोटेसे खाजगी विज्ञानकेंद्र सुरू केले आहे, 'ज्ञानदीप विज्ञानखेळघर'.

या विज्ञानकेंद्राच्या प्रवेशद्वारावर एक फलक आहे, "इथे प्रश्न विचारण्यास मनाई नाही! अगदी मूर्खासारखे वाटणारे प्रश्नही विचारू शकता!" हाच फलक सचिन आणि मनिषाला प्रथम या विज्ञानकेंद्रात घेऊन आला. त्यानंतर त्यांच्या भेटी सुरूच राहिल्या. प्रत्येक भेटीत सचिन आणि मनिषाच्या डोक्यात काहीतरी भन्नाट प्रश्न उगवतात. समाधानकाका आणि उत्तराकाकी हे प्रश्न उडवून लावत नाहीत. उलट मुलांबरोबर चर्चा करतात, प्रयोग करतात, मॉडेल्स पाहतात, पुस्तकांत शोध घेतात आणि मुलांनाच उत्तरापर्यंत पोहोचायला मदत करतात. कारण त्यांच्या मते विज्ञानात प्रश्न मूर्ख नसतात. प्रश्न विचारणे, शंका घेणे, आपल्या प्रश्नात आपण काही गृहीत धरले आहे का ते तपासणे, पुरावा शोधणे आणि त्यातून उत्तरापर्यंत पोहोचणे, हीच विज्ञानाची वाट असते.

चला तर मग, सचिन आणि मनिषाबरोबर आपणही 'ज्ञानदीप विज्ञानखेळघरा'त जाऊया आणि त्यांच्या भन्नाट वाटणाऱ्या प्रश्नांची वैज्ञानिक उत्तरे शोधण्याच्या सफरीत सहभागी होऊया!

एके दिवशी विज्ञानखेळघराकडे येताना रस्त्यावर पडलेल्या गायीच्या शेणात सचिनचा पाय पडता पडता वाचला.

"अरे बापरे!" म्हणत त्याने उडी मारली.

मनिषा हसायला लागली. पण सचिनच्या डोक्यात तोपर्यंत वेगळाच विचार सुरू झाला होता.

विज्ञानखेळ घरात पोहोचल्यावर त्याने समाधानकाकांना व उत्तरा काकींना विचारलं,

"एक प्रश्न विचारू?"

"या घरात त्यासाठी परवानगी कधीपासून लागायला लागली?" काका, काकी हसत म्हणाले.

"घोडा, गाय आणि शेळी जर सारखेच गवत खातात, तर हागताना घोड्याची संडास घट्ट गोळ्यांसारखी, गायीचं शेण पातळ आणि शेळीची खड्यांसारखी का असते?"

समाधानकाका हसले व म्हणाले, "हा प्रश्न माझ्यापेक्षा उत्तराकाकींना विचारलेला बरा. प्राण्यांच्या पोटात काय चालतं, हे त्या माझ्यापेक्षा चांगलं सांगतील!"

काकी काही बोलण्याआधीच मनिषा म्हणाली,

"पण सचिन, तुझ्या प्रश्नातच काहीतरी गडबड नाही ना?"

"काय गडबड?"

"गाय, घोडा आणि शेळी खरंच अगदी सारखंच खातात का?" काकींच्या चेहऱ्यावर हसू उमटलं.

"शाब्बास, मनिषा! वैज्ञानिक उत्तर शोधण्याची सुरुवात इथूनच होते. प्रश्नात आपण काय गृहीत धरलं आहे, ते आधी तपासायचं." "म्हणजे माझा प्रश्नच चुकीचा?" सचिनने विचारलं. "अजिबात नाही. प्रश्न उत्तम आहे. फक्त त्यातलं 'सारखेच गवत खातात' हे थोडं तपासायला हवं. तिघेही शाकाहारी आहेत आणि वनस्पती खातात हे खरं. पण त्यांचा आहार अगदी एकसारखा नसतो. गाय आणि घोडा मोठ्या प्रमाणावर गवत चरतात. शेळी मात्र गवताबरोबर झुडपांची पानं, कोवळ्या फांद्या आणि इतर वनस्पतींचे भागही निवडून खाते. पण आपल्या प्रश्नाचं खरं गुपित केवळ खाण्यात नाही. आणखी कुठेतरी आहे." "पचनसंस्थेत?" मनिषाने विचारलं.

"अगदी बरोबर. आता सांगा बरं गाय आणि शेळी अन्न खाल्ल्यानंतर काय करतात?" "रवंथ!" दोघे जवळजवळ एकदम म्हणाले. "आणि घोडा?"

"घोडा रवंथ करत नाही," सचिन म्हणाला.

"मग आपल्या हाती पहिला मोठा धागा लागला."

काकींनी कागदावर घोड्याच्या पचनसंस्थेची साधी आकृती काढली. "घोड्याला माणसाप्रमाणे एक मुख्य जठर असतं. म्हणून त्याला म्हणतात. पण गवतामध्ये सेल्युलोजसारखे पदार्थ असतात. ते तो स्वतःच्या पाचक एन्झाइम्सने सहज पचवू शकत नाही. त्यासाठी सूक्ष्मजीवांची मदत लागते. घोड्याच्या बाबतीत हे सूक्ष्मजीव कुठे काम करत असतील?" सचिन आकृतीकडे पाहू लागला. काकी म्हणाल्या, "लहान आतड्यानंतर येणाऱ्या अंधांत्रात आणि मोठ्या आतड्यात. तिथे सूक्ष्मजीव तंतुमय अन्नाचे किण्वन करतात. म्हणून घोड्याला म्हणतात."

"म्हणजे त्याचं गवताचं मुख्य सूक्ष्मजीवी पचन पचनमार्गाच्या मागच्या भागात होतं!" मनिषा म्हणाली.

"बरोबर." "पण त्यामुळे संडासाचे गोळे कसे होतात?" सचिन मूळ प्रश्नावर आला. "छान! आता पुढचा धागा. अन्न पुढे सरकत असताना मोठ्या आतड्यात त्यातील बरंच पाणी शरीरात परत शोषलं जातं. आतड्यांच्या स्नायूंच्या हालचालींमुळे उरलेला मल पुढे सरकतो आणि त्याचे ठराविक आकाराचे भाग तयार होतात. त्यामुळे निरोगी घोड्याची विष्ठा साधारण घट्ट, ओलसर गोळ्यांच्या रूपात बाहेर पडते." "मग गाय?" सचिनने विचारलं. काकींनी आता गायीच्या पचनसंस्थेची आकृती काढली.

"गाय आणि शेळी रवंथ करणारे प्राणी. आपण नेहमी त्यांना 'चार पोटं असतात' असं म्हणतो. पण अधिक अचूकपणे सांगायचं तर त्यांच्या जठराचे चार कप्पे असतात रुमेन, रेटिक्युलम, ओमॅसम आणि अबोमॅसम."

"रुमेनमध्ये गवत साठतं ना?" सचिनने विचारलं.

"हो. आणि तिथे सूक्ष्मजीव मोठ्या प्रमाणावर त्याचं किण्वन करतात. अन्न पुन्हा तोंडात आणून रवंथ केल्यामुळे ते आणखी बारीक होतं. मग ते पुढच्या कप्प्यांत आणि आतड्यांत जातं. या संपूर्ण प्रवासात पाणीही वेगवेगळ्या ठिकाणी शोषलं जातं."

"मग गायीचं शेण इतकं पातळ का?" मनिषाने विचारलं.

"त्याला एकच कारण नाही," काका म्हणाले. "आहारात किती पाणी आहे, तंतू किती आहेत, अन्न पचनमार्गातून किती वेगाने पुढे जातं, आतड्यातून किती पाणी परत शोषलं जातं आणि आतड्यांच्या हालचाली कशा आहेत या सगळ्यांचा अंतिम विष्ठेवर परिणाम होतो. गायीची सामान्य विष्ठा घोड्याच्या गोळ्यांपेक्षा जास्त पाणी असलेली, मऊ आणि पसरट असते. म्हणून आपल्याला ती 'शेणाची पोळी' पसरल्यासारखी दिसते. त्याला आपण शेणाचा पो म्हणतो."

"आणि शेळी? ती तर गायीसारखीच रवंथ करते. मग तिच्या लेंड्या खड्यांसारख्या का?" सचिनने लगेच विचारलं.

"हाच तर गंमतीचा भाग!" काका म्हणाले. "पचनपद्धती एकाच प्रकारची असली तरी गाय आणि शेळी एकाच आकाराच्या नाहीत, त्यांची शरीरक्रिया अगदी सारखी नाही आणि त्यांच्या खाण्याच्या सवयीही सारख्या नाहीत. शेळी अनेकदा तुलनेने कोरडा आणि निवडक वनस्पतीजन्य आहार खाते. शिवाय तिचं शरीर पाणी जपून वापरण्यास चांगलं अनुकूल झालेलं आहे. मलातील पाणी प्रभावीपणे परत शोषलं गेल्यामुळे तिची विष्ठा लहान, तुलनेने कोरड्या आणि वेगवेगळ्या गोलसर खड्यांच्या म्हणजे लेंडीच्या रूपात बाहेर पडते." सचिन काही क्षण विचार करत राहिला. "म्हणजे आपण सुरुवातीला म्हटलं की तिघेही गवत खातात. पण फक्त 'काय खातात?' एवढं पाहून उत्तर मिळणार नव्हतं." "बरोबर," काका म्हणाले.

मनिषा पुढे म्हणाली, "त्यांची पचनसंस्था कशी आहे, सूक्ष्मजीव अन्नाचं किण्वन कुठे करतात, पाणी किती शोषलं जातं आणि नेमका आहार काय आहे हे सगळं पाहावं लागलं."

"आणि आणखी एक गोष्ट," काकी म्हणाल्या. "एकाच प्राण्याची विष्ठासुद्धा नेहमी अगदी तशीच असेल असं नाही. त्याने काय खाल्लं, किती पाणी प्यायलं, त्याची तब्येत कशी आहे यानुसार तिचं स्वरूप बदलू शकतं. म्हणून आपण आत्ता निरोगी प्राण्यांच्या सामान्य विष्ठेबद्दल बोलतो आहोत." सचिन हसला. "म्हणजे प्रश्न भन्नाट होता; पण त्याचं अर्धं उत्तर आपल्या विज्ञानाच्या पुस्तकातच लपलेलं होतं!" "अगदी बरोबर," काका म्हणाले. "विज्ञान म्हणजे फक्त पुस्तकातली उत्तरं पाठ करणं नव्हे. पुस्तकात शिकलेल्या वेगवेगळ्या गोष्टी एकमेकांशी जोडून एखाद्या नव्या प्रश्नाचं उत्तर शोधता येणं, हे जास्त महत्त्वाचं." मनिषा म्हणाली, "आणि प्रश्न विचारताना आपण नकळत काही गृहीत धरलं आहे का, हेही तपासायचं!" काका हसले व म्हणाले, "वा! आज तुम्हाला गायीच्या शेणाने विज्ञानाचा चांगलाच धडा शिकवला म्हणायचा!" सचिनने लगेच पायांकडे पाहिलं. "धडा ठीक आहे काका; पण तो पायाला लागता लागता वाचला, हे बरं झालं!"

आणि विज्ञानखेळघरात एकच हशा पिकला. ●

## निवडक

### पेणच्या खेळाडूंचे बॉक्सिंग स्पर्धेत यश



**खरोशी :** रसायनी येथील पिल्ले कॉलेज येथे जिल्हास्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत आर. आर. बॉक्सिंग क्लब पेण येथे प्रशिक्षक रविंद्र म्हात्रे याच्याकडे बॉक्सिंगचे प्रशिक्षण घेत आसलेले विद्यार्थ्यांमध्ये धैर्या पाटील सुवर्णपदक (पेण एज्युकेशन स्कुल), आर्यन वर्मा सुवर्णपदक (को. ए. सो. लिटील एन्जल स्कुल, सलोनी सावंत रौप्यपदक (पेण एज्युकेशन स्कूल), रुद्रेश पाटील रौप्यपदक (पेण एज्युकेशन स्कूल), सेजल म्हात्रे रौप्यपदक (मदर तेरेसा स्कुल), प्रांजल गायकर रौप्यपदक (पेण सार्वजनिक कॉलेज) हंसिनी पाटील कांस्यपदक (पेण एज्युकेशन स्कूल) साईश म्हात्रे कांस्यपदक (जी. के. म्हात्रे स्कूल वाशी)अंश ठाकूर कांस्यपदक (मदर तेरेसा स्कुल) दक्ष म्हात्रे कांस्यपदक (मदर तेरेसा स्कूल) रितेष पवार कांस्यपदक (सुबोध इंग्लिश मिडीयम) या विद्यार्थ्यांनी यश मीळविले ह्या विद्यार्थानचे युनायटेडचे अध्यक्ष मंदार पनवेलकर उपाध्यक्ष रविंद्र म्हात्रे प्रशिक्षक विनायक पाटील प्रथमेश मोकल अदित्य तेरेदेसाई यांनी सर्व खेळाडुंचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### बुद्धिबळ स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**रोहा :** सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहा यांच्या वतीने बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत छोटा गट व मोठा गट अशा दोन गटांत सामने घेण्यात आले. स्पर्धेला बालकांसह युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. छोट्या गटात साई जंगम याने प्रथम, सर्वज्ञ शेडगे याने द्वितीय, तर प्रणव माळी याने तृतीय क्रमांक पटकावला. दक्षेश स्वामी व गौरीश कुलकर्णी यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. मोठ्या गटात संकेत खोत याने प्रथम, विक्रांत जना याने द्वितीय, तर विवेक कांबळे याने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी हर्षद भाटे व परीक्षकांचे सहकार्य लाभले. या उपक्रमासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अमेय जोशी, उपाध्यक्ष प्रतीम देशमुख, हर्षद भाटे, प्रेषित बारटक्के, चैतन्य आठवले, नागेश पाटणकर, भारत वाकचौरे, कुणाल आंबले, सुयोग शेळके, चंद्रकांत पार्टे आदींनी परिश्रम घेतले.

### सावन बरवाला मॅरेथॉनमध्ये रौप्यपदक

**नागोया (जपान) :** भारतीय मॅरेथॉन धावपटू सावन बरवाल याने आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये पुरुषांच्या मॅरेथॉन प्रकारात रौप्यपदक जिंकून इतिहास रचला. यासह, या क्रीडा प्रकारात पदक जिंकण्यासाठी भारताची ४४ वर्षांची प्रतीक्षा संपली आहे. बरवालने पुरुषांच्या मॅरेथॉनच्या अंतिम शर्यतीत २:११:३७ अशी वेळ नोंदवत स्वतः ची सर्वोत्तम कामगिरी केली आणि नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. शर्यतीच्या अंतिम टप्प्यात आघाडी घेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या जपानच्या यामाशिताच्या मागे तो राहिला. बरवालने जिंकलेले हे रौप्यपदक ४४ वर्षांनंतर भारताला आशियाई क्रीडा स्पर्धेतील मॅरेथॉन प्रकारात मिळालेले पहिले पदक आहे. त्याच्या या कामगिरीमुळे आयची-नागोया येथील भारताच्या थलेटिक्स मोहिमेत आणखी एका ऐतिहासिक यशाची भर पडली आहे.







### मिश्र रिलेमध्ये भारताला रौप्यपदक

**नागोया (जपान) :** आशियाई क्रीडा स्पर्धेत मिश्र ४*४०० मीटर रिले शर्यतीत भारताने दमदार कामगिरी करत रौप्यपदक जिंकले. या शर्यतीच्या अंतिम टप्प्यात विथ्या रामराजने उत्कृष्ट धाव घेत संघासाठी दुसरे स्थान निश्चित केले. विशाल टी. के. याने भारतासाठी शर्यतीची सुरुवात केली आणि त्यानंतर पूवम्मा हिने दुसरा टप्पा पार पाडला. शर्यतीच्या उत्तरार्धात मनूने वेगवान धाव घेत बॅटन तिसऱ्या स्थानावर स्वीकारल्यामुळे भारताचे स्पर्धेतील आव्हान कायम राहिले. मिनूने आपला वेग कायम राखत रामराजकडे बॅटन सोपवली. रामराजने अंतिम टप्प्यात प्रभावी कामगिरी करत भारताला दुसऱ्या स्थानावर पोहोचवले. मिनू टी.एस., पूवम्मा एम.आर., विशाल टी.के. आणि विथ्या रामराज या भारतीय चौकडीने आशियाई क्रीडा स्पर्धेतील मिश्र ४४०० मीटर रिलेच्या अंतिम फेरीत ३:१४.४६ अशी वेळ नोंदवत रौप्यपदक पटकावले. बहरीनने ३:१२.८७ अशी वेळ नोंदवून सुवर्णपदक जिंकले, तर ३:१४.५४ अशी वेळ नोंदवणाऱ्या संघाला कांस्यपदक मिळाले.

### न्यूझीलंड दौऱ्यातून पांड्या आऊट

**नवी दिल्ली :** भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याने पुन्हा एकदा भारतीय संघाचेया चिंतेत भर घातली आहे. न्यूझीलंड दौऱ्यासाठी निवड झालेला हार्दिक पुन्हा जखमी झाला आहे. सरावादरम्यान त्याच्या उजव्या पायाच्या पोटरीला दुखापत झाली, ज्यामुळे तो न्यूझीलंडविरुद्धच्या संपूर्ण मालिकेतून बाहेर पडला आहे. पांड्या २० सप्टेंबरला संघात परतणार होता आणि निवड समितीने ६ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलिया 'अ' संघाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारत 'अ' संघात त्याचे नाव समाविष्ट केले होते. हार्दिकच्या उजव्या पायाच्या पोटरीला दुखापत झाल्याने त्याला दोन आठवड्यांच्या पूर्ण विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे.

# भारतीय लेकींची सुवर्ण कामगिरी

## ।। कबड्डी चाहत्यांची अपेक्षा पूर्ण ।। संजू देवीच्या दोन गुणांनी फिरवला सामना

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला कबड्डी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक कामय राखताना अंतिम सामन्यात इराणची कडवी टक्कर मोडून काढली. पहिल्या हाफमध्ये अवघ्या ६ गुणांची आघाडी घेणाऱ्या भारताला पुढील खेळात चांगली टक्कर मिळाली. इराणने यापूर्वीही भारतीय संघाला सडेतोड उत्तर दिले आहे आणि आजही त्यांच्याकडून असाच खेळ झाला. शेवटची ८ मिनिटे असताना इराणने लोन चढवून सामना एका गुणाच्या फरकावर आणला. त्यानंतर मॅचमध्ये रंगत आली, एकेका गुणासाठी दोन्ही संघ जोर लावताना दिसले. पण, भारताने शेवटच्या पाच मिनिटांत पुनरागमन करून सुवर्णपदक नावावर केले.




भारतीय महिलांचे हे आशियाई स्पर्धेतील चौथे (२०१०, २०१४, २०२२ आणि २०२६) सुवर्णपदक आहे..सुवर्णपदककायमराखण्याच्या निर्धाराने मॅटवर उतरलेल्या भारतीय महिला कबड्डी संघाला अंतिम सामन्यात इराणकडून कडवी टक्कर मिळाली. पहिल्या हाफमध्ये इराणच्या खेळाडूंनी अप्रतिम पकड बनवली होती आणि भारताचा बचाव भेदण्यात ते यशस्वी ठरताना दिसले. पण, भारतीय महिलांनी चांगले पुनरागमन करताना पहिल्या हाफमध्ये २२-१६ अशी आघाडी घेतली. यात भारताने चढाई-पकडीत १६ गुण कमावले आणि ३ बोनस गुणांसह एक लोन चढवून २ गुण मिळवले.

> **भारतीय संघाचा प्रवास**
> २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघाने एकही सामना न गमावता विजय मिळवला. भारतीय संघाने आपल्या गटातील तिन्ही सामने जिंकले आणि त्यानंतर उपांत्य फेरी व अंतिम सामन्यात प्रभावी विजय मिळवून सुवर्णपदक पटकावले.

दुसऱ्या हाफमध्ये इराणने चांगले पुनरागमन केले आणि सामना २०-२३ असा चुरशीचा केला. दोन खेळाडू मॅटवर उपस्थित असताना भारताला ऑल आऊट होण्यापासून वाचायचे होते आणि भारताच्या दोन्ही बचावपटूंनी सुपर टॅकल करून खात्यात दोन गुण जमा केले. भारताने आता २५-२० अशी आघाडी घेऊन इराणवर दडपण वाढवले. पण, २०१८ च्या सुवर्णपदक विजेत्या इराणने जिद्द सोडली नाही आणि पकडीचा उत्कृष्ट खेळ दाखवला.

इराणचे खेळाडू आक्रमकतेने पकड करताना दिसले आणि त्यात भारताचे चढाईपटू दुखापतग्रस्त झाले.सामन्याला ८.३० मिनिटांचा खेळ शिल्लक असताना इराणच्या चढाईपटूने भारताच्या शेवटच्या दोन खेळाडूंना बाद करून लोन चढवला आणि ४ गुणांची कमाई करून पिछाडी २६-२७ अशी कमी केली. भारताची बचावफळी किंचितशी खचलेली दिसली, परंतु त्यांनी चढाईत बोनससह पकडीचे गुण घेताना ३०-२७ अशी आघाडी मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. संजू देवीने पाच मिनिटांचा खेळ सुरू असताना एका चढाईत दोन गुण घेताना सामना ३३-२८ असा भारताच्या बाजूने झुकवला. त्यानंतर इराणच्या प्रमुख चढाईपटूची पकड करून भारताने विजय निश्चित केला. भारतीय महिला संघाने हा सामना ३७-३४ असा जिंकून सुवर्ण नावावर केले.

भारतासाठी सुवर्णपदक जिंकणारा महिला कबड्डी संघ: पुष्पा राणा (कर्णधार), रितू नेगी, ज्योती ठाकूर, पूजा हथवाला, सोनाली विष्णू शिंगटे, मनीषा कुमारी, पिंकी रॉय, रितू शेओरन, भावना देवी ठाकूर, निकिता, राज राणी आणि संजू देवी यांचा समावेश होता.

## भारत 'अ' संघाचा ऑस्ट्रेलिया 'अ'वर विजय



मुलानीच्या सात विकेट्स

**। पुडुचेरी । वृत्तसंस्था ।**

शम्स मुलानीच्या शानदार गोलंदाजीच्या जोरावर भारत 'अ'ने पहिल्या अनौपचारिक कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलिया 'अ'चा १६२ धावांनी पराभव केला. या विजयासह भारत 'अ'ने दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. चौथ्या दिवशी शुक्रवारी ३६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलिया 'अ'चा संघ दुसऱ्या डावात ५५.१ षटकांत २०० धावांवर सर्वबाद झाला. ऑस्ट्रेलिया 'अ'ने दिवसाची सुरुवात दोन गडी बाद ५५ धावांपासून केली. विजयासाठी त्यांना आणखी ३०८ धावांची गरज होती. वेगवान गोलंदाज अंशुल कंबोजने सुरुवातीचे धक्के दिले. नॅथन मॅकस्विनी गलीमध्ये झेलबाद झाला, तर दोन षटकांनंतर पीटर हँड्सकॉम्बला कमी उसळी घेणाऱ्या चेंडूवर त्रिफळाचीत केले. यानंतर तुषार देशपांडेने शानदार रिव्हर्स स्विंगचे प्रदर्शन करत ऑस्ट्रेलिया अ च्या डावाला आणखी धक्के दिले. त्याने जोश फिलिपला त्रिफळाचीत केले आणि त्यानंतर सलग दुसऱ्या चेंडूवर लियाम स्कॉटलाही तंबूत पाठवले. देशपांडेने दुसऱ्या डावात १४ धावा देत तीन विकेट्स घेतल्या. तनुश कोटियानच्या गोलंदाजीवर स्लॉग स्वीपचा प्रयत्न करताना तो २६ धावांवर त्रिफळाचीत झाला. यानंतर फर्गस नील आणि टॉड मर्फी यांनी आठव्या विकेटसाठी ६७ धावांची भागीदारी करत ऑस्ट्रेलिया 'अ'चा पराभव काही काळ लांबवला. सामन्यातील ऑस्ट्रेलिया 'अ'ची ही एकमेव अर्धशतकी भागीदारी ठरली. उपाहारानंतर भारत 'अ'ला विजयासाठी केवळ ६.१ षटके लागली. शम्स मुलानीने नीलचा डीप मिडविकेटवर झेलबाद करत ऑस्ट्रेलियाला आणखी एक धक्का दिला. ऑस्ट्रेलिया 'अ'चा डाव २०० धावांवर संपुष्टात आला. मुलानीने सामन्यात एकूण सात विकेट्स घेतल्या. त्याने पहिल्या डावात चार, तर दुसऱ्या डावात तीन विकेट्स घेतल्या.

> **संक्षिप्त धावफलक**
> भारत 'अ' : ३३४ आणि १९९ (देवदत्त पडिक्कल ५९, कुमार कुशाग्र नाबाद ४६; टॉड मर्फी ४/४८) ऑस्ट्रेलिया 'अ' : १७१ आणि २०० (फर्गस ओ३९;नील ४७; तुषार देशपांडे ३/१४, शम्स मुलानी ३/५७, अंशुल कंबोज २/२५) निकाल : भारत 'अ' १६२ धावांनी विजयी. दुसरा अनौपचारिक कसोटी सामना याच मैदानावर खेळवला जाणार असून, त्यात ऑस्ट्रेलिया 'अ'चा संघ पुनरागमन करण्याचा प्रयत्न करेल.



## ग्रेगोरियन पब्लिक स्कूलची विभागीय हँडबॉल स्पर्धेसाठी निवड

**। खांब । प्रतिनिधी ।**

एमडीएन इंटरनॅशनल स्कूल कोलाड येथे झालेल्या जिल्हा आंतरशालेय हँडबॉल स्पर्धेत ग्रेगोरियन पब्लिक स्कूल, रोहा यांच्या अंडर-१७ मुलांच्या संघाने विजेतेपद मिळवले. संघाचे व्यवस्थापक अर्णव सलागरे यांच्या नेतृत्वाखाली संघाने उत्कृष्ट सांघिक खेळ साकारला. तर खेळाडूंच्या मेहनतीला प्रशिक्षक सुधीर जंगम यांच्या मार्गदर्शनाची साथ मिळाली. या विजयानंतर संघाची २९ सप्टेंबर रोजी मुंबई येथे होणाऱ्या विभागीय हँडबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संघ रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य फादर लेन यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील शुभेच्छा दिल्या. ग्रेगोरियन पब्लिक स्कूल, रोहा यांच्या क्रीडा क्षेत्रातील या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.

## सुजीत पाटील ठरला रोहा 'श्री'चा मानकरी

**। रोहा । प्रतिनिधी ।**

सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहा यांच्या वतीने आयोजित 'रोहा श्री २०२६' शरीर सौष्ठव स्पर्धा उत्साहात आणि दिमाखात पार पडली.या स्पर्धेत पेण हनुमान व्यायाम शाळेतील ७० किलो वजन गटातील सुजीत पाटील याने रोहा श्री २०२६ चा किताब पटकाविला.



स्पर्धेतील मेन फिज़िक्स विजेता महेश पवार (वन फिटनेस), रोहा अंतर्गत विजेता सुजीत शिर्के (विहान फिटनेस), तसेच ५५ किलो वजन गटात कौशल वाघे (एम.एम. फिटनेस),६० किलो वजन गटात हनुमान भगत (वि -१४ फिटनेस), ६५ किलो वजन गटात सुमित कोळी (स्पोर्ट जिम), ७० किलो वजन गटात महेश पवार (वन फिटनेस) या स्पर्धेत बेस्ट पोजर म्हणून कौशल वाघे (एम.एम. फिटनेस), मोस्ट इम्प्रुव्हमेंट म्हणून हनुमान भगत (वि-१४ फिटनेस) यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी अमेय जोशी, प्रीतम पाटील, हर्षद भाटे, प्रेषित बारटक्के, चैतन्य आठवले, नागेश पाटणकर, भारत वाघचौरे, कुणाल आंबले, सुयोग शेळके, चंद्रकांत पाटे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेसाठी सामाजिक कार्यकर्ते प्रमोद म्हसकर यांचे सहकार्य लाभले.

## पाली कॉलेजची क्रीडा स्पर्धेत बाजी

**पाली/गोमाशी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड यांच्या वतीने एस टी विलफर्ड स्कूल पनवेल येथे १९ वर्ष वयोगटातील कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सुधागड तालुक्यातील ग. बा. वडेर हायस्कूल व व. ग. ओसवाल ज्युनियर कॉलेज पाली या संघातील खेळाडूंनी प्रशिक्षक राकेश बेलोसे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय दर्जेदार खेळ सादर करीत विजयला गवसणी घातली. यावेळी स्पर्धेत विजयी झालेल्या खेळाडूंचे मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन अभिनंदन करण्यात आले. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा, प्राचार्य यांनी क्रीडा शिक्षक व सर्व विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## क्रॉस-कंट्री स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। पुणे । प्रतिनिधी ।**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुणे शहर क्रीडा समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली २०२६-२७ची आंतरमहाविद्यालयीन क्रॉस-कंट्री (मुले व मुली) स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेचे आयोजन श्री शाहू मंदिर महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले होते. स्पर्धेला पुणे शहरातील महाविद्यालयांमधील खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुलांच्या गटात पुणे शहरातील २४ महाविद्यालयांतील एकूण ९० खेळाडूंनी, तर मुलींच्या गटात १४ महाविद्यालयांतील ५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. विविध महाविद्यालयांतील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत स्पर्धेत आपले कौशल्य दाखविले.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग कारकर, डॉ. रमेश देसाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



> **सांघिक निकाल**
> मुले - प्रथम क्रमांक : श्री शाहू मंदिर महाविद्यालय
> द्वितीय क्रमांक : चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय,तृतीय क्रमांक : मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर
> मुली - प्रथम क्रमांक : सेंट मिरज महाविद्यालय, द्वितीय क्रमांक : फर्ग्युसन महाविद्यालय, तृतीय क्रमांक : गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स

> **वैयक्तिक निकाल**
> मुले -प्रथम : करण अनिल भोये - सर परशुरामभाऊ कॉलेज - ३३.४४.०३ द्वितीय : तनिष विजय देसाई - संस्कार मंदिर महाविद्यालय - ३३.४९.७८, तृतीय : धोनी आनंद पासवान - नौरोजी वाडिया महाविद्यालय - ३५.२४.२४
> मुली -प्रथम : वैष्णवी सुनील खाडे - नेस वाडिया कॉलेज - ४४.१०.६२, द्वितीय : अवनी अमित आपटे - आबासाहेब गरवारे कॉलेज - ४७.१२.२४,तृतीय : नीतू सेन - चंद्रशेखर आगाशे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन - ५२.०८.६२

**जपानचा ३-१ ने केला पराभव** | **चार सामन्यात १२ गुणांची कमाई**

## महिला हॉकी संघाचा उपांत्य फेरीत प्रवेश

**। गिफू (जापान) । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला हॉकी संघाने शुक्रवारी आशियाई खेळ २०२६ मधील पूल 'बी'च्या महत्त्वपूर्ण सामन्यात यजमान जपानचा ३-१ असा पराभव करत उपांत्य फेरीत स्थान पक्के केले. गिफू प्रीफेक्चुरल ग्रीन स्टेडियमवर मिळवलेल्या या विजयासह भारताने सलग चौथा विजय नोंदवत पूलमध्ये पहिल्या दोन संघांमध्ये आपले स्थान निश्चित केले. भारताकडून लालरेमसियामी, इशिका चौधरी आणि नवनीत कौर यांनी गोल केले, तर जपानकडून शिहो कोबायाकावा हिने एक गोल केला.

भारताने सामन्याची सुरुवात आक्रमक अंदाजात केली. पहिल्या क्वार्टरमध्ये नवनीत कौरचा प्रयत्न जपानची गोलरक्षक यू कुडो हिने रोखला. मात्र, रिबाउंडवर लालरेमसियामीने वेगाने हालचाल करत चेंडू गोलमध्ये पाठवला आणि भारताला आघाडी मिळवून दिली. जपानने बरोबरी साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, भारतीय गोलरक्षक सविता पुनियाने माही उएनोच्या पेनल्टी कॉर्नरच्या प्रयत्नावर शानदार बचाव केला.

दुसऱ्या क्वार्टरमध्ये भारताने दबाव वाढवला आणि मध्यंतराच्या काही क्षण आधी आपली आघाडी दुप्पट केली. नवनीतच्या पेनल्टी कॉर्नरच्या प्रयत्नाला जपानच्या बचावफळीने रोखले. मात्र, इशिका चौधरीने रिबाउंडवर सतर्कता दाखवत गोल केला आणि भारताला २-० अशी आघाडी मिळवून दिली. तिसऱ्या क्वार्टरमध्ये नवनीत कौरने जपानच्या बचावफळीला चकवत शानदार गोल केला आणि भारताची आघाडी ३-० अशी केली. अंतिम क्वार्टरमध्ये जपानने पुनरागमनाचा प्रयत्न केला.




शिहो कोबायाकावाने जोरदार टॉमहॉकच्या माध्यमातून गोल करत अंतर ३-१ असे कमी केले. मात्र, त्यानंतर भारतीय संघाने जपानचा दबाव निष्प्रभ करत सामना आपल्या नावावर केला. या विजयामुळे भारताचे चार सामन्यांत चार विजयांसह १२ गुण झाले असून पूल 'बी'मध्ये पहिल्या दोन संघांमध्ये त्याचे स्थान निश्चित झाले आहे.

> **सुवर्णपदकाचा प्रबळ दावेदार**
> भारतीय संघ सुवर्णपदकाचा प्रबळ दावेदार आहे. भारत १९८२ पासून या स्पर्धेत सुवर्णपदकाच्या प्रतीक्षेत आहे. भारतीय महिला हॉकी संघाने शेवटचे सुवर्णपदक १९८२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत जिंकले होते. दरम्यान, हांगझू इथे झालेल्या मागील आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघाला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)